स्थिरावला॥७०॥तेथें पाहे भोंवतें॥तंव शिवालय असे तेथें॥बैसला देखे पुरुषातें॥तयाजवळीं आ
ला॥७१॥सोमदंत ह्मणे तयासि॥काय निमित्य तूं तप करिसी॥कवण इच्छा असे मानसीं॥ती सांगा
वी मज प्रती॥७२॥येरु ह्मणें पुसोनि काय कारण॥असाध्य तें काय करिसी साधन॥जाई तूं मार्ग क्र-
मुन॥आपुलिया कार्यासी॥७३॥येरु ह्मणे बोलिलासि सत्य॥परि असी आहे धर्मनीत॥भलतें कार्य-
कृत्याकृत्य॥पुसिलें पाहिजे॥७४॥जरी आपुल्यानें न होईल॥तरी दुजा करोनि देईल॥नाहीं तरीं विच्या
रील॥येखादा प्रयत्न॥७५॥तूं कष्टला अससी बहुत॥देह अतिक्षीण दीसत॥माझा हेत असे उदित
॥जें तुझें कार्य सिद्धि पावेल॥७६॥तो ह्मणें सोमदंतासिं॥तूं कवणा कार्या हिंडसि॥तें सांगावें मज पासि
॥कृपा करोनी स्वामिया॥७७॥तेणें सविस्तर सांगीतलें॥माझें नाम सोमदंत वहिलें॥विक्रमाचे उपका
र कथिले॥तयासि मी पाहात से॥७८॥विक्रमाचे उद्देशें॥पुरें पट्टणें धुंडाळितसे॥तैसा मी तप करित-
सें॥पद्मिणी स्त्रियेकारणें॥७९॥नगर तरीं चंद्रगिरी॥राजा चंद्रसेन राज्य करी॥तो पिता आमुचा नि-
र्द्धारी॥माझें नाम दंतसेन॥८०॥सोमदंता परिसी वचन॥येथोनि पंथ द्वय योजन॥क्रमोनि तेथें जाण॥
विवरद्वार असे येकांतीं॥८१॥तेथें असे पद्मीण॥तिणें केला असे पण॥सांगता बहु कठीण॥कोणा
केल्या न वजाय॥८२॥वरी सिंकें असे बांधिलें॥खालीं कढयींत तेल असे भरलें॥तें हाणतसे उसाळे ॥३॥

॥बळें अग्निचेनी॥८३॥पुरुषें सिंकीं बैसावें॥कढयीमध्यें स्नान करावें॥जरी वांचला जिवें॥तरी पद्मीण अध्याय
वरावी॥८४॥ऐसा मी सा वेळ बैसलों॥उडी घालाया भ्यालों॥परतोन माघारा आलों॥तप करीतसे अ ४
द्यापी॥८५॥ऐके येथें वर्षें जाहालीं बारा॥परी प्रसन्न न्हे ते सुंदरा॥जरी प्राण जाता बरा॥तरी संदेह तु-
टता॥८६॥सोमदंत ह्मणे दंतसेना॥यथार्थ मानी माझे वचना॥पावसी चिंतिली कामना॥यासि सं-
शय नाहीं॥८७॥तयासि पुसोन मार्गीं लागला॥हिंडतां सेंदुरगिरीं पावला॥मध्यान्हकाळ उष्ण वे-
ळ जाहाला॥नावेक क्रमी छायेसीं॥८८॥ऐसें विचारोनि मानसीं॥मुरडोनि आला देउळापासीं॥
विक्रमें देखिलें त्यासीं॥मार्गीं येतां ओळखिला॥८९॥वृक्षातळवटीं आला॥रामराम ह्मणोनी बैस-
ला॥तंव वृक्षावरोनि रांवा बोलिला॥ठाकुर कोठोनि बिजें केलें॥९०॥कष्टला असे बहु मार्गें॥उष्ण-
लागलें सर्वांगीं॥मज गमतसे पडिलां उद्वेगीं॥कोणा कार्यास्तव न कळे॥९१॥येरु ह्मणे जी राघवा उत्त-
मा॥तुज देखोनि निवाला आत्मा॥गुणभरिता मनविश्रामा॥वास्तव्य पै उज्जनीसी॥९२॥सांगे अव-
घास मूळवृत्तांत॥जरीं भेटेल विक्रमादित्य॥तरीं च पुरेल जीविचा स्वार्थ॥नाहीं तरीं प्राण त्यागीन॥
९३॥रांवा ह्मणें सोमदंतासि॥कैसा वोळखसी विक्रमासि॥देह नाहीं तयासी॥कैसी खुण कळेल॥९४
तयाचे गुण अपार॥परोपकारी पवित्र॥जें करूं न शके इंद्र॥ते अंगिकारी विक्रम॥९५॥गांजिल्याचा
करी कुडावा॥नीतिन्याय करी बरवा॥न कळती न याच्या मावा॥वेताळ प्रसन्न तयासि॥९६॥त्याणें-
जें धरिलें स्वरूप॥तैसें उपकार केले अमुप॥धर्मकार्या न करी विकल्प॥आपुलिया देहाचा॥९७॥

गाईब्राह्मणाचिया काजा॥ अळसरहित विक्रमराजा॥ जें कल्पवेना कमळाद्विजा॥ तें सहसा रची
॥४॥ ल॥९८॥ अघटित तें घडी॥ नमोडे तें तात्काळ मोडी॥ असंख्य खंडी॥ आपुलिया प्रतापें॥ ९९॥
नसावरे तें सावरी॥ नधरवे तें धरी॥ नपुरे तें पूर्ण करी॥ आपुलिया प्रतापें॥ १००॥ नभासे तें भासवी॥
कोणा न दिसे तें दावी॥ कोणा न लक्षवे तें लक्षवी॥ आपुलिया प्रतापें॥ १॥ अभेद्य तें भेदवी॥ असा
ध्य तें साधवी॥ नहोय तें शीघ्र करवी॥ आपुलिया प्रतापें॥ २॥ अढळ तें ढळवी॥ अचळ तें चळवी
॥ अभोग तें भोगवी॥ आपुलिया प्रतापें॥ ३॥ ऐसा तो पराक्रमी॥ काय वर्णूं शकें मी॥ तो केंसा न यो
ळखे न मीं॥ बत्तिस लक्षण संयुक्त॥ ४॥ येरु ह्मणे पक्षिरावो॥ येक असे नवल भावो॥ माझा स्फुर
तो दक्षिण बाहो॥ विक्रमरावो भेटे ऐसा॥ ५॥ आणि उजवा डोळा लवत॥ पिंगळा बोलत से स्वहित
॥ जें तुज जवळी असे विक्रमादित्य॥ तरी स्वामिचें स्वरूप कोण तें सांगावें॥ ६॥ परिसोनि सोमदंता
चिया बोला॥ विक्रम मनीं आनंदला॥ ह्मणे भला गा भला॥ कष्टलासि मज कारणें॥ ७॥ जैसें रघुना
था कारणें॥ हनुमंतें सीता शुद्धीसीं केलें प्रयाण॥ तैसा हिंडसी वनें उपवनें॥ आह्मा कारणें सोम-
दंता॥ ८॥ सोमदंता मनीं उल्हास थोर॥ करी साष्टांग नमस्कार॥ हृदईं भरला अमृतसागर॥ अ-
ति उल्हास मानसीं॥ ९॥ जाहाली माझे तपाची सिद्धी॥ तुज देखिलें कृपानिधी॥ हरली माझी स
कळ व्याधि॥ जाहाला थोर कृतार्थ॥ १०॥ विहंगम उतरला वृक्षा न ळीं॥ सोमदंत अलिंगी हृदयकम ॥४॥
ळीं॥ मग सांगता जाहाला समूळीं॥ प्रताप कुब्ज काचा॥ ११॥ आणि जें कामसेनें केलें॥ तें समूळ अ-

वि० च० वर्षें कथिलें॥ त्या जवरी तुज देखिलें॥ मार्गीं येतां अकस्मात॥ १२॥ विक्रम म्हणे सोमदंता॥ तुवां देखि अध्याय० ४
लें मार्गीं येतां॥ तेथें चाल जाऊं आतां॥ ऐसा करी उपक्रम॥ १३॥ राया म्हणे येक ऐकं॥ सांगेन दंतसेना
चें कौतुक॥ परिसोनि ह्मणे विक्रमार्क॥ आतां येथोनी स्वार व्हावें॥ १४॥ सारिलें संध्यास्नान॥ शीघ्रीं
केलें त्वरित भोजन॥ मग करिते जाहाले प्रयाण॥ राया स्कंदीं वाहोनियां॥ १५॥ पंथक्रमी वनें उपव-
नें॥ पावले दंतसेनाचें स्थान॥ येरें उभेनी केलें नमन॥ सोमदंतासि पैं॥ १६॥ ह्मणे तुह्मी रतिफिरली रा
या॥ सिद्धी जाहाली तुह्मिया कार्या॥ भेटोन स्वामिया॥ सांग आतां हर्षयुक्त॥ १७॥ दंतसेन ह्मणे त्ये
वेळ॥ माझी कल्पना पुरवा सकळ॥ सिद्धी न्यावी सफळ॥ मग जावें नगरासि॥ १८॥ राया म्हणे दंतसे
ना॥ कोणे स्थानीं असे ते अंगना॥ तेथें त्रिवर्ग जावोनी यांजाणा॥ कार्य तुझें साधितों॥ १९॥ तरी चा-
ल आतां तेथें जाऊं॥ कैसा गव असे तो पाहूं॥ नयाचा मनीं आणोनि गर्भ भाउ॥ कार्य साधूं तुमचें॥
२०॥ रोघे निघाले सत्वर॥ पावले विवरद्वार॥ मग काय करिते जाहाले विच्यार॥ तो परिसा श्रोते हो
॥ २१॥ विक्रम म्हणे सोमदंतासी॥ आतां युक्ति करावी कैसी॥ जातां न येया देहासि॥ कार्य साधिलें पा
हिजे॥ २२॥ ह्मणे तुज सांगेन परकायाप्रवेश॥ तूं सोडी आपुलिया देहास॥ तुझे कुडीं मी करीन प्रवे-
श॥ तुवां रांवा होईजे॥ २३॥ येरु ह्मणे सांग सी कारण॥ तें मी करीन सहस्रगुणें॥ न करीन तरी तुझी
आण॥ सत्य जाण स्वामिया॥ २४॥ तयासि विद्या सांगितली॥ त्याणें आपली कुडी टाकिली॥ विक्र-
म निघे ने वेळीं॥ सोडी देह रांवयाचा॥ २५॥ सोमदंत जाहाला से रांवा॥ नकळे दंतसेनासि मावा॥

ह्मणे हा तुजजवळीं असों द्यावा ॥ जंव तुझें कार्य सिद्धी पावे ॥ २६ ॥ रावा देवोनी दंतसेनापासीं ॥
॥५॥ आपण विवरीं प्रवेशे वेगसीं ॥ देखता जाहाला उत्तम मंदिरासी ॥ आणि तें यंत्र मांडिलें असे ॥ २७
देखोनी सांगो जाती परिच्यारिका ॥ आईजी प्रतिदिनी चा नव्हे देखा ॥ येरी ह्मणे भलता येवो कां ॥
माझा पण सत्य करावा ॥ २८ ॥ तयासिं बोलाविलें भितरीं ॥ बैसों घातलें बैसकारी ॥ आपणही उठो-
नी आदर करी ॥ ह्मणे स्वामि बैसावें ॥ २९ ॥ चरणक्षाळण पैं केलें ॥ अभ्यांगादिक तांबूल दीधलें ॥ म
गविक्रमें तियेसि पुसिलें ॥ कवण भाव यंत्राचा ॥ ३० ॥ ते ह्मणे येथें जो स्नान करील ॥ तयासि मी घाली-
न माळ ॥ हा सत्य जाण माझा बोल ॥ कायावाच्यामनें करोनी ॥ ३१ ॥ राव ह्मणे ऐकें सुंदरी ॥ द्वापारीं राया
द्रुपदाचें घरीं ॥ राधायंत्र द्रौपदीस्वयंवरीं ॥ मांडिलें होतें ॥ ३२ ॥ कटधी खालीं लावोनी दृष्टी ॥ बाणसो
डा यावरले मुष्टी ॥ लक्षूनि मीनाची नेत्रघाटी ॥ फिरतां भेदावा ॥ ३३ ॥ तें येक होतें ऐकिलें ॥ परी ऐसें-
नाहीं कोठें घडलें ॥ हें अवघड रचिलें ॥ कलियुगामाझारीं ॥ ३४ ॥ ह्मणे येक सत्य परमेश्वर ॥ कार्य
कर्त्ता ईश्वर ॥ सिंकीं बैसे नृपवर ॥ दर्भ मंत्रोनी टाकी भीतरीं ॥ ३५ ॥ उसळत होतें जें तेल ॥ तें जाहालें
सुशीतळ ॥ तेथें रायें तात्काळ ॥ सिक्यांतुनी उडी टाकिली ॥ ३६ ॥ भीतरीं करोनियां स्नाना ॥ घालो-
नि बैसला पद्मासना ॥ करीं घेवोनी माळ सुमना ॥ घालों आलि पद्मिणी ॥ ३७ ॥ ह्मणे जी निघावें क
टई बाहेरी ॥ प्रतिज्ञा केली तुह्मी पुरी ॥ मी झालें तुमची अंतुरी ॥ दास्यत्व स्वामिचें करावया ॥ ३८ ॥ ॥५॥
राव ह्मणे जाहाली स आला स्वाधीन ॥ तरीं द्यावें भाषदान ॥ जें मी सांगेन कारण ॥ तें अंगिकारावें तु

च॰ वां ॥ ३९ ॥ येरी ह्मणे जी आज्ञा समर्थ ॥ जो तुह्मी सांगाल कार्यार्थ ॥ तो मी शिरीं वंदीन सत्य ॥ करीन अध्याय
हे भाष्य माझी ॥ ४० ॥ मग तो ह्मणे ऐक वचन ॥ द्वादश वर्षे तप करीत दंतसेन ॥ कळलें असेल वर्त- ४
मान ॥ माळ तयासि घालावी ॥ ४१ ॥ तयाकारणें येव्हडा केला सायास ॥ मज असे बहुत राणिवस ॥
ह्मणे द्यावा सौरस ॥ दंतसेनासीं ॥ ४२ ॥ ऐसें ऐकोनी यां बोली ॥ मग क्षणेक स्तब्ध राहीली ॥ मनीं चिन्ता-
रू लागली ॥ येणें गोविलें भाकेसिं ॥ ४३ ॥ तुमचें सत्य मानीं वचन ॥ परी येक राहिला से पण ॥ तो जरी सत्य
होईल संपूर्ण ॥ तरीं आज्ञाप्रमाण जाणावी ॥ ४४ ॥ राजा ह्मणे जें असेल तें सांगावें ॥ तें हि करूं सत्यभा-
वें ॥ येरी ह्मणे जी बरवें ॥ सायंकाळीं सांगेन ॥ ४५ ॥ राव कटई बाहेर आला ॥ तंव जाहाली माध्यान्ह
वेळा ॥ देवदेवार्चन यथाकाळा ॥ मग भोजन सारिलें ॥ ४६ ॥ पद्मिनीनें सारिलें भोजना ॥ तंव दिन गेला
अस्तमाना ॥ मग जावोनि येकांतस्थानां ॥ चित्रशाळेंत बैसली ॥ ४७ ॥ राजा ह्मणे मनीं काय उदित ॥
तें सांगावें त्वरित ॥ येरी ह्मणे परी सादेवोनि चित्त ॥ येरात्रीं माझारी ॥ ४८ ॥ च्यार वेळ बोलवावें हांस
ावें ॥ हें जरी सत्य करावें ॥ मग तुह्मी उपदिशावें ॥ तें मी वंदीन शिरीं ॥ ४९ ॥ जरी हें न करवे तुह्मासीं ॥ तरीं
पतन आवें माझिया वचनासि ॥ राव ह्मणे ती येसी ॥ हें परस्परें घातिलें असे ॥ ५० ॥ विक्रम ह्मणे इणें घा
तलें सें कोडें ॥ पण केला असे अवघड ॥ तो आतां करील सो पड ॥ भूतस्वामी माझा ॥ ५१ ॥ वेताळाचें
करितां स्मरण ॥ तो ही सत्वर पावला जाण ॥ राजा त्यास सांगे कारण ॥ जो नेम केला पद्मिनीचा ॥ ५२
वेताळ ह्मणे राया ऐक ॥ पाहें माझें क्रीडा कौतुक ॥ करूं पद्मिनीचा सत्य संकल्प ॥ विपरीत करीन आतां

॥५३॥ नयांदोघांचा होतसंवाद॥ नोनकळे पद्मिनीसीं भेद॥ पुढें कथाप्रबंध॥ तोसांगरे हरिदासा॥

॥६॥ ॥५४॥ इति श्रीविक्रमचरीत्रकथा॥ हरिदासहोयसांगता॥ तेऐकावीश्रोता॥ पुण्यकथासादर॥

॥१५५॥ विक्रमकथाप्रसंग॥ ४॥ श्रीराम ७॥ श्रीराम ७॥ श्रीराम ७

॥६॥

वि० श्रीगणेशायनमः॥ ऐकावेताळाचीकुसरी॥ चित्रें लिहिलीं होतीं भिंतीवरी॥ शुकसाळुंखी हंसमयू अध्याय०

री॥ नानापरिचीं विहंगमें॥ १॥ दाहाअवतार लिहिलेअसती॥ त्यात्याअवताराचीस्थिति॥ च ५

तुंयुगींचेजे नृपति॥ अठ्यायशीं सहस्त्रऋषिकुळें॥ २॥ येकवीसस्वर्ग आणि पाताळ॥ द्वारकाआ

णिगोकुळ॥ द्वादशलिंगें सकळ॥ आणि सकळतीर्थेंही॥ ३॥ ऐसें तें चरित्र विचित्र॥ रंगनानाप

रिचेपवित्र॥ सुरंगलखलखित विचित्र॥ आणि लगटें सुवर्णाचीं॥ ४॥ ऐसींचित्रें तीं शोभत॥ वे

ताळप्रवेश करीत्यांत॥ पुसावर्ण हरित॥ त्यामध्यें निघाला॥ ५॥ पंखझाडून करी कुरवाळा॥

तेंदेखूनि पद्मिनीबाळा॥ हांसिलीसे वेल्हाळा॥ खदखदोन तेकाळीं॥ ६॥ रावोवोदी येकरेखा॥

प्रथम हास्य जालें देखा॥ राजाह्मणे पक्षिसुरेखा॥ कांहीं कथा सांगावी॥ ७॥ रात्रजात सेधुरंध

र॥ निद्राभूत शरीर॥ तंवपक्षी बोले उत्तर॥ तेंऐकासकौतुक॥ ८॥ राया आह्मी असों जयाघरीं

॥ त्याची आज्ञा पाहिजे अवधारी॥ मग कथा सविस्तरी॥ सांगेन राया॥ ९॥ तो आमचा श्रेष्ठस्वा

मी॥ आसतों तयाच्या आश्रमीं॥ आज्ञाविरहित आह्मी॥ नसांगो कथानक॥ १०॥ विक्रम म्हणे

गा ऐकवचन॥ त्यांहीं तरीं धरिलें असे मौन॥ हंसह्मणे बोलणें निर्वाण॥ व्रतजाण धरिलें असें

॥ ११॥ पक्षीह्मणे आमचा तो विरंग॥ आज्ञाविरहित न करूं कथाप्रसंग॥ तंव सख्या ह्मणती भंग

लग॥ बाईजी आज्ञा देणेजी॥ १२॥ कैसें अपूर्व आइकें॥ बोलबोलत से कौतुकें॥ कोणजाणे कोणे

विवेकें॥ कथासांगेल अपूर्व॥ १३॥ तिणें तोंडा घातलीसे मिठी॥ परी अंतरींचट पटी॥ जीव धरू

निर्यांकंठीं॥ह्मणेराघोकथासांगे॥१४॥रावोरेखावोदीदुसरी॥हांसणेंबोलणेंबरोबरी॥कथा
॥१॥ परिसावीसविस्तरी॥येकचित्तदेवोनियां॥१५॥पक्षिह्मणेजीसावधान॥ऐकायेकाग्रकरू
नमन॥जेंजालेंभद्रावतीकथन॥रायाभद्रसेननावपरियेसी॥१६॥नगरअतिविस्तारे॥
विस्तीर्णमाडयागोपुरें॥इत्यादिकव्यवहारें॥तेथेंसुखेंनांदती॥१७॥राजापरमहरिभक्त॥
गाईब्राह्मणाचेंपालनकरित॥सुखीनगरलोकसमस्त॥दानधर्मींक्रियाशुद्ध॥१८॥सक
ळहीअसतीसंपदा॥परीनुलंघितीवेदमर्यादा॥साधुजनाचीनकरितीनिंदा॥कोणेयेके
काळीं॥१९॥राज्यकरीअतिनिगुति॥परिजिवींअसेयेकखंती॥पोटींनाहींसंतती॥पुत्र-
फळाचि॥२०॥तयाकारणेंकेलेसायास॥धर्मकेलाबहुवस॥धनीपाहिजेराज्यास॥आ
पुलेंवृद्धत्वह्मणोनियां॥२१॥ऐसेंतयासीराज्यकरितां॥मनींपाहेपुत्राचीअवस्था॥पुढें-
केसीवर्तलीकथा॥तेपरिसावीराया॥२२॥ऐकाकोणेयेकेसुदिनीं॥राजाबैसलाहोता-
सिंव्हासनीं॥तंवद्विजआलाद्वारकेहूनि॥नावतयाचेंसुदेव॥२३॥तोचतु–र्वेदीसंपूर्ण
॥सर्वशास्त्रींअसेनिपुण॥देहींदिसेदीप्यमान॥सुखचंद्रमंडित॥२४॥तोदेखोनियांद्वि-
जवर॥रायेंसाष्टांगेंकेलानमस्कार॥ह्मणेश्रमजालेजीथोर॥याबैसाजीस्वामियां॥२५
सिंव्हासनींबैसवोनिमंगळस्नान॥गंधपुष्पअक्षतासुमन॥तांबूलदेऊनियांलोटांगण ॥१॥
॥घालीराजास्त्रीसमवेत॥२६॥बैसवोनिसिंव्हासनीं॥छत्रेंच्यामरेंनृत्यगायनीं॥ऐसे

पावलेराउळांगणीं॥वाजंतरींगगनगर्जे॥२७॥आज्ञादिधलीलोकांसमस्तां॥तंवतेआलीराजकां-
ता॥चरणींठेवोनियांमाथा॥करजोडूनिउभीराहे॥२८॥द्विजह्मणेपुत्रवतीभवेतूं॥पुढतीघालीदं-
डवतु॥ह्मणेवचनयथार्थु॥केलेंपाहिजेस्वामियां॥२९॥पुनरपिह्मणेतथास्तु॥तुझापुरेलमनोर-
थु॥पावसीलनिभ्रांतु॥उत्तमपुत्राकारणें॥३०॥तंवजालीभोजनवेळा॥आरोगणेंजालींसक-
ळां॥तांबूलदेवूनिपरिमळा॥अष्टसुगंधेंलाविलीं॥३१॥द्विजह्मणेगाभूपाळा॥जेणेंपावसीपुत्र
फळा॥आणिचिंतिलियाकामनासकळा॥तुझियामनीच्यापुरतील॥३२॥राजाह्मणेजीऋषीश्व
रा॥कृपाळुवागुणसागरा॥मजजीकांआज्ञाकरा॥तीमीमस्तकींवंदीन॥३३॥सुमुहूर्तपाहून-
क्षत्रदिनीं॥मंडपउभारिलाराजांगणीं॥मुळेंपाठविलीपायालागुनी॥देशोदेशीचिया॥३४॥ठा
ईठाईगुढियातोरणें॥पताकाझळकतीनिशाणें॥कुंकुमकस्तुरीउधळणें॥सडेरंगमाळाराजबी
दिसीं॥३५॥स्थळींस्थळींनटवेनाचती॥नृत्यांगनानृत्यकरिती॥पुराणश्रवणव्युत्पत्ती॥हरि-
दासकरितीहरिकथा॥३६॥बहुतब्राह्मणवृंदें॥जेकांवेदमूर्तीप्रसिद्धें॥जैशीउगवलीचंद्रबिंबें
॥शतसहस्राचिहो॥३७॥नानादेवनेंमंत्रप्रवितिं॥येकनवग्रहांचाजपकरिती॥येकअग्निस्था-
पनाकरिती॥आच्यार्यआपणसुदेव॥३८॥राजेआलेसकळ॥देशोदेशीचेभूपाळ॥तेणेंदाटले
तुंबळ॥मंडपठाईठाईं॥३९॥विधियुक्तरचिलेंहोमकुंडासि॥होमद्रव्याच्याकेल्याराशी॥घृतप-
येंमधुदधिशर्करासी॥गणितनाहीं पैं॥४०॥समिधाआणित्यासमस्तीं॥जेजयासीअति-

प्रीति॥त्यात्याठेविल्याअसती॥ कुंडाभोंवत्यासमीप॥४१॥ ऐसेंनवरात्रक्रमिलें॥ दाहाव्यादिवसीं
॥२॥ हुताशनाआव्हानिलें॥ अवदानें देतेजाले॥ सुरवरांसी॥४२॥ अवदानें देती मंत्रोक्त॥ ब्राह्मणस्वा-
हास्वधागर्जत॥ अग्नीअसेधडाडित॥ज्वाळाआकाशीं लागती॥४३॥ समस्तांसीजालीतृप्ती॥ मग-
आरंभिली पूर्णाहुती॥ तेमहामंत्रें अर्पिती॥ पावकासी देखा॥४४॥ अग्नीसंतुष्टजाला॥ प्रसादपुरो
डाशअसेउरला॥ ऋत्विजह्मणे तोवहिला॥ स्वीकारावासमस्तीं॥४५॥ ऐकायागाचीस्थीति॥ भो
जनकरावें स्त्रीपुरुषउभयतीं॥ रायापुत्रफळाचीप्राप्ती॥ होईलसत्यजाण॥४६॥ ऐसेंसांगोनित
यासी॥ शांतकेलें होमासी॥ केल्याहोत्याद्रव्यराशी॥ त्याब्राह्मणांसिदिधल्या॥४७॥ वांटिलीं अळं
कारभूषणें॥ येकादीधलीअश्वदानें॥ येकासमर्पिलीं गोदानें॥ गजवाहानें येकासी॥४८॥ येकासि
महिषीसवत्स॥ भूमिदानकितीकास॥ अग्निहोत्रें बहुतब्राह्मणांस॥ देताहोयआनंदें॥४९॥ येका-
निवेदिलीं अष्टादशधान्यें॥ येकाघृतें तैल लवणें॥ येकाद्राक्षखर्जुरीरंभाफळेंजाण॥ दीधलाप्रसा
द बहुतजनां॥५०॥ निंबें नारिंगें नारळें॥ येकादिधलीं कूष्मांडफळें॥ ऐसें जेंजें होतें बोलिलें॥ तितुकें
करीदानातें॥५१॥ इकडे होय दानावळी॥ तंवपाकसिध्दिसर्वजाली॥ मगकरोनियां आंघोळी॥ भो
जनासीबैसले॥५२॥ पाकाचासांगोजरीविस्तार॥ वृथाकरावाग्रंथप्रसर॥ पंच्यभक्ष्यवळवटें क्षीर॥
तिनशेंसाठपत्रशाखा॥५३॥ वोदनें शुद्धजिरेसाळी॥ तोपाक अतिपरिमळीं॥ कथिकातक्राचीनि- ॥२॥
र्मळी॥ आणीफलवणशाखाउत्तम॥५४॥ रायतींवाढिलींपरवडी॥ पापडसांडगेकुरवडी॥ घृतेंवाढि-

१० प॰ लीं लोणकडीं॥ मगसोडितीब्रह्मार्पण॥५५॥ जेंजयारुचिहोतें॥ तें आणोनसत्वरवाढिती॥ दधिभा अध्याय॰
नजेवितीप्रीती॥ मगउत्तरापोशनें घेतलीं॥५६॥ मगसर्वहीआंचवले॥ पंचपुरुषाचें स्मरणकेलें॥ बै ५
सकारउत्तमघातले॥ जेराजबैसकेचेमनोहर॥५७॥ तेथें जालेबैसकार॥ सकळराजे आणि द्विजवर॥
तांबूलदेतीहाडपीधर॥ लावितीनानापरिमळद्रव्यें॥५८॥ हरिदासकरितीगायन॥ नृत्यांगनानाच-
तीगहन॥ सुखीकेलेयाचकजन॥ दानमानदेऊनियां॥५९॥ ब्राह्मणासदिधलीदक्षणा॥ करजोडून
करितीविज्ञापना॥ देतीमंत्रअक्षतासंपूर्ण॥ पुत्रवान्होईह्मणऊनि॥६०॥ मंत्रअक्षताघेवूनि॥ रा-
जाप्रवेशलानिजभुवनीं॥ स्त्रीसमवेतदोघेजणीं॥ कनकपरियळीं भोजनकेलें॥६१॥ इतुकीयाअ-
वसरीं॥ रात्रक्रमिलीदोनप्रहरी॥ राजाउभयतांनिद्राकरी॥ तोचिगर्भराहिला॥६२॥ प्रभातेसूर्योदय
जाला॥ सकळांबैसकारदीधला॥ समस्तागौरविताजाला॥ वस्त्रअळंकारभूषणीं॥६३॥ राजेआपघे
आज्ञामागत॥ भद्रसेननिघालाबोळवित॥ परस्परें आग्रहकरित॥ मगआलानगरासी॥६४
ब्रह्मवृंदादिधलीपाठवणी॥ करजोडूनकरीविनवणी॥ कष्टलेतीमजलागोनि॥ येथवरीकृपाके-
ली॥६५॥ सुदेवह्मणेराया॥ आज्ञादेईजाऊं आपुलियागायां॥ येरुह्मणेजीस्वामिया॥ मजसना
थकेलेंजी॥६६॥ जैसें कृष्णें पांडवांसी॥ रक्षिलेनानासायासीं॥ कींरघुनाथें बिभीषणासी॥
चिरंजीवलंकेनृपकेला॥६७॥ तैसातूंजीगुणनिधी॥ मजलागीं भेटलासिक्षीराब्धि॥ प्राप्तके-
लीपैसिध्दी॥ पुत्रफळाची॥६८॥ तूंसाक्षांतईश्वर॥ तुझाकवणानकळेपार॥ जैसायाहानहोता-

पूर॥ तूंजाणभेटलासी॥६९॥ कल्पतरुदेकल्पिलें फळ॥ चिंतामणी देचिंतिलेंसकळ॥ तैसातुवांचा-
॥ ३ ॥ टविलावेल॥ माझियावंशाचा॥७०॥ ऐसीस्तुतिकरूनि॥ मगदेताजालालुगडीं लेणी॥ नानावस्तु-
आभरणीं॥ गौरविलाऋषिराव॥७१॥ दिधलें तुरंगमशत॥ राजानि घालाबोळवित॥ ऋषिह्म-
णेराहेयथार्थ॥ बहुतदूरीआलासी॥७२॥ अतिप्रीति आदर॥ घाली साष्टांगनमस्कार॥ पुढें गे-
लामुनीश्वर॥ राजामुरडलानगरासी॥७३॥ गर्भराहिलाराणीसी॥ अष्टमासभरलेतियेसी॥
अष्टांगुळेंमास्त्यायसी॥ नवमाससंपूर्णजाले॥७४॥ वैशाखशुद्धत्रयोदशी॥ प्रसूतवेळा आली-
राणीसी॥ प्रभातसमयदिनकरासी॥ महोदयहोतातेवेळां॥७५॥ ह्मणतीजी पुत्रआला॥ रा-
येंमहोछायकेला॥ निशाणीं घावपिटिला॥ दानें दिधलीं ब्राह्मणांसी॥७६॥ ऐसेंबारादिवसभरले
॥ तेरावेदिवसीं बारसें केलें॥ पाळणा घालोनिनावठेविलें॥ शूरसेनह्मणोनी॥७७॥ दिवसंदिव-
सवाढोंलागला॥ पांचावर्षांचाजाला॥ रायेंपढावयाघातला॥ पंडितशाळेसी॥७८॥ धुळाक्षरें
विद्यासंपूर्णजाली॥ मगशास्त्रविद्याशिकविली॥ ऐसीप्रवीणतासर्वजाली॥ तयाशूरसेनासी॥७९॥
षोडशवर्षेंजालियावरि॥ आतांविचाराचीनोवरी॥ मगबोलाऊनियांमंत्री॥ सांगताजालाराजेंद्र॥८०॥
कोणायेकारायाचीकन्या॥ उपमादीजेमदनभार्या॥ आतांपुढेंवर्णावया॥ कायकारण असे॥८१॥ प्रधानें
शब्दनिश्चयकेला॥ रायासीसमाचारजाणविला॥ लग्नाचानिश्चयकेला॥ वैशाखशुध्दद्वादशीसी॥८२ ॥ ३ ॥
केलीसमग्रसामग्री॥ वराडीमिळालेउभयवर्गीं॥ दोघांसीघटितसिध्दि॥ येकचिजाणपैं॥८३॥ च्या-

 रीदिवसक्रमलियावरी॥ वऱ्हाडआलें भद्रपुरीं॥ लक्ष्मीपूजनसत्वरी॥ आनंदेसिपैंकेलें॥८४॥
ऐसेंसुखेंराज्यकरितां॥ पुढेंकैसीवर्तली कथा॥ निश्चयकरोनिचित्ता॥ परिसाजीश्रोता॥८५॥ को
णेयेकेदिवसीं॥ रावनिघालास्वारीसी॥ ह्मणे धनुर्विद्याजालीपुत्रासी॥ परिपरीक्षानाहींपाहि-
ली॥८६॥ तयाकेलावेगळाभार॥ सवेंदिधलाअमितपरिवार॥ पुढें शूरसेनकुमर॥ आपणपाठि-
सींजातसे॥८७॥ स्वारफारदेतीवाजी॥ वीरश्रियें करितीनवाजि॥ बोथाटीयादाकितीसहजी॥
होडघेतीपरस्परें॥८८॥ ऐसाखेळखेळत॥ राजाकौतुकअसेपाहात॥ तंवसूकरनिघालाअकस्मा
त॥ जाळीमधूनियां॥८९॥ त्याचापाठलागकेला॥ वीरयेकयेकदूरराहिला॥ राजकुमरयेकला॥
पाठनसोडीतयाची॥९०॥ रायासिसांगतीदूत॥ शूरसेनाचापराक्रमअद्भुत॥ भद्रसेनजिवींहर्ष
मानित॥ पुत्रशूरद्दत्तिह्मणोनियां॥९१॥ राजपुत्रनसोडीसूकराचीपाठी॥ लंघीतजातसेदरेदरकुटी॥
बहूतजालाहिंपुटी॥ तृषाथोरलागली॥९२॥ यारूहीतेव्हांभागला॥ तृषाक्रांतबहुतजाला॥ शूक
रनिघोनियांगेला॥ दरकुटीं आडकरुनियां॥९३॥ वृक्षदाटलेघनदाट॥ वारूसिनफुटेवाट॥ ह्मणो-
निजालाहिंपुट॥ पाहेउदकालागोनियां॥९४॥ उष्णेंबहुतजाजावला॥ तेणेंदिशाभुलजाला॥ वनो
वनींहिंडोंलागला॥ तंवदेखिलेंयेकसरोवर॥९५॥ उत्तमसरोवरअलोलिक॥ वारूसिपाजिलेंउद
क॥ वृक्षींबांधूनिनावेक॥ आपणआलाउदकासी॥९६॥ उदकजंवघेनअंजुळीं॥ तंवआसराखेळ
तहोत्याजळीं॥ त्याहीं धरुनिकरकमळीं॥ भीतरांबोदोनियांनेला॥९७॥ मागेराजा आणीलोक॥ नि

घालेडोंगरधांडोळित॥मागेंपुढें धांवत॥राज भारपेंजाणा॥९८॥ ऐसेंवहुतहिंडले॥तंवसरोवरपा
वले॥पारुतेंदेखिलेंबांधिलें॥ह्मणेयेथेंअसेशूरसेन॥९९॥जवळींयेऊनपाहाती॥लोकदिसेंगेला
ह्मणति॥उदकींनिघालाह्मणोनिपाहाती॥धांडोळिती च्यारीदिशा॥१००॥चिखलींउमटलेदेखती
चरण॥ह्मणतीजळचरींनेलाजाण॥येकह्मणती पावला मरण॥ऐसी करिती विवंचना॥१॥लक्षूनि
पाहाती तेथें॥ह्मणतीजळचरीं नेलें पुत्रातें॥ह्मणऊनि याकिलें देहातें॥भूमीं लोळत गडबडां॥२॥
ह्मणेकायजालें कराकरा॥दुःखें पिटिलें ललाटा॥पुत्राजाली हे वाट॥नगराजाऊनि काय करूं॥३॥
ह्मणऊनि काढिली सुरी॥घालों पाहे आपले उदरीं॥प्रधानें धांवोनि धरिला करीं॥स्थीरस्थिर गा रा-
या॥४॥नचुके होणार गत॥सकळासि आहे मृत्य॥भोगभोगावा सत्य॥तो न चुके ब्रह्मादिकां॥५॥
पाहे अवताराची कोण गती॥कृष्णदेवाची कोण स्थिती॥काय जालें लंकानृपती॥पुत्रकळत्रासहित
॥६॥राजाप्रधानासी बोले॥म्या देवाचें काय केलें॥हें कां मजवरी रवान घातलें॥बाळक नेलें कोण्या पा
पास्तव॥७॥म्या कोणाचा केला द्रव्यविकल्प॥किंवा केला वृत्तिलोप॥कीं दीधला संताप॥पूर्वीं मु-
नीश्वरांसी॥८॥कीं कुरंगपाडसें वधिलीं॥कीं मार्गस्थें होतीं खंडिलीं॥कीं मातापिता होती दुरावि-
ली॥राज्यमदें करूनियां॥९॥ऐसी व्यथा थोर करी॥प्रधान संबोखी नानापरी॥मग धरूनियां करीं
॥उठविते जाले रायासी॥१०॥वारुवरी बैसविला॥ह्मणे नगरासी आतां चला॥येथें अति कोल्हाळ
जाला॥निवारिता कोण्हीच नाहीं॥११॥ऐसे पावले भद्रावती॥राणीसी सांगती पुत्राची गती॥आ

णी शूरसेनें कांतेप्रती॥जाणवीला वृत्तांत॥१२॥त्याचें दुःख अनुवदता॥धरणीं उकलों पाहे तत्वता॥च
णवा लागतां पर्वता॥जैसें दुःख श्वापदासीं॥१३॥पाषाण घेवूनि उदर पिटी॥मोकळी सोडिली वीरगु
टी॥तोडिती जरा जुटी॥अति दुःखें करोनियां॥१४॥असो आतां दुःख कीतीं वर्णावें॥पुढें जालें तें वर-
वें॥परंतु भोगिलें जें ज्याच्या जिवें॥तें सांगीतलें पाहिजे॥१५॥बोलाऊनि वृद्ध दासी॥रक्षण ठेविली शूरसे
नकांतेसि॥दामोदरी सप्तखणेसि॥नेऊनि ठेविली असे॥१६॥आज्ञेविरहित नाहीं जाणें॥अन्न उद
क नेमस्त देणें॥येक भुक्त करवणें॥ऐसी आज्ञा रायाची॥१७॥तंव कोणे येके दिनांतरीं॥ऋतुस्नान-
जाली ते सुंदरी॥चौथे दिवसीं उपरिवरी॥केश वाळवीत असे॥१८॥तंव उपरितळवटीं येक॥ब्राह्म
ण नावें धेनुपाठक॥तयासि पुत्र असे येक॥तो जात परद्वारासी॥१९॥तयासी ह्मणे धेनु जोइसी॥पु
त्रा आजि न को जाऊं परद्वारासी॥उत्तम वेळा माध्यान्हेसी॥सुमुहूर्त असे बरवा॥२०॥पुत्रा माझें
वचन अवधारी॥आपुले कांतेसी भोग करी॥पुत्र होईल निर्धारी॥सुलक्षणवंत पैं॥२१॥तया
सि होईल राज्यप्राप्त॥ऐसें असे ज्योतिषमत॥तो नाइके चि दुर्वृत्त॥परद्वारासि पैं गेला॥२२॥तो शब्द ऐ
के शूरसेनकांता॥ह्मणे माझा भ्रतार आजि असता॥तरी मजलागी पुत्र होता॥आणि राज्यप्राप्ती त्या
सि होती पैं॥२३॥ऐसें दुःखती सजालें॥ह्मणे माझ्या पतीस ज्याहीं नेलें॥त्यांसी मी श्रापीन वहिले
॥ह्मणोनि घेतलें उदक करीं॥२४॥पुढें काय वर्तला वृत्तांत॥आसरांसि जालें ज्ञानें श्रुत॥ह्मणती प-
तिव्रता सत्य॥श्राप आह्मासि लागेल हा॥२५॥ऐश्या त्या जळनिधी॥तिच्या मंदिरा आल्या नवनिधी

॥१॥ ॥कांयोविनाअपराधिं॥श्रापह्मणसिपैं आह्मा॥२६॥तेह्मणेतुह्मीनेला माझापती॥आजिमुहूर्तवे
ळावरची होती॥सुरतसुखभोगांअंती॥पुत्रफळासीपावतेंमी॥२७॥हाजीवींधरुनियांसंकल्प॥
मींतंवदेत होतें श्राप॥तुह्मी केला त्याचा विकल्प॥ह्मणोनियांजाणपैं॥२८॥येरिह्मणती ऐकयेकवृ
त्तांत॥आह्मी आणून देऊं तुझा कांत॥तुझापूर्णजालियामनोरथ॥मागुताजरीं देसी आह्मा॥२९
ऐसी भाष आह्मा द्यावी॥जरीं येवढा दृढभाव असेजिवीं॥तरीं आणून देऊं स्वभावी॥तुझी कामना
पुरऊं॥३०॥येरीह्मणे घ्या माझी भाक॥पूर्वक्रमलियामाध्यान्हिक॥हेंसत्यवचन माझें ऐक॥या-
सिअन्यथा न करीमी॥३१॥त्यांहीं आणिलें शूरसेनासी॥भेटीजाली स्त्रीपुरुषाशीं॥मर्यादाना-
हींत्या सुखासि॥दोघांजालाउपभोग॥३२॥तयासिजालासमरस॥रुतूजालीयासावकास॥सु-
मुहूर्तवेळीं निःशेष॥दोघांयेकांतजालापैं॥३३॥रात्रतीनप्रहरजालियावरी॥कायकरित्याजाल्या
जळचरी॥आतां आह्मीजाऊं यो सुंदरी॥शूरसेनासी देई का॥३४॥शूरसेनह्मणे कांतेप्रती॥कदा-
चितराजा सत्यमिथ्या मानिति॥त्यासी दावावया प्रचीती॥मुद्रिका तुज जवळीं असोंदीजे॥३५॥
मुद्रिका दिधली वल्लभेसी॥खूणसांगती तयेसी॥आसरा नेती शूरसेनासी॥मो होनियांतिये लागी
॥३६॥तीस तोचि गर्भराहिला॥दिनमणीउदयातें पावला॥पुढें काय वृत्तांत जाला॥तो सांगेन ऐका॥
॥३७॥ऐसाक्रमला येकमास॥गर्भछाया आली सुनेस॥दासी पुसतसे तयेस॥ तेह्मणे तुज काय चाडया- ॥५॥
चि॥३८॥दासी येक गेली धांवत॥राणीस जाणविली मात॥तंव ते आली त्वरित॥पाहावया सुने लागी॥

च॰ ॥३९॥ह्मणे कांयोबुध्धी कुडी केली॥कुळासि कळंक काजळी लाविली॥ह्मणऊन पिरितीजाली॥लल्लाटते अध्याय
समंई॥४०॥ह्मणे अहा कटा कटा॥पुत्र गेला येकवाटा॥परी अपकीर्तीचा थेंबटा॥जन्मवरी लाविला॥४१॥तेह्म ५
णे आईजी मी पतिव्रता॥वायां तुह्मी भ्रम मानिता॥सांगेन जाली अवघी अवस्था॥मुद्रिका मज खूण दि
धलीसे॥४२॥मुद्रिका दाविली सासूसी॥ह्मणे आतां कासया दाखविसी॥तरीं तेच काळीं तयासी॥मजदृ
ष्टी कां केली नाहीं॥४३॥कांहीं सत्य कांहीं असत्य॥हें जिवीं असे विच्यारित॥ह्मणे हे मध्यें ठेऊं न येगुप्त॥श्रु
तकरावें रायासी॥४४॥रायें सारिलें राज्यकृत्यासी॥सभा विसर्जून येघरासी॥वस्त्रें देऊन सेवकापासि
॥आपण गृहीं प्रवेशला॥४५॥राणी होउनि भयाभीत॥रायासि सांगे वृत्तांत॥ ह्मणे हें जालें विपरीत॥
परिच्यारिकें सांगीतलें॥४६॥मग मी उपरि जाउन॥पाहिलें साक्षेपें तिचें चिन्ह॥तंव येकमासप्रमाण॥
गर्भ तिचा वाढलासे॥४७॥ऐसा शब्द ऐकिला॥अंतरीं थोर रावखोंचला॥ह्मणे कुळास बोल लाविला॥डा
गलागला काळिमेचा॥४८॥होतों येकगुणें दुःखकरित॥तंव आणीक शतगुणें जालें प्राप्त॥कैसें कर्म ब-
ळवंत॥पातकें पावताहे॥४९॥बोलाऊन सुनेसी॥ह्मणे काय लांछन लाविलें आह्मासी॥तुझा जन्म तरीं सूर्य-
वंशीं॥परी कुळासी डाग लाविला॥५०॥ते ह्मणे राया मिथ्या दोष लाविसी॥जैं शीमी पावलें जन्मासी॥तैं प-
त्रिका वर्तवी ज्योतिषीं॥जेही पतिव्रता होईल॥५१॥परी येक सांगीतलें होतें गुढार॥जे षोडशवरुषीं घडेल दु
स्तर॥लटका आळव्यभिचार॥पडेल माथा जाणपां॥५२॥सेवटीं पावेल जय॥ऐसा बोलिला द्विजराय॥तुह्मी
न धरावा संशय॥उद्धार करील बेताळिसाचा॥५३॥तुह्मांसि माझें सत्य न वाटे वचन॥तरीं पाहावी मुद्रिके-

नीरखूण॥राजा ह्मणे ऐस्या मुद्रिका जाण॥ घरोघरीं पैं असती॥५४॥ ऐक चोजे अकर्म करी॥ तेसावरी बहुता
प्रकारीं॥तया वचनाची वोल्हन ये थोरी॥ तूं काय सांगसी आह्मातें॥ ५५॥ जे दिवसीं गेला शूरसेन॥ ते काळीं
करावें तुझें हनन॥ आतां जरी घात करणें॥ तरी गर्भ असे पोटीं॥५६॥ गर्भस्त्रियेचा वध करूं नये॥ असा वे-
दार्थ असे निर्णय॥ आतां येक असे उपाय॥ आह्मा न दाखवी मुखकमळ॥५७॥ मग बोलाऊन प्रधाना॥ त्या-
सि सांगे अवघी विंचना॥ ह्मणे ईस नेऊनियां वना॥ दूरदेशीं सांडावें॥५८॥ येरी ह्मणे माझ्या भोगासि॥
तुह्मा बुधि स्फुरली ऐसी॥ मी तरी शुद्ध मानसीं॥ कळंक न से मज कांहीं॥५९॥ प्रधान ह्मणे सूनेसी॥ चाल जाऊं
तुझे माहेरासी॥ वेगीं आणीले अश्विनीसी॥ घेऊनि तिये सी चालिला॥६०॥ तिणें दोघांस केला नमस्का
र॥ ह्मणे जरीं बरवा असे माझा संस्कार॥ तरीं पावेल हरिहर॥ माझें बरवें होइल॥६१॥ ऐसे ह्मणोनि निघा-
ली॥ वनें उपवनें क्रमिली॥ प्रधानासि ह्मणे तृषा लागली॥ जीवन मेळवी मज लागी॥६२॥ ह्मणे येथें उतरे ना
वेक॥ उष्ण जालें माध्यान्हिक॥ प्राशन करावें उदक॥ अश्विनी वरून उतरली॥६३॥ तिणें उदक प्राशन-
केलें॥ श्रमें शरीर धरेवरी टाकिलें॥ तंव तीस निद्रेनें असे व्यापिलें॥ चेतना नाहीं शरीरीं॥६४॥ प्रधानें तेचि
प्रसंगें॥ अश्वारूढ जाला वेगें॥ सत्वर गिरिलंघूनियां अंगें॥ गेला असे तया आड॥६५॥ तो गेला पव
नगत॥ नगरीं पावला त्वरित॥ भद्रसेना जाणवीत मात॥ आज्ञाप्रमाणें नेऊनि सोडिली॥६६॥ इकडे
स्नुषा निजली होती॥ ते जाली से जागृती॥ प्रधानातें पाहे सभोंवती॥ ह्मणे मज सांडोनि गेला से॥६७॥
ह्मणे कर्म बळवंत॥ केंवि चुके ब्रह्म लिखित॥ ऐसीच बुद्धी आठवत॥ भोगानुसार पैं॥६८॥ जरीं अस-

ते जागृती॥ तरी कैसें सांडिता मज प्रती॥ बहुत जीवीं करी खंती॥ ते ऐकिली न वजाय॥६९॥ ह्मणे गा नरह
री नारायणा॥ धावें पावें गा गरुडवाहना॥ मी शरण जाऊं कवणा॥ या आकांत समयासी॥७०॥ केशा-
वा मुकुंदा मुरारी॥ मछ कूर्मा फरशधारी॥ शिळा उद्धरली राम अवतारीं॥ तैसा मज पाव देवा॥७१॥ गा-
जेंद्र मगरें धरिला॥ तो स्तुतिस्तवनें तुज स्मरला॥ तयाचा कुडावा केला॥ दोघां उध्दरिलें स्वामिया॥७२
तैसें मज ये काळीं॥ पाव पाव गा वनमाळी॥ जैसा यमळार्जुन गोकुळीं॥ मुक्त केला देवराया॥७३॥ तूं भ-
क्तजना वज्रपंजर॥ अनाथासी कृपासागर॥ माझा ह्मणी न करी अव्हेर॥ देवराया॥७४॥ ऐसी चिं-
ता करी हृदयांत॥ पाउला पाउलीं असे चालत॥ पाई खडे रुतत॥ उष्णें त्रासित सर्वांग॥७५॥ तें दुः
ख अनुवादतां॥ हृदय फुटों पाहे बोलतां॥ येवदी घडली व्यवस्था॥ ते वैरियान घडावी॥७६॥ लंघी-
तां तो गिरिवर॥ तंव देखिलें येक सरोवर॥ ह्मणे या मार्गें पैलपार॥ पाववी आतां श्रीहरी॥७७॥ ऐ
सी चालते अवसरीं॥ तंव पुढें देखिली येक नगरी॥ तये नाव शिवपुरी॥ तेथें राजा श्रीमंत जाणा॥
॥७८॥ नगर देखूनि आनंदली॥ हळुहळु जवळी आली॥ जैसी मृगी मृगांजवळी॥ नगरा समीप येते-
त पैं॥७९॥ आली वापी तटाकाकांठीं॥ उदकार्थ बैसे निकटीं॥ फोड देखिले चरणसंपुटीं॥ मग स्मरे-
राम कृष्णा गोविंदा॥८०॥ पाणी वाहती नगरनारी॥ त्या देखती नयसुंदरी॥ तूं राजांगना दिससी ब-
री॥ परि हा कर्मभोग कोण ह्मणावा॥८१॥ येरी ह्मणे भोगनो समर्थ॥ केंवी चुके पूर्वदत्त॥ मी परदेशी
अनाथ॥ रंक देवाचे ह्मणवितसे॥८२॥ नगर नृसांगना नायका॥ तिच्या दासी भरों आल्या उदका॥

॥ त्यांहीं देखिली ते कमळ कळिका ॥ जवळीं बैसूनि पुसती तियेतें ॥ ८३॥ ह्मणती बाई कोठून आलिसी
॥७॥ ॥ दुसरें कोण्ही आहे संगतीसी ॥ किंवा येकलीच आहेसी ॥ कैसें भरसी उदरासी ॥ ८४॥ ते ह्मणे
दुसरा येक परमेश्वर ॥ जेणें निर्मिला हा संसार ॥ तोचि देतसे आहार ॥ जो लागेल पोटासी ८५
॥ दासी उदक भरूनि सत्वर ॥ आपुले स्वामिनीसी सांगती सविस्तर ॥ ह्मणती बापीतिरीं बैस-
लीसुंदर ॥ अतिलावण्य स्वरूप जीचें ॥ ८६॥ जरीं तिचे होय समाधान ॥ तरीं सकळ पात्रांचें मो
हन ॥ ऐसें रूपलावण्य ॥ देखिलें नाहीं आणिक ॥ ८७॥ इतुकें परिसोनि उत्तर ॥ पात्रा धांविन-
ली वेगवत्र ॥ जवळीं बैसूनि पुसे विच्यार ॥ येरी ह्मणे उदर देव चालवितसे ॥ ८८॥ पात्रा ह्मणे
चाल आमच्या गृहासी ॥ अन्न वस्त्र नाना भोग भोगिसी ॥ येरी ह्मणे काय उद्योग करविसी ॥ तो-
सांगावा मज प्रती ॥ ८९॥ उद्योग तरीं कळावंत ॥ राजसभे करूं नृत्य ॥ येत्या दाजरीं देई द्रव्यार्थ
॥ तरीं भोगी आह्मासी ॥ ९०॥ येरी ह्मणे भोगाचें नाहीं कारण ॥ दळाकांडा करीन जाण ॥ जें ध-
यांवांटे कीं जाईन ॥ तें धवां आज्ञा दीजे ॥ ९१॥ ऐसें जरीं अभय देसी ॥ तरीं राहेन तुझ्या आश्रमा
सी ॥ माझ्या येकल्या जीवासी ॥ कोरडे धान्य देत जावें ॥ ९२॥ ऐसी जरी भाष देसी ॥ निकट क-
रून मानसीं ॥ तरीं क्रमीन काळासी ॥ जंववरीं असे ऋणानुबंध ॥ ९३॥ पात्रेनें विच्यारिलें मान-
सीं ॥ बुध्धिप्रकारें नेऊं घरासी ॥ देखूनि आपुल्या स्वार्थासी ॥ आपण चिकार्यवाद करील ॥ ९४ ॥७॥
॥ ह्मणूनि दीधलें भाकेसीं ॥ आणि तिणें विच्यारिलें मानसीं ॥ तीन मास भरले गर्भासी ॥ पुढें उर

वि० च० लेसामास ॥ ९५॥ ते क्रमावे भलतं रीतीं ॥ जंववरी दोन्ही जीवासी निवाडे होती ॥ मग भलती करा अध्याय
वी युक्ती ॥ जे बुध्धि देईल नारायण ॥ ९६॥ पावली पात्रेचें घर ॥ वेगळें घेतलें बिढार ॥ झोपडी हो- ५
ती जर्जर ॥ मंदिरासमीप तेथें राहिली ॥ ९७॥ ऐसी तेथें असतां ॥ पुढें कैसी वर्तली कथा ॥ ते ऐका
वी श्रोतां ॥ हरिदास सांगतसे ॥ ९८॥ इतिश्री विक्रमचरित्र कथा ॥ हरिदास होय सांगता ॥ ते ऐ-
कावी श्रोतां ॥ चित्त देऊनियां ॥ ९९॥ इतिश्री विक्रमचरित्रे ॥ ॥ पंचमोध्यायः ॥ ५ ॥ ७ ॥ ७

श्रीगणेशायनमः॥पात्रेच्या घरीं राहिल्यावरी॥ दळाकांडा प्रत्यहीं करी॥ कोरडी घेन असे अडसेरी॥ वेगळा करी स्वयंपाक॥१॥आपलें अन्न उदक वेगळें॥ नलिंपे कोण्हाच्या विटाळें॥ जें ज्यास मई जेसें मिळे॥ तेंच भक्षण करितसे॥२॥ऐसे क्रमले आठ मास॥ नववा जात असे येक दिवस॥ चिंता पडली पात्रेस॥ ते अपूर्व परियेसा॥३॥बोलावोनि सुइणीसी॥ सांगती जाली तियेपासीं॥ स्वणें गरोदर असे आमच्या गृहासीं॥ तें कार्य सांगेन तुज॥४॥ दोहों दिवसां प्रसूत होईल॥ जरीं पुत्र उपजेल॥ ने वोनियां शीघ्रकाळ॥ राणीप्रति देइजे॥५॥ नेथील कंन्या येथें आणी॥ तुज देईन सुवर्णनाणीं॥ येरी ह्मणें न करी विनवणी॥ अवश्य मी करीन॥६॥ कांहीं करीं द्रव्य दीधलें॥ ह्मणे राणिसी विचारीन वहिलें॥ दिवसाचें तिच्या प्रमाण केलें॥ मनीं धरिलें गुजपैं॥७॥ तये नगरीचा भूपती॥ नयासि नाहीं पुत्रसंतती॥ कंन्या सातजणी असती॥ गरोदर असे आठव्यानें॥८॥ राजा ह्मणे राणीसी॥ पुत्र नाहीं आपुल्या वंशीं॥ जरीं आतां कन्या प्रसवसी॥ तरीं तुझा त्याग करीन॥९॥ राणी जाहाली भयाभीत॥ ह्मणे न कळे पूर्वसंचित॥ तरीं पूर्वीच एखादा पदार्थ॥ विचारावा लागेल॥१०॥ बोलावूनि सुइणीसी॥ मंत्र सांगे तिच्या कानासी॥ मज कंन्या होईल ते वेगेसीं॥ आणिकाठाईं घालावी॥११॥ तेथील पुत्र आणि येथें॥ तुजसी द्रव्य देईन बहुत॥ हें असों द्यावें गुप्त॥ प्रगट न करी कोण्हांसी॥१२॥ करीं दीधली पाचनाणी॥ गर्भदिवस सांगे कानीं॥ थोर आनंदली सुइणी॥ ह्मणे द्विधा लाभ जाला॥१३॥ मग ह्मणें प्रतिदिनां तरीं॥ दों घरीं येरझार करी॥ पूर्ण नवमास ते अवसरीं॥ दोघी गर्भिणी-

सभरलेपैं ॥ १४ ॥ येकेदिवसींरात्रिचेवेळे ॥ राणिचेंपोटदुखूंलागलें ॥ सुइणीसबोलाविलें ॥ ह्मणे-
॥९॥ सावधअसावेंत्वां ॥ १५ ॥ रात्रितीनप्रहरक्रमिली ॥ तंवराणीप्रसूतजाली ॥ कंन्याउत्तमउपजली ॥
सर्वगुणींसंपूर्ण ॥ १६ ॥ प्रसूतसमयवेळा ॥ बायकोसपुत्रजाला ॥ सुइणीनेंकैवाडकेला ॥ नेवोनघा
तलाराणीपुढें ॥ १७ ॥ नेथीलकंन्याघेवूनिआली ॥ तियेबायकोपुढेंघातली ॥ नेसावधहोवूनिपु-
सोंलागली ॥ कायजालेंह्मणवोनि ॥ १८ ॥ सुइणह्मणेंपाहेकंन्येसी ॥ येरीविचारीमानसीं ॥ प्रश्नबो-
लिलाधेनुजोसी ॥ तोकायलटिकाजाहाला ॥ १९ ॥ ज्योतिषलटिकेंनव्हे सर्वथां ॥ मजपुत्रजालायथा
र्थ ॥ इणेंमजअसतांभ्रामित ॥ केलाअसेविकल्प ॥ २० ॥ श्रोतेह्मणतीतियेसिकांभ्रमना ॥ तरीप्रथम
अज्ञानअवस्था ॥ कोण्हींनाहींसांवरिता ॥ ह्मणोनिजालीविव्हळ ॥ २१ ॥ ह्मणेएवढा घेनलायनवास
॥ पुत्राचीधरिली होतीआस ॥ तेदेवेंकेलानिरास ॥ मध्येंविघ्नउदेलें ॥ २२ ॥ ऐसीखंतीकरीमनीं ॥
ह्मणेसुखीअसोअसलेस्थानीं ॥ माझाबाळमजलागोनी ॥ भेटलसमयांतरें ॥ २३ ॥ ह्मणोनिकं-
न्याघेतीपुढारी ॥ मगतेसुखेंनिद्राकरी ॥ बारादिवसक्रमलियावरी ॥ तेरादिवसीं घालीपाळण्यांत
॥ २४ ॥ नावठेविलेंसुमनी ॥ हर्षमानिलाआपुल्यामनीं ॥ तंवकायवर्त्तलेंराजभुवनीं ॥ तेंअपूर्वआ
इका ॥ २५ ॥ राणीसपुत्रअसेजाला ॥ हाशब्दरायेंऐकिला ॥ मगदानधर्मबहुतकेला ॥ द्विजवरां
सि ॥ २६ ॥ श्रीमंतहर्षनिर्भर ॥ लागलावाद्यांचागजर ॥ मंडपउभारिलापरिकर ॥ नृत्यांगनानाच ॥९॥
तती ॥ २७ ॥ ऐकरादिवसक्रमलियावरी ॥ बारावेदिवसीं बारसेंकरी ॥ तेरावेदिवसींनामधरी

बि० च० बळिसेनऐसें ॥ २८ ॥ दिवसंदिवसावाढोंलागला ॥ आठांवर्षांचाअसेजाला ॥ रायेंव्रतबंधकेला ॥ पं अध्याय
डितेंविद्यासिकविली ॥ २९ ॥ शस्त्रांस्त्रींविद्यासंपूर्णता ॥ राजाहोयमनींविचारिता ॥ द्वादशवर्षेंभ
रलीसुता ॥ राज्यआतांयासिद्यावें ॥ ३० ॥ आहेराज्यबंधआह्मासी ॥ ह्मणूनअवरावेंतपक्रियेसी
॥ राज्यदेवूनिपुत्रासी ॥ आपणजावेंअनुष्ठाना ॥ ३१ ॥ अवघेंसांगेप्रधानां ॥ ह्मणेअज्ञानपणबळ-
सेनां ॥ तूंअससीशाहाणा ॥ विवेकीचालवीराज्यासी ॥ ३२ ॥ इतुकेंसांगोनरावगेला ॥ बळिसेन
राज्यचालवूंलागला ॥ पुढेंकायकरिताजाला ॥ तेंअपूर्वपरियेसा ॥ ३३ ॥ प्रतिदिनींपात्रायेचोळं
गेसीं ॥ गायनकळाकरीनृत्यासी ॥ राजादेतवस्त्रतांबूलासी ॥ अतिआदरेंकरूनियां ॥ ३४ ॥
ऐसेकोणेयेकेदिनीं ॥ चोळंगेसिआलीतेनाचणी ॥ सवेंबायकोसघेवुनी ॥ करीगायनासिपैं ॥
॥ ३५ ॥ पुढेंबैसलीतेपात्रनायका ॥ तियेसिंह्मणेंतूंरक्षीपादुका ॥ रायेंलक्षिलीतेकमळकळिका
॥ मगपुसेपात्रेसी ॥ ३६ ॥ ह्मणेतेकोणकोणाची ॥ अतिलावण्यस्वरुपाची ॥ न्यूनतावाटेरंभेची ॥
ईचेंस्वरूपदेखूनियां ॥ ३७ ॥ पात्राह्मणेतेआमची ॥ जरींवासनाधरालतियेची ॥ तरींआइतीकरी
नभोगाची ॥ रात्रिसमईयेइजे ॥ ३८ ॥ राजाह्मणेबरवें ॥ पात्रासंतोषलीजिवें ॥ घरायेवोनिस्वभा
वें ॥ तयेसिंपुसतीजाली ॥ ३९ ॥ ह्मणेंऊठकरीअंभ्यंग ॥ परिमळेंचर्चीअष्टांग ॥ करीपांसुंदरभोग ॥
रायासीजाणपां ॥ ४० ॥ येरीह्मणेंभोगाचीनाहींचाड ॥ माझेंमजआहेगोड ॥ त्यांजरींकेलेंउदंड ॥
तरींअंगिकारनकरीमीं ॥ ४१ ॥ पात्रानमानीतिचेंउत्तर ॥ वोवरीधूपवीमनोहर ॥ ह्मणेईसकरूंबव्हा

स्कार॥ नेयूनि पालों राया पुढें॥ ४२॥ येरी मनीं करी विचार॥ ईयेसि कां करूं कर कर॥ जो येथें येईल
॥२॥ लनृपवर॥ तो माझा पुत्र जाणपां॥ ४३॥ ऐसा दृढ चकरूनि मनीं॥ पात्रे प्रति बोले वचनीं॥ ह्मणे जें
तूं करसील प्रमाणी॥ मग उगी चराहिली॥ ४४॥ अस्त जाला दिनकरासी॥ पलंग पाडूनि करी सेजे-
सी॥ अरळ फोडोन सुमनांसी॥ ठेविलीं परिमळ द्रव्यें॥ ४५॥ पात्रा ह्मणे जाय निशाकरी॥ येरी नि-
र्भय अंतरीं॥ जाऊनि यां सेजे वरी॥ पहुडे कुमारीसहित॥ ४६॥ इकडे रायें सारिली आरोगणा
॥ सांगातें घेतलें सेवकजनां॥ मनीं धरूनि कामवासना॥ जात असे अतित्वरें॥ ४७॥ मार्गे चाले
झडझडित॥ तंव पिंगळा बोलिला विपरीत॥ दूत पाठविले धांवत॥ बोलाविले ज्योतिषी॥ ४८॥ तें
हीं करूनि निर्धार॥ ह्मणें जी राया अवधार॥ तुह्मीं ज्या कार्या जातां सत्वर॥ तें कार्य न घडे सर्वथा
॥ ४९॥ ऐसें बोलिला पक्षीश्वर॥ जेम जसी वरड नृपवर॥ आणि न घडे अनुसर॥ प्रश्न तरीं ऐ-
सा दिसे मज॥ ५०॥ रायें विचारिलें मानसीं॥ अपशकुन जाला मुहूर्तासी॥ मुरडोनि गेला मंदि
रासी॥ निद्रा करी स्वमंचकीं॥ ५१॥ इकडे मार्ग लक्षी कलवांतिणी॥ तंव उगवला दिनमणी॥
ह्मणे रायें केली विनोदवाणी॥ असत्य मजसी बोलिला॥ ५२॥ मुख प्रक्षाळून गेली राजयोळंगे॥ ह्म
णें व्यर्थ गेले परिमळ रंग॥ बहुत वेळां पाहिला मार्ग॥ परि येणें घडलें नाहीं॥ ५३॥ राजा ह्मणे
होतें कांहीं कारण॥ ह्मणऊनि येणें घडलें नाहीं जाण॥ आज येईन सत्य वचन॥ आइकें पात्र ॥२॥
नाइके॥ ५४॥ पुनरपि बोलिसेन काय करी॥ सत्वर वह्याळी सारी॥ सेवक घेऊनि बरोबरी॥ नि-

चं० घना जालाणीं॥ ५५॥ पुन्हां बोलतां पक्षीश्वर॥ राव द्विजातें ह्मणें विचार॥ येरें ह्मणे राजेश्वर॥ कालचा श- अध्याय
कुन सांगतसे॥ ५६॥ मागुता फिरूनि गेला घरासी॥ उदय जाला दिनकरासी॥ पात्रा येवोनि राया ६
पासीं॥ काय बोलती जालई॥ ५७॥ ह्मणे जन बोले असत्य॥ तें राजानिवडी सत्य मिथ्य॥ राजा-
नरीं बोलें असत्य॥ तरीं कोणी करावा निवाड॥ ५८॥ राव ह्मणें पात्रेसी॥ तुवां न धरावें संशया
सी॥ आजि येईन निर्धारेसी॥ हें वचन प्रमाण॥ ५९॥ पात्रा गेली निजभुवना॥ रायें केलें सभाविसर्जना॥ मग सारोनि आरोगणा॥ प्रयाण करिता जाहाला॥ ६०॥ जातसे कामातुर मनें॥ मा-
र्गी पुरें गोठणीं ज्या बैसली जाण॥ वत्सा पुच्छीं पाय पडिला तेणें॥ ते वो भाये आपले मातेतें॥
॥ ६१॥ धेनु ह्मणें राजा कामातुरु॥ जात असे मात्रा गमन करूं॥ तुज तो न देखे अविच्यारु॥
मदन पिसा जाला से॥ ६२॥ गाईचा शब्द ऐकिला॥ अंतरीं थोर खोंचला॥ ह्मणे दोन दिवस
अपशकुन जाला॥ आजि प्रत्यक्ष ऐकिलें श्रवणीं॥ ६३॥ रायें दुष्टवासना सारिली॥ ह्मणे ते
प्रत्यक्ष माउली॥ ऐसें कल्पून तये वेळीं॥ ह्मणे माता दर्शन घेऊं आतां॥ ६४॥ इकडे पात्रेनें-
केला विचार॥ बाइकोसि करवी वस्त्रें अलंकार॥ सेज करवोनि मनोहर॥ पहुडविती जा
ली॥ ६५॥ येरि निर्भय मानसीं॥ वो संगा घेऊनि कुमारीसीं॥ निद्रा करी जागृतिसी॥ ते
राजमाता॥ ६६॥ रायें सांडोनि वासनाकुडी॥ मंदिरा पावला तांतडी॥ ह्मणें मातें कवाड उ-
घडी॥ सांग आपला वृत्तांत॥ ६७॥ येरी विचार करी मनीं॥ ह्मणें पावला चक्रपाणी॥ धेनु-

जोशाचे शकुनीं॥ कृतकृत्यार्थ जाहालें॥ ६८॥ ह्मणे तो केवळ ईश्वर॥ जणु देवाचा अव
॥३॥ तार॥ त्याचा शकुनार्थ निर्धार॥ आजि मज फळला पैं॥ ६९॥ कवाड उघडिलें सत्वरी॥ ह्मणे
बायें ईकां भितरीं॥ बैसोनियां सविस्तरी॥ ऐक माझी विवंचना॥ ७०॥ तिणें समूळ सांगी
तलें॥ येरें अति आदरें परिसिलें॥ तंव अपूर्व एक वर्तलें॥ तें परिसा श्रोते हो॥ ७१॥ मोहें दाटली सुं-
दरा॥ फुटला पान्हां निघाल्या धारा॥ त्या श्रवती मुखीं कुमरा॥ करिता जाला दुग्धप्राशन॥ ७२॥ उ-
ठोनि बैसला पलंगावरी॥ माता आणि बहिण तिसरी॥ बोलाविलि नृत्यकारी॥ ह्मणें मज जन्म को
ठें जाला॥ ७३॥ तूं जन्मलासि श्रीमंत कुळीं॥ प्रसवली ते राजपत्नी बाळी॥ राजा ह्मणें सत्य सांग वहि
ली॥ नको बोलूं माविक॥ ७४॥ राया सत्य जरी पुससी॥ मज ठाउकें नसे निर्धारेसि॥ त्वां पुसावें सुई
णिसी॥ ते प्रसूतकाळीं जवळी होती॥ ७५॥ मग बोलाविली सुईणी॥ राजा पुसे तिये लागूनी॥
मज जन्म कवणें स्थानीं॥ हें यथार्थ सांगावें॥ ७६॥ जरीं सांगसी मावीक वचन॥ तरीं छेदीन ना
सिक कर्ण॥ ऐसें दृढ विचारून॥ सत्य वदे वाणी ते॥ ७७॥ ते जालि भया भीत थोर॥ राया माथां
ठेवी अभय कर॥ तरीं मी जो जाला विचार॥ तो विदित करीन॥ ७८॥ रायें ठेविला माथां कर॥
सांगती जाली मूळ विस्तार॥ इज पासून तुज जन्म निर्धार॥ म्यां कपट केलें उदरास्तव॥ ७९॥
कामसेना चरणीं ठेवी म(स्त)था॥ ह्मणे राया रक्षी अनाथा॥ सुइण हित्नरिता॥ चरणीं ते व्हां लागली ॥३॥
॥ ८०॥ मग काय करी वळसेन॥ माय बहिणीसी सिबिकेंत बैसवून॥ गेला राजगृहासी घेउन॥

वि॰ च॰ माता षोडशोपचारें पूजिली॥ ८१॥ तंव उगवला गभस्ती॥ बोलाविले प्रधानां प्रती॥ सांगता जा अध्याय
ला तयासि निश्चिती॥ सूजनी तिचालवावी॥ ८२॥ मज कार्य असे मास येक॥ तुह्मी असावें ब- ६
ळपूर्वक॥ मासांतीं हिता (का)ळिक॥ मी येईन जाणपां॥ ८३॥ ऐसें सांगून प्रधानासी॥ घेता जाला द्र
व्य भांडारासि॥ रथ हिवारु कुंजरांसि॥ शुढार घालविलें॥ ८४॥ पांय भारा नाहीं निती॥ चालतां द-
णाणिली क्षिति॥ पुढें चाले दळाधिपती॥ पाठीसी राज भार॥ ८५॥ माता आणि भगिनी॥ पालखी
मध्यें बैसउनी॥ त्यांसि घालून मध्य सैन्यी॥ चालत असे दळ भार॥ ८६॥ ऐसे पावले सरोवरीं॥ जे
थें शूरसेन नेला होता जळचरीं॥ सैन्य उतरलें तिरीं॥ मध्यें दिधला राजमंडप॥ ८७॥ अनुक्रमें-
उतरलें सैन्य॥ वस्त्रें अळंकार संपूर्ण॥ हरित कृष्ण पीत वर्ण॥ शुभ्र वर्ण दिसती दुजे॥ ८८॥ किते
क वर्ण आरक्त॥ कुंकुमं वर्ण लखलखित॥ बहुत चित्र विचित्र॥ शोभायमान दिसती॥ ८९॥ राज
मंडपाची काय सांगों कुसरी॥ निळे पिवळे फड केच्यारि॥ नांवडा तापताचो फेरी॥ चौक मध्यें म
खमालीचा॥ ९०॥ रत्नें जोडिलीं खणोखणीं॥ हिरे गोमेद जोडिले कोंदणीं॥ पाचु पेरोजाची खि
ळणीं॥ ठाईंठाईं केली असे॥ ९१॥ ब्राह्मण मिळाले असंख्यात॥ तेजें जैसें उगवले आदित्य
॥ तयांसी राजा नमस्कारित॥ अति आनंदें करूनियां॥ ९२॥ मग नमिला विघ्नहर॥ जपा बैस-
ले द्विजवर॥ त्यांसि सांगे नृपवर॥ पृथक् पृथक् करा जप॥ ९३॥ कितिकां सनवग्रह दिधलें॥
येकीं अकरा रुद्र आरंभिले॥ येक तुळजा स्तव करिते जाले॥ सप्तशती करुनियां॥ ९४॥ एक

जपती रेणुकास्तवन॥ येकें केलें क्षेत्रपाळचिंतन॥ एककरिती भैरवपूजन॥ ऐसे बैसले स्थळो

॥४॥ स्थळीं॥९५॥ एकीं आराधिलें जळचरांसीं॥ रायें बांधिलें यज्ञकंकणासी॥ मनीं ध्यात सेहृषि

केशी॥ करी दाव बळसेन॥९६॥ यज्ञ मांडला प्रचंड थोर॥ कीं पांडवांचा अश्वमेधपरिकर॥

याज्ञीक बैसले धुरंधर॥ धूम्रें अंबर कोंदाटलें॥९७॥ ऐसी केलीं दोन नवरात्रें॥ मग आदरिलें

हवनातें॥ होमद्रव्यें आणिलीं समस्तें॥ बोलिलीं जींजीं विधिसीं॥९८॥ आज्यपात्राच्या पर-

वडी॥ अष्टगंधाच्या उत्तरडी॥ त्याकरून विखंड खंडी॥ ठेविते जाले कुंडापासी॥९९॥ कुंड र-

चिलें अष्टकोन॥ स्थापिते जाले हुताशन॥ मंत्रघोष करिती ब्राह्मण॥ तेणें अग्नी प्रज्वळला

॥१००॥ ज्वाळा लागलिया आकाशीं॥ अवदानें देती ऋषी॥ समिधाच्या होत्या राशी॥ त्यास

मर्पिते जाहाले॥१॥ सरल्या होमद्रव्याच्या राशी॥ घृतपयसमर्पिती अग्निसी॥ गणित ना-

हीं फळवल्लीसी॥ तेंही समर्पिते जाहाले॥२॥ थोर जालें खेदखिन्न॥ ह्मणे देवतीं मांडिलें नि-

र्वाण॥ करकमळीं सुरी घेवून॥ खंडित सेस्वमांसातें॥३॥ जालीं संपूर्ण बळिदानें॥ पूर्णाहु-

तीसंपूर्ण॥ परि देवता प्रसन्न॥ न होती ते समई॥४॥ मांस टाकी अग्निभीतरीं॥ मुखीं कृष्णा-

र्पण उच्चारी॥ ऐसा जानुजंघा सरी॥ दोर्दंडिचें मांस खंडिलें॥५॥ जळदेवता अनुवादति॥

ह्मणे येणे मांडिली निर्वाण भक्ति॥ काय मागे अह्मां प्रती॥ ते विचारुं पां॥६॥ सुरी जंव घाली ॥४॥

शिरकमळीं॥ तंव अदृश्य बोलती निराळी॥ माग माग गा ये वेळीं॥ आपण जालों प्रसन्न॥७

शि०च० येरु ह्मणे जाल्या तप्रसन्न॥ तरीं पिता याचा शूरसेन॥ त्यांहीं सोडिला जळांतुन॥ बाहेर आला येकाये- अध्याय०

कीं॥८॥ धावूनि बळिसेनें आलिंगिला॥ उचलून हृदईं धरिला॥ मग घेउनियां आला॥ सभामं- ६

डपामध्यें॥९॥ करविलें कनकस्नान॥ ब्राह्मणांसि दिधलीं दानें॥ माता मग बोलावुन॥ भ्रतार पा-

उलें वंदीलीं॥१०॥ स्त्रीपुरुषें भेटलीं॥ पिता पुत्र एकवटलीं॥ दानधर्म करिते जालीं॥ अतिआ-

नंदें करूनियां॥११॥ केलीं गोदानें अश्वदानें॥ गजदानें महिषीदानें॥ भूमिदानें ग्रहदानें॥

ग्रामदानें कितेकां॥१२॥ ऐसी जाली दानावळी॥ तंव पाकसिध्धि जाली यथाकाळीं॥ मग सा-

रुनि आंघोळी॥ आरोगणा सारिती॥१३॥ जेविनां अवघे जाले तृप्त॥ आंचवोनि बैसले सम-

स्त॥ उटी चंदनाची देत॥ गळां घालिती सुमनमाळा॥१४॥ विडे देती हडपीधर॥ दक्षिणा देत नृ-

पवर॥ मंत्राक्षता घोष अपार॥ करिते जाले ब्राह्मण॥१५॥ तिघे वोडविती मस्तक॥ अक्षता दा-

किती ब्रह्मादिक॥ थोर जालें कौतुक॥ इंद्रादिक पाहूं ठेले॥१६॥ दशरथकुळीं जन्मला पुत्र॥ रघु-

नाथ जानकीकांत॥ कीं गोकुळीं अवतरला कृष्णनाथ॥ तेणें बंधु आणिले आपुले॥१७॥ तैसा पु-

त्र येक बळिसेन॥ तेणें पिता आणिला स्वबळि देउन॥ पुरुषार्थ केला गहन॥ त्रैलोक्यामाझारीं-

॥१८॥ सकळां दिधली पाटवणीं॥ तृप्ति जाली हुताशनीं॥ मग लावोनि वाद्यांची ध्वनी॥ सैन्य-

चतुरंग निघालें॥१९॥ पावले ते शिवपुरीं॥ प्रधान आले सामोरीं॥ नारी शृंगारीली नानापरी॥

ध्वजपताका झळकती॥२०॥ गुढिया तोरणें उभारिलीं॥ मखरें ठाईं ठाईं शृंगारिलीं॥ नगरलोक

नयेवेळीं॥ पाहातांशूरसेनासी॥ २१॥ अठराधान्याच्यावोवाळणी॥ सांडितां अनामिकां आली
घनी॥ प्रवेशतां राउळांगणीं॥ अति आनंदें करूनियां॥ २२॥ शूरसेन जाला होता क्षीण शरीर
॥ तयासि करितीउपच्यार॥ तोपुष्टजालियासत्वधीर॥ मगकाय विचार केला॥ २३॥ आ-
तांचलाजाऊं भद्रावतीसि॥ भेटीकरूंपितापुत्रासि॥ राज्यींस्थापूं शूरसेनासी॥ मागुता-
मीयेथें येईन॥ २४॥ ऐसाविचारकेला॥ प्रधानासि अवघा वृत्तांत सांगीतला॥ दळभार पा
ल्हाणिला॥ मगचालिला सैन्यांसीं॥ २५॥ पावले भद्रिकानगर॥ भद्रसेनां सांगती हेर॥
स्वामी आलें परचक्र॥ रायाबळिसेनाचें॥ २६॥ तुमचा कोण्हीं नाहीं सांवरिता॥ परद्व्यासिं पराभवि
ना॥ जरीं शूरसेन जिवंत असतां॥ तरीं द्रुतुकें न होतें राया॥ २७॥ हें जाणोनियां न्यून जाण॥ ब-
ळिसेन चालूनि आला गहन॥ आतां मेळवूनियां नगरजन॥ युद्ध करावें सत्राणें॥ २८॥ प्रधान ह्म
णती रायासी॥ तुह्मीं राहावें नगरासी॥ आह्मी जावूं संग्रामासी॥ तयासमोरपैं॥ २९॥ विदोविदी
पायांचे मोगर॥ धनुष्यबाण खड्ग तोमर॥ कुडोकुडां महावीर॥ करीं शस्त्रें झळकती॥ ३०॥ बांण-
जंबुरे सजुत॥ गुंडेगोफणी अपरमित॥ हांके भरोनि ठेवित॥ ठाईं ठाईं पैं देखा॥ ३१॥ सिद्ध के-
ले तुरंगम वारु॥ गजां सिंघानलें गुढारुं॥ प्रधानें करुनियां नमस्कारु॥ नगराबाहेर निघाला
॥ ३२॥ तें बळिसेनें देखिलें॥ ह्मणे भयनगरीं सिद्ध जालें॥ दूतां बोलावूनि वहिलें॥ करीं पत्रि- ॥५॥
कादिधली॥ ३३॥ तेणें अवघें लिहिलें समूळ॥ तुह्मी न व्हावें जी चंचळ॥ स्थिर होवूनियां

सकळ॥ भयरा कामनींचें॥ ३४॥ भेटी घ्यावी शूरसेनाची॥ आणि बळिसेन बाळकाची॥ कां
क्षा सांडुन जिवींची॥ निर्भय आह्मां भेटावें॥ ३५॥ ऐसें पाठविले हेर॥ त्यांहीं प्रधाना केला न-
मस्कार॥ सांगीतलें सविस्तर॥ ह्मणे भेटवा राजयासी॥ ३६॥ पत्रीं लिहीलेंसें सकळ॥ तें देऊं
रायाजवळ॥ ऐसें ऐकून तयाचे बोल॥ काय करी प्रधान॥ ३७॥ तेणें बोलाविला आपला दूत
॥ ह्मणें करावें रायासि श्रुत॥ सांगावा अवघा वृत्तांत॥ काय आज्ञा ह्मणऊनि॥ ३८॥ प्रधान दूतें अ
वघें सांगीतलें॥ रायें अवघें परिसिलें॥ ह्मणे तयासि बोलावा वहिलें॥ पत्रिका मज्ञासि आणूं
॥ ३९॥ दूतें जावूनि सत्वर॥ प्रधानां सांगती प्रत्युत्तर॥ सवें देवूनि काढिकर॥ पाठविलें तया-
सि॥ ४०॥ हेर करती रायासि जोहार॥ पत्रिका घेवूनि केला बैसकार॥ उकलून वाची नृपवर
॥ लिहिला अवघा वृत्तांत॥ ४१॥ पत्रिका जंव जंव वाचित॥ तंव नेत्रीं सुटले अश्रुपात॥ जो वि-
चार घडला होता विपरीत॥ शूरसेन कां तेसी॥ ४२॥ राजा उठिला सत्वर॥ राणीस केला हे कार
॥ मग निघाली वेगयमूत्र॥ भेटी कारणें॥ ४३॥ नगरद्वारीं होते प्रधान॥ अवघे येकवट होवू-
न॥ दळादिपति बोलावून॥ ह्मणे नगरी श्रृंगारा॥ ४४॥ रा॥ निघाला सत्वर॥ लागला वाजं
त्र्यांचा गजर॥ तेणें नादें अंबर॥ गर्जत असे॥ ४५॥ येरयेरां दृष्टादृष्टी जाली॥ भद्रसेन उत
रला तळीं॥ धावूनि आला सेजवळी॥ बळिसेनाचे॥ ४६॥ मग घातले दंडवत॥ भद्रसेन हृदईं
आलिंगित॥ दुसरा भेटला सुदेव प्रसिद्ध॥ मज पुत्रमुख दाखविलें॥ ४७॥ तंव आला शूरसे-

न॥ हृदईं आलिंगिला भद्रसेन॥ मिठी पडली गहन॥ कांहीं केल्या न सुटे॥ ४८॥ प्रेमभरलें सबळ॥ अश्रुपातें दळे नेत्रकमळ॥ प्रेम वृनि निढळानिढळ॥ देती चुंबन येकमेकां॥ ४९॥ तंव आली ॥५॥
शूरसेनमाता॥ पुत्रें चरणीं ठेविला माथा॥ आंवरूनि यरिंच्या वरि त्वरित॥ योसंगा धरी नावेक॥ ५०॥ मुख आनंदें चुंबी देखा॥ मर्यादा नाहीं त्या सुखा॥ अश्रुपात ढळती देखा॥ ते पडती शूरसेनावरी॥ ५१॥ सोडूनि शूरसेन॥ करी कुरवाळी बळसेना॥ पारणें केलें गा नारायणा॥ पुत्रासि भेटविलें॥ ५२॥ मग भेटली तेसून॥ भद्रसेनां केलें नमन॥ येरें पाठिसी धरिली आलिंगुन॥ मग काय करिता जाला॥ ५३॥ माथ्याची सोडिली वीरगुंठी॥ सुनेच्या चरणीं घातली मिठी॥ तुज करितां जाली पुत्राची भेटी॥ चरण केशीं झाडिन॥ ५४॥ ह्मणें बहुत कष्टविलें तुज॥ मुख पाहातां येत से लाज॥ तूं बोलली सपेज॥ ती केली यथार्थ॥ ५५॥ जिजीमामाजी स्वामी॥ इतुकें जरी न करितें न तुह्मी॥ तरीं सर्व लाभा नेंमी॥ पद् हें कैसेन पावतें॥ ॥५६॥ तुह्मी वडील देवासमान॥ मी घालीन लोटांगण॥ तुमच्या प्रसादें भ्रताराचे चरण॥ मज लागीं प्राप्त जाले॥ ५७॥ तंव सासू आली तेथें॥ धावूनि माथा चरणीं ठेविन॥ येरी प्रेमें आलिंगित॥ तुज करितां पुत्रमुख देखिलें आह्मी॥ ५८॥ थोर तुवां नवल केलें॥ आह्मा अवघियां उद्धरिलें॥ जें वचन मातां बोलिलें॥ तें केलें यथार्थ॥ ५९॥ ऐसी स्तुती करितां परस्परें॥ ॥६॥
प्रधान भेटती आदरें॥ दोन्हीं दळें एकाकारें॥ आलिंगिती येकमेकां॥ ६०॥ अवघे मिळून ये-

वि०च० कत्र॥ प्रवेश के भद्रावती नगर॥ वाजंत्र्यांचा एक गजर॥ आनंदें अंबर गर्जत से॥ ६१॥ थोर आ अध्याय
नंद जनासी॥ वोवाळणी देती याचकांसी॥ धान्यें याकिती दाहीं दिशीं॥ राजपुत्रावरूनियां ६
॥ ६२॥ पुढें चाले बळसेन॥ मध्यभागीं शूरसेन॥ पाठीं असे भद्रसेन॥ येती थोकत थोकत ॥ ६३॥ ऐसे प्रवेशले राजमंदिरीं॥ रत्नदीप वोंवाळिती नारी॥ भद्रसेन कांता कुरवंडी करी॥ मुदयो वाळी दोघांतें॥ ६४॥ तंव जाली भोजनवेळा॥ आरोगणें जालीं सकळां॥ थोर करिती सोहळा॥ शूरसेनासी॥ ६५॥ तो दिवस ऐसा क्रमला॥ तंव सूर्यउदय जाला॥ शूरसेना राज्याभिषेक केला॥ भद्रसेनें स्वानंदें॥ ६६॥ राज्य अवघें वळकाविलें॥ आण खी अमित्रीं होतें जें घेतलें॥ तें अवघें सोडविलें॥ जावया आपल्या नगरासी॥ ६७॥ जाचूनि आपुल्या नगरासी॥ राज्य करी प्रतापेसी॥ विवाह करूनि परियेसी॥ नांदे पुत्रकळत्रीं॥ ६८॥ अवघे आपलाले गांईं नांदती॥ इतकी कथा रांधा सांगे पद्मिनी प्रति॥ उडूनि बैसला मागुती॥ भिंतीयरि चित्री चा चित्रीं॥ ६९॥ तो विस्मय राजा करी॥ ह्मणे राघोनें कथा सांगीतली बरी॥ रात्र क्रमिली धुरंधरी॥ निद्रा न येचि ऐकतां॥ ७०॥ एक प्रहर क्रमिली रात्री॥ दुसरा प्रहर जाला प्राप्ती॥ साळुंखी जाली सांगती॥ तें सांगे हरिदासा॥ ७१॥ इतिश्री विक्रमकथा॥ हरिदास होय सांगता॥ ते ऐकावी श्रोतां॥ एकचित्त करूनियां॥ ७२॥ इतिश्री विक्रमचरित्रे॥ षष्टोध्यायाः॥ ६॥ श्रीकृष्णार्पणमस्तु॥ १ ॥ ५॥ ५॥ १७२॥ ५॥ ५॥

श्रीगणेशायनमः ॥ श्रीसरस्वत्यैनमः ॥ रांवाउठूनि गेला स्वस्थानीं ॥ तंव वेताळ काय करी क-
रणी ॥ साळुंखींत प्रवेशूनी ॥ काय केलें विपरीत ॥ १ ॥ चित्री हूनि उडाली ॥ घेऊनि चौरंगीं बैस
ली ॥ पंख झाडूनि कुरवाळी ॥ सुखें करूनियां ॥ २ ॥ तंव विक्रम ह्मणे साळुंखिसी ॥ निद्राये
त असे आह्मासी ॥ जरीं कांहीं कथा सांगसी ॥ तरीं वेळ क्रमेल ॥ ३ ॥ पहिली रांव्यानें सांगीत
ली कथा ॥ कर्मणूक जाहाली प्रथम प्रहरीं तत्वतां ॥ तूं जरीं अपूर्व अनुवाद तां ॥ तरीं वेळ क्रमेल
॥ ४ ॥ रायां तूं बोलसी प्रेमीं ॥ आह्मीं असों ज याचे आश्रमी ॥ ते जरीं सांगा ह्मणती तुह्मी ॥
तरीं कथा सांगेन ॥ ५ ॥ त्यांहीं धरिलें असे मौन्य ॥ सांगा ऐसें न ह्मणती वचन ॥ तूं जरी सां-
गसी कृपा करून ॥ तरीं उत्तम पदार्थ ॥ ६ ॥ राया तुझें उदित होत सें मन ॥ तरीं परि येसी स
त्य वचन ॥ आज्ञे विरहित निळ प्रमाण ॥ कार्य न करूं सर्वथा ॥ ७ ॥ यावरी ह्मणती सख्या सा-
जणी ॥ बाई आज्ञा द्यावी वचनीं ॥ रांघोनें कथिली गुणखाणी ॥ तेणें आत्मा निवाला ॥ ८ ॥
तेणें धरिला असे अभिमान देहीं ॥ वेताळ संचरे तिच्या हृदयीं ॥ हास्य करूनि लवलाही ॥ सां
गे कथा उत्तम ॥ ९ ॥ साळुंखी रेखा थोटी दोन्हीं ॥ हांसणें बोलणें ह्मणउनी ॥ कथिती जाहाली
गुणखाणी ॥ ते ऐका श्रोते हो ॥ १० ॥ कांति ये नाम नगरीं ॥ राजा काशीश्वर राज्य करी ॥ त्या
ची भगिनी मेघराजाची अंतुरी ॥ तिचें नाम शुद्धमती ॥ ११ ॥ तिच्या भ्रतारासि जाहाली दैव
गती ॥ राज्य घेतलें आणि का नृपतीं ॥ आश्रय नाहीं बहु तारि ती ॥ मग बंधुज वळी पातली ॥ १२

सांगीतलासकळवृत्तांत॥ धाकुटाअसेतिचासुत॥ तयानामसुमंत॥ दाहावर्षांचा॥ १३॥
॥ ९ ॥ सुखेंअसेआमचेघरीं॥ कांहींचिंतायोनकरी॥ होणारगतजाहालीजरीं॥ पूर्वदत्तासीकां
हींनचले॥ १४॥ तेअसतांबंधुचेघरीं॥ कायजाहालीनवलपरी॥ तीआयकावीचतुरी॥ अपू
र्वतापैं॥ १५॥ रायाचीकन्यामालती॥ तेसुलक्षणगुणवंती॥ तिच्यास्वरूपाचीनिगुती॥ दु
सरीरतीजाणपां॥ १६॥ कोणेयेकेदिवसीं॥ खेळतांदेखिलेंनंदीनीसी॥ बोलावूनिकौतु
केंसी॥ मांडीवरीबैसविली॥ १७॥ करूनिमुखचुंबन॥ ह्मणेआईकमाझेंवचन॥ तूंतंववि
द्याअभ्यासपठण॥ करीतजावें॥१८॥ बोलावूनिपंडितासी॥ लेहूंसिकवावेंबाळेसी॥ बु
द्धियुक्तिप्रकारेसी॥ सांगतजावें॥ १९॥ तेलेहूंजातांदिनाप्रती॥ ठाउकेंजाहालेंशुद्धमती॥
रायासिह्मणेंमालतीसांप्रातां॥ सुमंतासिलेहूंसांगणें॥ २०॥ पाच्यारूनिपंडिता॥ विद्या-
सांगावीमालतीसुमंता॥ भेदाभेदनकरितां॥ करवावाविद्याअभ्यास॥ २१॥ साळेजातां
दिसघडी॥ दोघांसिपडलीगडी॥ नविसंभती घडी घडी॥ येकमेकासिपैं॥ २२॥ उठूनि
यांप्रभातीं॥ येकमेकांपाच्यारिती॥ ह्मणतीचलाजाऊंसाळेप्रती॥ उसीरजाहालियापंडि
तकोपेल॥ २३॥ दोघांवरीपडलीमेळी॥ वेगळींनव्हतीकवणेकाळीं॥ विद्याअभ्यासेंजा-
हाली॥ दोघांजणासी॥ २४॥ दोघेहोतेमेहुणाळी॥ परस्परेंकरितीरळी॥ सुमंतह्मणेबोबा- ॥१॥
ळी॥ नकरीविनोदेंआह्मांसी॥ २५॥ वृथाविनोदकरिसी॥ नरींकायमाझीस्त्रीहोसी॥ ये-

वि० च ह्मणेंदंढावतूंकरिसी॥ नरींकायस्त्रीहोतांअपूर्वअसे॥ २६॥ यावरीबोलेसुमंत॥ ऐकयाचा अध्याय
वृत्तांत॥ येखादाराजासमर्थ॥ तेथेंतुजदेईल॥ २७॥ तुझेंअसेधाकुटपण॥ नबोलवेपित- ७
यासन्मुखजाण॥ जेंतोकरीलप्रमाण॥ जाणपांवोसुंदरी॥ २८॥ मगमीराहीनदीनरूप॥
तुजपणिलयेखादानृप॥ म्यांधरावाअहंताप॥ हेंपूर्वींचविच्यारावें॥ २९॥ मालतीह्मणें
सुमंताप्रती॥ तुजविरहितजेपुरुषअसती॥ तेजाणावेनिश्चिती॥ सकळबंधुसमान॥
३०॥ हेंमाझेंभाकदान॥ यदर्थींनकरीअनुमान॥ तूंअसूंदेनिश्चितमन॥ हानिर्धारपैंमा-
झा॥ ३१॥ ऐकूनितिचेंअनुसरवचन॥ सुमंतह्मणेंमाझाहीनिर्धारजाण॥ तुजवेगळीस्त्री
मजकारणें॥ म्यांमातेसमानमानिल्या॥ ३२॥ ऐसादोघांजाहालाक्रियानेम॥ येकमेकां-
अतिप्रेम॥ कोणांनकळेत्यांचेंवर्म॥ ऐसेबहूनदिवसक्रमिले॥ ३३॥ तंवकोणेयेकदिनी
॥ रायेंदेखिलीतेनंदिनीं॥ योवनदशादेखूनी॥ मगविच्यारीमानसीं॥ ३४॥ ह्मणेमाल
तीजाहालीउपवर॥ यथायोग्यपाहावावर॥ ऐसेंयोजितांजाहालानृपवर॥ बोलावी
प्रधानासी॥ ३५॥ मालतीजाहालीवराजोगी॥ नोवराविच्यारावायथायोगी॥ आह्मा
समतुल्यजगीं॥ कीर्तिघोषजयाचा॥ ३६॥ प्रधानह्मणेजीराजा॥ वरविच्यारकरीनवो-
जा॥ पाच्यारूनियांद्विजा॥ मुहूर्तबरवाविच्यारा॥ ३७॥ तंवनिघालातात्काळ॥ अदित-
वारहस्तनिर्मळ॥ त्रयोदशीजाहालियाप्रातःकाळ॥ अमृतसिद्धियोगबरवा॥ ३८

इतुकें द्विज बोलिला ॥ रायें प्रधानासि निरोप दीधला ॥ तो आपले स्वगृहासी आला ॥ सा
।।३।। रीआरोगणेसी ॥ ३९ ॥ ते निशी नंव क्रमिली ॥ पूर्वदिशा उजळली ॥ सूर्योदया काळीं ॥
प्रयाण करिता जाहाला ॥ ४० ॥ निघाला उत्तरदिशेसी ॥ हिंडनगेला ब्रह्मपुरीसी ॥ जा-
ऊन भेटला रायासी ॥ राव भेटला प्रीतीनें ॥ ४१ ॥ करी षोडशोपच्यारी पुजा ॥ नम्र उत्त-
रीं पुसे राजा ॥ अंतरभाव वोजा ॥ सांगावा ह्मणनसे ॥ ४२ ॥ प्रधान सांगे वृत्तांत ॥ राजा
ह्मणतसे येक असे आमचा सुत ॥ जरीं तुह्मा वाटेल हितार्थ ॥ तरीं मनासि आणिजे ४३
येरु ह्मणे बोल वाजी त्वरीत ॥ रायें पाठवूनि पुरोहित ॥ घेवूनि आला नृपसुत ॥ अति सुं
दर सुलक्षण ॥ ४४ ॥ प्रधान लक्षी लक्षण ॥ तंव तो सर्वगुणीं संपूर्ण ॥ देखूनि आनंदलें
मन ॥ प्रधानाचें तेधवां ॥ ४५ ॥ नवरा आला विच्यारासी ॥ परस्परें सांगती नक्षत्रासी ॥ छ
त्तीस गुण दोघांसी ॥ घटितार्थ निघाला ॥ ४६ ॥ वैशाख शुद्ध पंचमीसी ॥ लग्न धरिलें नि
र्धारेसी ॥ करूनियां शब्द निश्चयासी ॥ प्रधान निघता जाहाला ॥ ४७ ॥ आला आपु-
ल्या नगरासीं ॥ वृत्तांत सांगीतला काशीश्वरासी ॥ ह्मणें उत्तम नवरा ब्रह्मपुरीसी ॥ रा-
याचा पुत्र सुलक्षण ॥ ४८ ॥ राजा आनंदला मानसीं ॥ निरोप दीधला प्रधानासी ॥ करा-
ह्मणती सामग्रीसी ॥ न करावा विलंब ॥ ४९ ॥ ही ऐकूनियां मात ॥ मालतीस सांगे सु- ५३॥
मंत ॥ ह्मणे ण गेला तुझा व्यर्थ ॥ वर निर्धार ब्रह्मपुरीं ॥ ५० ॥ मालती ह्मणे सुमंताते ॥

वि० च० तुवां न धरावें संशयातें ॥ म्या देह अर्पिला तुतें ॥ हें अन्यथा केंवी होइल ॥ ५१ ॥ जंव लग्न सम- अध्याय
ई येईल वर ॥ तंव वरी धरावा धीर ॥ न करी अन्यत्र विच्यार ॥ दृढ होऊनि राहावें ॥ ५२ ॥ इतु ७
कायें कांत केला ॥ पुढें काय विच्यार घडला ॥ तो सांगिजे वहिला ॥ कृपा करूनि स्वामियां
॥ ५३ ॥ सकळ सामग्री केली उभयतां ॥ रायास मूळ पाठविलें समस्तां ॥ इष्टमित्र स्वकुळा
सहितां ॥ बोलाविता जाहाला ॥ ५४ ॥ उभारिला यज्ञमंडप ॥ देशोदेशीचे आले नृपती
वऱ्हाड मिळालें अमुप ॥ वाजंतरें गर्जती ॥ ५५ ॥ ठाईं ठाईं नृत्यांगना नाचती ॥ याचक-
जनां नाहीं निती ॥ ब्राह्मण वेदमुर्ती ॥ महा तपस्वी नृपवर ॥ ५६ ॥ तंव वऱ्हाडी आले
असंख्यात ॥ रथ कुंजरां ला नाहीं नीत ॥ पायभारा नाहीं गणित ॥ वाद्यें करून गगन ग
र्जे ॥ ५७ ॥ उतरले नगरा बाह्य प्रदेशीं ॥ ठाउकें जाहालें काशीश्वरासी ॥ राजा निघाला वे-
गेंसी ॥ सीमंतपूजा घेवूनि ॥ ५८ ॥ जाहाली सेवती रुखवत ॥ वरपूजा करी नृपनाथ ॥ न
गरीं प्रवेशले त्वरित ॥ जानवसा दिधला ॥ ५९ ॥ क्रमिली ते थें तिशी ॥ देवकस्थापन
दुसरे दिवसीं ॥ ऐसें लग्न निर्धारेसी ॥ रात्री घटिका सोळाचें ॥ ६० ॥ जाहाला असे स
यंकाळ ॥ राजा निघाला वरासि मूळ ॥ नगरनारी तंव सकळ ॥ मिरवत निघाल्या ॥ ६१
नोवरी गोरी हरा वैसली ॥ घरचीं अवघीं निद्रिस्त जाहाली ॥ मालती काय करी ते वे
ळीं ॥ तें अपूर्व परिसा ॥ ६२ ॥ राजाजात असे मिरवत ॥ कोण्ही कोण्हां नोळखत ॥

माघाराफिरलासुमंत ॥ आपुल्याराज्यमंदिरीं ॥ ६३ ॥ मालतीहोतीगोरीहरीं ॥ तेउ
ठूनिआलीबाहेरी ॥ सुमंतासीखुणेंपाच्यारी ॥ तोहीआलासमीप ॥ ६४ ॥ ह्मणेंआ
तांकरावेग ॥ अश्वशाळेसिअसेतुरंग ॥ द्वादशयोजनचालेमार्ग ॥ येक्यामुहूर्तांम-
ध्यें ॥ ६५ ॥ तोजायआणझडकरी ॥ येरुनिघालाभितरीं ॥ पाहाणुनीतयेअवसरीं ॥ शीघ्रघेवू-
निआलापैं ॥ ६६ ॥ घेतलींवस्त्रेंअळंकार ॥ रत्नजडितमनोहर ॥ दोघेंचढूनीतुरंगावर ॥ नग-
राबाहेरपैंआले ॥ ६७ ॥ वेगींआलेआम्रवनांत ॥ तंववर्तलेंविपरीत ॥ नवरत्नांचाहारत्वरि
त ॥ गोरीहरींराहिला ॥ ६८ ॥ ह्मणेविसरलेंपैंहार ॥ नवरत्नाकारमनोहर ॥ सुमंतह्मणेनाघेक
होईस्थिर ॥ तंवमीहारआणितों ॥ ६९ येरीह्मणेंघडिलाअंधकार ॥ नेणतआलाजरींतस्कर
॥ येरुह्मणेंमीकरीनहुंकार ॥ खुणनिरुतीजाणपैं ॥ ७० ॥ ऐसेंह्मणूनिनिघाला ॥ राजमंदिरीं
प्रवेशला ॥ गोरीहरीचाहारघेतला ॥ तेथूनिनिघालापवनगती ॥ ७१ ॥ तंवयेथेंकायवर्त
लाविच्यार ॥ आम्रझाडींतहोतातस्कर ॥ तेणेंऐकिलाशब्दगजर ॥ उठूनिआलाअश्वाज
वळीं ॥ ७२ ॥ अश्वेंतस्करदेखिला ॥ कानमेटावूनिहंकारिला ॥ तंवतस्करेंहुंकारला ॥ ये-
रीह्मणेंबैसातुरंगीं ॥ ७३ ॥ रात्रपडलीकाळोखी ॥ कोण्हींकोण्हानोळखी ॥ मालतीमनींशं
कालेखी ॥ रात्रींबोलूनयेवचनासी ॥ ७४ ॥ वारूजातअसेपवनगती ॥ दरीदरकुटेंलंघि-
ती ॥ तंवअरुणोदयाचेअंतीं ॥ पूर्वदिशाउजळली ॥ ७५ ॥ नानापरिचेविहंगम ॥ परस्परें

बोलतीउत्तम ॥ तोआइकूनिअनुक्रम ॥ मालतीबोलेतस्करासि ॥ ७६ ॥ बोलेभाषासंस्-
कृतीं ॥ तस्करानकळेमती ॥ ह्मणवोनिहोयअवलोकिती ॥ फिरूनिवदनपाहेत्याचें ७७
जंवअवलोकीवदन ॥ तंवनदेखेनासिककर्ण ॥ येकहस्तगेलाछेदून ॥ मणगटापासोनि-
यां ॥ ७८ ॥ दिसेकर्कोटककाळा ॥ जीवथोरकंटाळला ॥ जरींकांहींकरीनचाळा ॥ तरीं-
हामारील ॥ ७९ ॥ जिवींधरूनिदृढभाव ॥ यांसिंकांहींकरावाउपाव ॥ जेण्हेंतुटेसंबंध-
भाव ॥ यातस्करांचा ॥ ८० ॥ उदयजाहालादिनकरासी ॥ तंवपुढेंदेखिलेंनगरासी ॥ चोर-
ह्मणेंमालतीसी ॥ येनगरींवस्तीआह्माअसे ॥ ८१ ॥ चलाआमुच्यामंदिरा ॥ सुखेंचालवीघ
राच्यारा ॥ मालतीह्मणेगातस्करा ॥ ऐकमाझेंवचन ॥ ८२ ॥ दिवसाजरींनगरांतजासीख ॥
राजदूतजरींदेखतील ॥ येखादाअनर्थहोईल ॥ मजनेतीलहिरोनियां ॥ ८३ ॥ तूंपाव-
सीलबंधन ॥ ऐहिकनापरत्रजाण ॥ माझेंभाग्यगहन ॥ तुजसारिखानमिळे ॥ ८४ ॥
ळेची ॥ २७ ॥ योगियासी तुझें ध्यान ॥ सिद्धासि तुझें चिंतन ॥ मुनिजन करिती स्तवन ॥
तुझें चि जाण अंबिके ॥ २८ ॥ तूं ध्यान तूं धरणीं ॥ तूं जीवन तूं जिवायोनी ॥ तूं माय तूं मो
हनी ॥ अहो मायेअंबिके ॥ २९ ॥ वाचा ऐकूनि श्रवणीं ॥ थोर उल्हासली मनीं ॥ मज तुष्ट
ली भवानीं ॥ भय नाहीं काळाचें ॥ ३० ॥ ऐसी जंव स्तुति करी ॥ तंव अदृश्य वाचा जाली अंत-
रीं ॥ ह्मणे पद्मिनी चिंता न करी ॥ तुज शिवदास हरिदास भेटती ॥ ३१ ॥ नस्वीकारी उदक
अन्न ॥ घालून बैसली पद्मासन ॥ ऐसें मांडिलें निर्वाण ॥ हृदई ध्यान रेणुकेचें ॥ ३२ ॥ आ
लिया ब्राह्मणातें ॥ नमन करी आदरें बहुतें ॥ गंध धूप दीप तांबूलातें ॥ आपुल्या करें स-
मर्पि ॥ ३३ ॥ इतुकें तेथें वर्तलें ॥ तंव हरिदासें काय केलें ॥ रात्रीं स्वप्नातें देखिलें ॥ निज रू
वत्व शिवदासाचें ॥ ३४ ॥ थोर कासाविस जाला ॥ मग उठूनि बैसला ॥ ह्मणे म्यां नेम होता
केला ॥ चहूं मासा येईन ह्मणूनी ॥ ३५ ॥ तरीं आजि भरले त्यारि मास ॥ उरले असती सा
त दिवस ॥ आज्ञा पुसोन गुरूस ॥ जाईन मी झड करी ॥ ३६ ॥ उदयातें पावला दिनकर ॥
ऋषीस केला नमस्कार ॥ सांगितला स्वप्नीचा विचार ॥ नेम होता चौमासांचा ॥ ३७ ॥ आजि

चाअधिकदिवस॥नेणोकायजालेंत्यास॥पुनरपिनमस्कारगुरूस॥आतांआज्ञामजदे
ई॥३८॥गुरुह्मणेंहोयजयवंत॥कल्पिलेंतेंहोयप्राप्त॥उपदेशीसंजीवनीमंत्र॥आणिदे
ईगमनपादुका॥३९॥ह्मणेघेवूनिकरीचिंतन॥पावसीनिःशेषचिंतिलेंस्थान॥गुरुसी-
घालीलोटांगण॥पादुकांचरणीं लेईला॥४०॥विवरद्वारमनीं चिंती॥तेव्हांनलगतां ने-
त्रपाती॥पावलाविवरद्वाराप्रती॥भितरींकरीप्रवेश॥४१॥अवलोकीसभवनें॥तंव
नदेखेपद्मिनीतें॥पलगींदेखूनिनिद्रिस्तातें॥मगतयाजवळीगेला॥४२॥पीतांबरउघ
डोनिपाहे॥तंवएकलानिजरूपआहे॥फिरोनिजंघलक्षुनिपाहे॥तंवशस्त्रजळतांदेख
लें॥ ४३॥शस्त्रबाहेरकाढित॥संजीवनमंत्रजपत॥ शस्त्रकरींघेवूनित्वरित॥त्याचीधा-
रापुसिली॥ ४४॥शिवदासहोतापलंगींमृत॥तोउठिलाआंगमोडित॥ धावूनिआ-
लिंगनदेत॥हरिदासातें ॥४५॥पुसेकायजालीपद्मिनी॥शस्त्रासिअग्निप्रवेशकेला
कोण्ही॥कोणआलीहोतीकुट्टिणी॥हेंमजप्रतीसांगपां॥४६॥ शिवदासवृत्तांनसांगत
॥हरिदासजालाविस्मित॥थोरघडलाअनर्थ॥आतांकैसेंकरावें॥४७॥ मंदिरअवघें
पाहिलें॥होतेंजेथेंतेथेंचिठेविलें॥तेंतैसेंचिसांपडलें॥जेथिचेंतेथेंपैं॥४८॥करोनिअव
घाधांडोळा॥आलापलंगाजवळा॥तंवरत्नेंदेखिलींडोळां॥ह्मणेपद्मिनीच्याहाराची॥४९
रत्नें॥तीं पलंगीं॥तीघेवूनिलागलेमार्गी॥आलेविवरद्वारामध्यभागीं॥तेथेंच्याररत्नें

देखिलीं॥५०॥त्याचमार्गेंचालती॥रत्नामागेंरत्नदेखती॥हरिदासह्मणेरायाप्रती॥ आ
ह्मापद्मिनीवश्यअसे॥५१॥दोघांजालाअतिउल्हास॥रत्नेंवेचोनिघालतीवोटिस॥ गे
लेहेमदेशास॥तेथेंशुद्धिलागली॥५२॥वेगींपावलेहेमपुरीं॥जालेब्राह्मणवेषधारी॥
जावूनियांमहाद्वारीं॥द्वारपाळींरायाजाणविलें॥५३॥वेगींबोलावूनितयासी॥पाट
विलेपद्मिनीपासी॥तेदेखूनितयासी॥नमस्कारकरितीजाली॥५४॥ केलेंचरणक्षाळ
ण॥गंधधूपदीपमाळासुमन॥यथायुक्तकरीपूजन॥थोरब्राह्मणह्मणवोनि॥५५॥
तुह्मीघराजवळींबैसावें॥तुळजेचेंस्मरणकरावें॥जनपाहातसेस्वभावें॥तिघांचेंये-
कचित्तपैं॥५६॥पौषशुद्धत्रयोदशी॥भेटीजालीतिघांसी॥मर्यादानाहींत्यासुखासी॥
तेंकोणासीकळेना॥५७॥विधियुक्तरचिलेंहोमकुंड॥होमद्रव्येंमेळविलींउदंड॥समिधा
काष्टेंमेळविलींप्रचंड॥तींकुंडाकाठींठेविलीं॥५८॥क्रमिलादिनचतुर्दश॥ब्राह्मणंस्था-
पितीअग्नीस॥रजनींकेलाप्रकाश॥श्रुतिवचनेंकरुनी॥५९॥अवदानेंदेतीसकळांस
॥वेदविधिमंत्रघोष॥तृप्तकेलेंसर्वांस॥विबुधाआणिगंधर्वां॥६०॥ पूर्णाहुतिचेसमईं॥
तेबोलाविलीशामाई॥ह्मणेजितुक्यावस्तुअसतीभांडारगृहीं॥त्यायासमईंपूजेसिआ
णाव्या॥६१॥तंवतीगेलीधांवत॥सकळवस्ताघराजवळीठेवित॥बहुशोभेनेंशोभित
॥त्यामध्येंपदकहीअसे॥६२॥रत्नेंपूजावीविधान॥पूर्णाहुतिकेलीपूर्ण॥ब्राह्मणासिदि

धलीं दानें ॥ जेंजें विधान बोलिलें ॥६३॥ मग उगवला सुभानु ॥ शांन केला हुताशनु
॥३॥ ॥ पाकसिध्दि जालें अन्नु ॥ सकळीं स्नानें केली पैं ॥६४॥ स्नानें केलीं हो सकळीं ॥ भोज
नें जालीं यथाकाळीं ॥ विडे सुमनें परिमळीं ॥ पूजिलें ब्राह्मणासी ॥६५॥ सकळ दिली
पाठवणी ॥ सत्वर जेविली पद्मिनी ॥ गृहांत बोलाविली रांधावणी ॥ तें अपूर्व परियेसा
॥६६॥ तिस ह्मणे थोर कार्य वाद केला ॥ नवसिला नवस फळला ॥ कांहीं उतराइ न
व्हे तुजला ॥ नाठवे मम मानसीं ॥६७॥ त्वां केला उपकार ॥ जन्मवरी न पडे विसर ॥
आतां पूजा तुम्ही करूं सत्वर ॥ ह्मणोनि आसनी बैसविली ॥६८॥ हळुच लांवलें कपा
ट ॥ हरिदासासि खुणावी बरवंट ॥ आधीं पूजी मस्तक लल्हाट ॥ मग गात्रें पूजावीं ॥६९
हातीं घेतली कवाड अर्गळा ॥ मस्तकीं घाव दिधला सबळा ॥ त्याणें रांड जाली व्याकुळ
॥ दुसरा घाव दिधला ॥७०॥ जीव गेला किंवा आहे ॥ अर्गळेनें हालवोन पाहे ॥ यमलो
कीं चिरंजीव होय ॥ नर्क भोगी यथेष्ट ॥७१॥ मग तेउताणी पाडिली ॥ हृदईं अर्गळा ठे
विली ॥ शामाईची शांति केली ॥ भोगी सोहळे पद्मिनीचें ॥७२॥ वस्त्ता होत्या अनेक ॥
त्या घेतल्या सकळिक ॥ पद्मिनी लेइली पदक ॥ अतिआनंदें करुनी ॥७३॥ हरिदा-
सें पादुका घातल्या पदीं ॥ दोघे बैसविलिं दोहीं स्कंधीं ॥ लयलावोनि श्रीगुरुपदीं ॥ ॥३॥
विचारिला हार चिंतलें ॥७४॥ उडाला अंतर्गत ॥ विवरद्वारा पावला त्वरित ॥ पद्मिनी जाली

वि॰ च॰ विस्मित ॥ थोर गति पादुकांची ॥७५॥ तिघें प्रवेशलीं विवरीं ॥ मग हे मनगरीं काय क- अध्या॰
री ॥ ते कथा सविस्तरी ॥ श्रोते जननें परिसावीं ॥७६॥ अस्तमाना गेला दिनकर ॥ रांधाव ११
णीस बोलवा ह्मणे नृपवर ॥ राणिवसा केला हाहाकार ॥ त्या ह्मणती पद्मिनी कडे असे
ल ॥७७॥ धांवत आले दूतनिकर ॥ तंव कपाट लाविलें बळकर ॥ शब्दें बोलती उत्कट ॥
परि कोणी नेदी प्रत्युत्तर ॥७८॥ रायासि मात जाणविली ॥ कवाडें देवोनि घातली खि-
ळी ॥ लोटित होते महाबळी ॥ परि कदा उघडेना ॥७९॥ हाका मारिल्या थोर शब्दीं ॥ प-
रि कोणीं प्रत्युत्तर नेदी ॥ बरवी करा ह्मणे शुद्धी ॥ भितरी निघोन पाहावें ॥८०॥ राजाआ
ला अतितांतडी ॥ झडकरी आणविली कुराडी ॥ न लगतां अर्धघडी ॥ दोन्ही कपाटें फोडिलीं
॥८१॥ तंव भितरीं पडलिसे राधावणी ॥ करचरण पसरोनि उताणी ॥ तेथें न देखती प-
द्मिनी ॥ वस्त्ता आणि पदक ॥८२॥ आंहाकट कटाकरी ॥ कोण्ही नेली पद्मिनी सुंदरी ॥ शा
माई जालि हे परी ॥ हारविल्या वस्त्ता पदक पैं ॥८३॥ आंग धरणी घरटाकिलें ॥ दुःखें हृ
दय पिटिलें ॥ ह्मणे निधान हातिचें गेलें ॥ आतां काय जिणे पैं ॥८४॥ जें कार्य न व्हे प्रधाना
सी ॥ तें साधलें रांधावणिसी ॥ इतुका पराक्रम कोण्हासी ॥ म्या नाहीं देखिला ॥८५॥ रु
दन करी नानापरी ॥ प्रधान संबोखी उत्तरीं ॥ तुज आयुष्य जालें तरी ॥ द्रव्यराशि किती
मिळतिल ॥८६॥ अमित असे परिवारु ॥ येका देराज्याचा लोप करूं ॥ धरी पुरुषार्थ धि

र॥उठविलाभद्रायासी॥८७॥राजानेंलामधानजनीं॥तोबैसलासिंव्हासनीं॥प्रेनवा-
हकेंनेलीरांधावणी॥तिसअग्निचेतविला॥८८॥तिघेंजणविप्ररांतअसती॥कायबु
द्धियोजिलीचित्तीं॥दोघेपडिलेचिंतावर्ती॥मातापितयांचें॥८९॥आह्माजालींवरुषेंबा
रा॥कोणगतीमातापितरां॥आतांजावेंनगरा॥रत्नपुरीसीनिर्धारें॥९०॥मगठेविला
द्रव्यभार॥मेळविलाअमितपरिवार॥रथघोडेकुंजर॥ठेविलेमोगरपायांचें॥९१॥ग
णनांनाहींद्रव्याशीं॥हिरेमाणिकेंरत्नासी॥पाचुपेरुजगोमेदासी॥वस्त्रेंआभरणें-
अमित॥९२॥पहिलेहोतेराक्षसाचें॥अधिकआणिलेंहेंमनगरीचें॥देणेंनकळेशंकरा
चें॥प्रयत्नेंसाधिलेंअसे॥९३॥ऐसेंसर्वहीसिध्धजालें॥मगतेथूनप्रयाणकेलें॥निशा
णींघावघातले॥दुमदुमिल्याप्रचंडभेरी॥९४॥आलेरत्नपुरीदेशांत॥मेंटकरींजाण-
विलीमात॥रायापरचक्रआलेंबहुत॥नेणवेकोण्हाचेंपैं॥९५॥सैन्यआलेंअसेअपार
॥परिकोण्हासिनकरितीनिकर॥येतआहेस्थिरस्थिर॥अतिनिगुतिकरोनियां॥९६
आह्मीसैन्यांतविचारिलें॥कवणेदेशीचेराजेपुसिलें॥परिनफुटतीगुह्यकल्होळ॥नाय-
सांगतीनृपाचें॥९७॥परिराजाप्रधानअसेनिर्मळ॥भूतदयाआणिस्नेहाळ॥सुंदरआ
णिकुशळ॥धर्मात्मादिसताती॥९८॥परिरायानसावेंनिश्चिंत॥सैन्यकरावेंसावचि ॥४॥
त॥दुर्गद्वारीचतुर्थ॥सैन्यठेवावें॥९९॥ऐकादूताचेंवचन॥पाल्हाणाह्मणेसैन्य॥दुर्ग-

 सिकेलेंरक्षण॥परिपवेष्टितअसंख्य॥१००॥डुडोडुडानिशाणेंलाविलीं॥दारुयंत्रेंपूर्ण
भरिलीं॥काष्टकारलेंठेविलीं॥बाणकाढियाविजुनी॥१॥भालेत्रिशूळलखलखित
॥असिलतादुधारीसळकत॥शस्त्रसंगमींवीरश्रीबोलत॥आपलेप्रतापें॥२॥रा-
जाअतिचतुर॥ह्मणेनाहींश्रेष्ठकुमर॥आपुलेदेहजर्जर॥नेणोयुद्धकैसेंहोईल॥३॥
परियेकसुचिन्हहोत॥सव्यनेत्रअसेलवत॥आणिदक्षिणबाहुस्फुरत॥हृदईह-
र्षनसमाये॥४॥ऐसाहर्षचिंतूनिनृपवरमानसीं॥नगराबाहेरजाह्मणेदळासी॥यु-
द्धकरावेंपरदळासी॥अतिनिःशंकहोवोनी॥५॥सैन्यचालिलेंअपार॥महावीर
थोरथोर॥वीरदेखतेजालेवीर॥मगत्यांहींकायविचारिलें॥६॥परदळआलें-
ह्मणउनी॥सिद्धजालीरत्नमणिचीवाहिनी॥येथेंहोईलथोरधरणी॥नकळतां
युद्धहोईल॥७॥ह्मणऊनिबोलाविलेंदूतासी॥पत्रिकादिधलीतयासी॥तुह्मीजा
ऊनिवेगेसी॥रत्नमणिसीभेटावें॥८॥पत्रिकेसिलिहिलेंसविस्तर॥मुखवचनीं
बोलावेंउत्तर॥शिवदासहरिदासतुमचेकुमर॥भेटावयाआलेअसती॥९॥ऐ-
सेंऐकोनिवचन॥दूतींकेलेंअसेप्रयाण॥जैसेंवायुसंगेंपत्रजाण॥तैसेनगरद्वा
रींप्रवेशले॥१०॥द्वारींबैसलेरक्षणाईत॥तयासिजाणविलीमात॥आह्मीशिव
दासहरिदासाचेदूत॥रायासिपत्रिकादिधलीअसे॥११॥द्वारपाळघेवोनिगेले

त्याहीं रायासि जाणविलें ॥ दोघे दूत द्वारीं आले ॥ ह्मणती शिवदास हरिदासाचे सेवक ॥ १२
॥५॥ ॥ आणि ह्मणती आहे पत्रिका ॥ तेथें संपूर्ण लिहिलें देखा ॥ परिसोन दूत वचन माळिका
॥ रायें प्रधानाकडे पाहिलें ॥ १३॥ प्रधान ह्मणे जी नृपवरा ॥ येथें पाचारा रायें हेरा ॥ पत्रिका-
असती हस्ताक्षरा ॥ तेणें अवघें जाणवेल ॥ १४ ॥ आपला अथवा परावा ॥ हा संशय फेडा
वा ॥ किंवा लटकिया मावा ॥ परराज्यबळ जिंकावया ॥ १५॥ तें मानलें रायासी ॥ बोला-
ऊं पाठविलें दूतांसी ॥ हेर जावोनि दूतांपासी ॥ रायाजवळीं पातले ॥ १६॥ दूतें जोहार के
ला ॥ पत्र देवोनि पुढें उभा राहिला ॥ रायें लाखोटा उघडिला ॥ वाचिता जाला ते काळीं
॥ १७ ॥ लिहिलें असे समूळ ॥ आगमनिगम सकळ ॥ राजाप्रेमें दाटला तुंबळ ॥ अश्रु-
पातनेत्रीं ढळती ॥ १८॥ अवघें आणिलें मनासी ॥ मग पत्र दिधलें प्रधानापासी ॥ तेणें च
रित्र वाचितां त्यासीं ॥ प्रेम न धरत आले ॥ १९॥ ह्मणती चला आतां जावों ॥ निशाणीं घात
ला घावो ॥ केला थोर महोत्सावो ॥ साखरवाटिते जाले ॥ २०॥ शृंगारिलें नगर ॥ सन्नि-
ध केला दळभार ॥ राजा चालिला सामोर ॥ वाद्यें अपार गर्जती ॥ २१॥ सैन्य सैन्या जा-
ली भेटी ॥ काठिकराची फिरे चिरटी ॥ मध्यें दाटली होती दाटी ॥ तेवारितें जाले ॥ २२
॥ शिवदास हरिदास चरणचाली ॥ राजा उतरला अश्वातळीं ॥ शिवदासें मस्तक ठे- ॥५॥
विलें चरणकमळीं ॥ रायें वक्षस्थळीं आलिंगिला ॥ २३॥ हरिदासें तेणें चरितीं ॥ माथा

वि॰च॰ ठेविला चरणाप्रती ॥ हृदईं धरिला अतिप्रीती ॥ मग प्रधानासि भेटले ॥ २४ ॥ मातेसि करि- अध्या॰
तीं दंडवत ॥ त्या स्नेह लोटला अद्भुत ॥ हारपलीं होतीं माशीं रत्नें अद्भुत. तीं पूर्वदत्तें करून ११
सांपडलीं ॥ २५॥ सकळांसि जाली भेटी ॥ आनंद न समाय सृष्टीं ॥ थोर दाटलिसे दाटी ॥
परस्परें करिती नृत्यातें ॥ २६॥ ऐसे प्रवेशले नगर ॥ राजमंदिरीं जाला बैसकार ॥ कथिते
जाले समाचार ॥ जो जो होता वितला ॥ २७॥ जालिया ओंघोळी आरोगणा ॥ दिन गेला अ
स्तमाना ॥ निशापति सहित तारांगना ॥ उदयातें पावला ॥ २८॥ ऐसी हरिली ती रजनी ॥
सूर्योदय जाला गगनीं ॥ स्नान संध्या करोनि ॥ काय करी नृपवर ॥ २९॥ राज्यपट्ट दिधला शि
वदासासी ॥ प्रधानत्व स्थापिलें हरिदासासी ॥ पद्मिनी मिरवली राणिवसी ॥ वडिल मान
देवोनियां ॥ ३०॥ तीं सुखें राज्य करिती ॥ राया प्रधानां अतिप्रीति ॥ इतुकी कथा सांगुनी
विक्रमाप्रती ॥ चित्रिचा चित्री मयूर गेला ॥ ३१॥ ऐका पुढील कथेचें अनुसंधान ॥ त्यारु
चित्रांगीचें कथन ॥ राजहंस करवील श्रवण ॥ तें सांगरे हरिदासा ॥ ३२॥ इतिश्री विक्रम-
चरित्र कथा ॥ हरिदास होय सांगतां ॥ ते ऐकावी श्रोतां ॥ स्वस्थ चित्तें करूनियां ॥ १३२॥
इतिश्री विक्रमचरित्रे येकादशोध्यायः ॥ आध्या ॥ ११ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ७ ॥ ७

श्रीगणेशायनमः॥ मयूरचित्रिचाचित्रींप्रवेशला॥रात्रिप्रहरयेकउरला॥ राजहंसचित्रि
हूनिउडाला॥येउनिबैसलात्र्योरंगीं॥१॥मुखींकुरवाळकरी॥पंखसाडीवरऱ्यावरी॥प
द्मिनीअतिहास्यकरी॥स्वर्णकांतिदेखोनी॥२॥विक्रमह्मणेंगापक्षींद्रा॥शरीरीं-
व्यापिलीअसेनिद्रा॥कांहींविनोदकथाशब्दमात्रा॥कथितांनिशाहरेलपैं॥३॥प
क्षिबोलेप्रतिवचन॥जरींआज्ञादेईलपद्मिण॥तरींसांगेनपवित्रकथन॥ऱ्यारुआ-
णिचित्रांगीचें॥४॥पद्मिनीसिलागलीचटपटी॥ह्मणेकथासांगेरेगोमटी॥राजहंसचं
चुपुटी॥दोनरेखावोढित॥५॥कथाऐकासावधान॥येकचित्तकरूनमन॥इंद्राचेइंद्र-
भुवन॥तेथेंअपूर्ववर्तलें॥६॥तेतिसकोटिदेवांसहित॥सभेबैसलाअमरनाथ॥नार
दतुंबरासहित॥नृत्यकरितीनायका॥७॥टाळमृदंगविणा॥सुरसगातीगायना॥
वेंकटअवलोकीइंद्राणा॥तंवतीआलीचित्रांगी॥८॥समोरदेखूनिसहस्रनयना-
तें॥स्तवितीजालीमुनिचरणातें॥इंद्रेंखुणाविलेंदंडधारियातें॥नृत्यकरीह्मणोनियां
॥९॥येरीसावधटाईची॥कासघालीपीतांबराची॥ध्वनिकेलीस्वराची॥तांडवनृत्य-
आरंभिलें॥१०॥उत्तमरागआळविला॥थैथैंशब्देंडोलदिधला॥भूमीसिनमूनिसक
ळां॥करकमळींनमितीजाली॥११॥धीमिधीमिटाळमृदंग॥सर्वश्रुतिच्यासंयोग॥रंगीं
वोटविलारंग॥इंद्रतटस्तपाहातसे॥१२॥नृत्यामध्यें नृत्यकरी॥उल्हाळदेवूनिदेतभोंव-

री॥ तंव अवचितां आली चांचरी॥ गांठन पडे टाळ मृदंगा॥१३॥ तें तंव देखूनि सहस्रनय-
नीं॥ कोपा चढला वज्रपाणी॥ ह्मणे मर मर गे पापिणी॥ तूं जाय मृत्युलोकीं॥१४॥ चि-
त्रांगी जाली भयाभीत॥ साष्टांगी घाली दंडवत॥ तुझें वचन न व्हे असत्य॥ उश्शाप द्या
वा स्वामियां॥१५॥ नाना करुणेच्या ध्वनीं॥ ग्लानता करी नाना वचनीं॥ मी पडिलिया मृ
त्युभुवनीं॥ कोण धांवा करील॥१६॥ यावरी शक्र बोले वचन॥ तुज राजकुळीं होईल ज-
नन॥ द्वादश वर्षें होईल ज्ञान॥ ती खुण ऐक सुंदरी॥१७॥ जो सांगेल चित्रकुटीचा समा-
चार॥ तोच वरील तुज वर॥ वचनाचा मानीं निर्धार॥ मग भेटसी आह्मासी॥१८॥ चित्रां
गीनें शाप अंगिकारिला॥ मग त्यासि निरोप पुसिला॥ ह्मणे आज्ञा देईं गा वहिला॥ अ
तिचिंतातुर मानसीं॥१९॥ तंव दिन जाला अस्तमान॥ केलें सचैल स्नान॥ वेगीं सारि-
लें भोजन॥ मंचकीं पहुडली॥२०॥ आत्मा निघाला तेथुनीं॥ तो उतरला मृत्युभुवनीं॥
ते मंदाकिनीच्या स्थानीं॥ कंचनपुरीं प्रवेशला॥२१॥ तेथील राजा चक्रदंतु॥ त्याची-
स्त्री होती सुस्नातु॥ सुखसेजे राजा देतां रुतु॥ तंव उदरीं चित्रांगी प्रवेशली॥२२॥ रु
तु संपूर्ण जाला॥ तो दराणीस गर्भ राहिला॥ तंव प्रातःकाळ जाला॥ रायें सारिलें सं-
ध्यास्नान॥२३॥ चालवी आपला राज्यभार॥ राणी जाली गरोदर॥ डोहोळे याचे को
ड समग्र॥ पंचम मास लोटले॥२४॥ पूर्ण भरले नव मास॥ चैत्र शुद्ध त्रयोदशीस॥ र-

विवारीं घटिका द्वादश॥ राणी रात्रीं प्रसूत जाली॥२५॥ उपजलें कन्यारत्न॥ सुलक्षण-
वंशीं गुणसंपूर्ण॥ करितां जन्मनामकरण॥ सूर्यउदयानें पावला॥२६॥ कन्या जाली
प्रथम॥ रायें केला दानधर्म॥ केलें पंचमरात्रीं सत्कर्म॥ दहा अकरा दिवस जाले॥२७
दिवसोंदिवस वाढों लागली॥ आठ वर्षांची जाली॥ रायानें आदरिली॥ वरविचार-
णा तेंधवां॥२८॥ पाठविलें प्रधानासी॥ द्विज हिंडती देशोदेशीं॥ घटित न ये कोण्हांसी
॥ ऐसीं वर्षें अकरा क्रमिलीं॥२९॥ राजा अतिचिंतातुर॥ कन्या जाली उपवर॥ थोर पडि
ला विचार॥ आतां कैसें करावें॥३०॥ वर्षें पूर्ण भरली द्वादश॥ ज्ञान जालें कुमारीस॥ बो
लावून चक्रदंतास॥ काय सांगती जाली॥३१॥ माझें आरंभावें स्वयंवर॥ देशोदेशीचे
बोलावा नृपवर॥ ध्वजस्तंभ उभारावा थोर॥ त्यास सहस्र मोटळी बांधावी॥३२॥ वित
न्ति लिहिजे मूळपत्रिकेची॥ मोटळी तोडावी ध्वजस्तंभाची॥ वार्त्ता सांगेल चित्रकुटीची
॥ तयासि कन्या अर्धराज्य देईन॥३३॥ इतुकें लिहिलें पत्रिकेसी॥ मुळें पाठविलीं रा
यासी॥ चक्रदंत संतोषला मानसीं॥ तात्काळ बांधे सहस्र मोटळी॥३४॥ हांकारिले वकु
त दूतानें॥ तया जवळ दिधलीं लिखितें॥ हांकारावें रायातें॥ देशोदेशिचियां॥३५॥ दूत
देशांतरासि गेले॥ रत्नखचित स्तंभ उभारिले॥ नगर अवघें शृंगारिलें॥ तये काळीं॥३६
दूतीं दिधल्या पत्रिका॥ वाचूनि विचारिती येकमेकां॥ ह्मणती जिवें जावें स्वर्गलोका॥ हें-

तोंअवघडअसे ॥ ३७॥पुर्वींआइकतअसोंविसनि॥पणकेलाजनकचक्रवर्ती॥ कोदंड
॥२॥ कानाडीवोढावीपुरती॥तयासिजानकीसमर्पावी॥ ३८॥ तेपरिसोनियांमात॥स्वयंव
राआलालंकानाथ॥तोगर्विष्टजालाबहुत॥वोढोंपाहे धनुष्यातें ॥३९॥ थोरआवेशालेलं
कानायक॥मुष्टिघालीधनुष्यांदेख॥क्रोधेंनधरवेत्र्यंबक॥वक्षस्थळींउलंडलें॥ ४०॥ क
रचरणरावणझाडित॥अशुद्धमुखेंतेव्हांवमत॥तेंदेखूनिगाधिसुत॥रघुनाथासिउठ
विलें॥ ४१॥ तोवचनमात्रेंउठिला॥वामांगुष्टउचलिला॥ धनुष्यकाढीनयेवेळां॥रावणह
ृदईचें॥४२॥ धनुष्यरामेंकाढिलें॥दशग्रीवाजीवदानदिधलें॥तंवविश्वामित्रबोलिले
॥राघवावोढीत्र्यंबकासी॥४३॥ ऐकूनिगुरुवचनपरवडी॥मगरामेंकाढिलेंधनुष्यवो
ढी॥ तेपरिसोनियांकडाडी॥दिग्गजकांपिन्नले॥४४॥ मगरामासिमाळघालीसीता॥
कन्यादानकरीजनकपिता॥ इतुकीऐकिलीहोतीकथा॥ परिअसापणकोठेंऐकिलाना
हीं॥४५॥द्रुपदेंकेलेंस्वयंवरातें॥रांधायंत्रमांडिलेंहोतें॥ तेंभेदिलेंपांडुसुतें॥ महावी
रअर्जुनें॥ ४६॥तिसरापणऐकिलाभृगुवंशीं॥सहस्रश्यामकर्णदेवोनिऋषीश्वरासी
॥ पर्णूनिआणिलेंसत्यवतीसी॥ऋचीकमुनीश्वरें॥ ४७॥ हापणमांडिलाअसेअवघ-
ड॥दिसतसेकोहडेदढ॥स्त्रियामिळतीउदंड॥पृथ्वीवरीकायदुकाळअसे॥४८॥ ॥२॥
सांडूनिअष्टभोगऐश्वरी॥कोणत्रिकुराजायपाचीपरी॥कायकरावीतेनवरी॥ऐसें

 दूतांप्रतिबोलती॥ ४९॥परतोनिआलेदूत॥रायातेंप्रत्युत्तरसांगत॥ थोरजालाव्य
थाभूत॥पुढेंकैसेंवर्त्तलें॥५०॥चारठाणनामनगरी॥तेथेंनाणावटिव्यवहारकरी॥
भार्यागुणवंतीसुंदरी॥पुत्रअसतीतिघेजण॥५१॥वडिलानावकोटेश्वरु॥तयाधा
कटालक्षेश्वरु॥कनिष्टकुमारनामच्यारु॥लडिवाळह्मणूनठेविलें॥ ५२॥पिताअति-
प्रीतिकरी॥लाडचालवीनानापरी॥येरुद्रव्यानाशकरी॥पिताकांहींनह्मणेपैं॥५३
तोखेळेद्यूतकर्मासी॥हारवीद्रव्याच्याराशी॥पितापुरवीतयासी॥धाकटाकुमर
ह्मणऊनि॥५४॥ऐसानांदतांबहुतदिवस॥नवज्वरजालाव्यव्हारियास॥भरले-
पूर्णआयुष्य॥तेंतयासीजाणवलें॥५५॥जवळिबोलाविलेदोघेपुत्र॥चारुनिर-
विलाबहुत॥द्रव्यअसेअपरमित॥कांहींप्रपंचउनकाकरूं॥५६॥चारुमाझाअत्यं
तलाडका॥यासिपुरवापैसाटका॥ह्मणोनिसांगतोंतुह्माआवांका॥याचारुपुत्राचा
॥५७॥च्यारुधाकुटाअसेनेंणता॥जंववरीहोयजाणता॥तंववरीपुरवावेंद्रव्यार्था॥
भेदाभेदनकरावा॥५८॥सांडोनसर्वभावनांतेअवसरीं॥व्यव्हारीदेहविसर्जनकरी॥
पुत्रउत्तरकार्यकरी॥जोजोविधिबोलिला॥५९॥जालेद्वादशतेरादिवस॥सपिंडीं
मिळवीपितरांस॥पक्षिकअष्टादशादिवस॥क्रमलावरवियापरि॥६०॥ऐसेंतेपु
त्रपौत्रींनांदत॥चारुचानेमपाळित॥द्रव्यअर्थपुरवित॥प्रीतिकरोनियां॥६१॥ बं

॥३॥ धुसिकविती मधुर वचनीं ॥ आपलें स्वकर्म उत्तम करुनी ॥ द्यूतकर्म दे सोडोनी ॥ येणें अ-
पवाद फार असे ॥ ६२ ॥ द्यूतकर्म जे करिती ॥ तयांची जाय अर्थसंपत्ती ॥ दरिद्र दशा हो
य त्यासी ॥ खेळ खेळों नये हा ॥ ६३ ॥ पाहे पुर्वी धर्मराज खेळला ॥ राज्य अर्थ हारविला ॥ बा
रावरुषें वनवास केला ॥ तेरावें नष्टचर्य गुप्तरूपें ॥ ६४ ॥ पांडवा सारिख्या घडली दशा ॥
आमचा कोणता भरवंसा ॥ हा खेळ सांडावा सहसा ॥ आजपासोनि बंधुराया ॥ ६५ ॥
बंधु करिती खटपट ॥ च्यारुन सांडी द्यूतकर्म स्पष्ट ॥ द्रव्य हारविलें उत्कट ॥ तें पुरवीस हो
दर ॥ ६६ ॥ ऐसा सिकविला नी निउत्तरी ॥ परि तो अणुमात्र जिवीं न धरी ॥ लोक सांगती प-
रोपरी ॥ परि तो न आयके कोणाचें ॥ ६७ ॥ ऐसा तो कोणे येके दिनांतरीं ॥ द्रव्य हारविलें स
हस्र वरी ॥ सवें घेवोनि जुहारि ॥ द्रव्य कोटेश्वरासि मागतसे ॥ ६८ ॥ तेणें बहुत निर्भछिला
॥ त्वां द्रव्य अर्थ सारिला ॥ जो ठेवा होता ठेविला ॥ वडिलांचा पैं ॥ ६९ ॥ तूं जाहालासि सोळा
वर्षांचा ॥ लवलेश नाहीं उदिमाचा ॥ छंद लागला द्यूतकर्माचा ॥ कोठुन द्रव्य तुज द्यावें ॥ ७०
ऐसा नाना परी हेडसाविला ॥ निष्ठुर वचनीं ताडिला ॥ जाइ जाई रे घरा बाहेर वहिला ॥ न-
दारवी मुखकमळ ॥ ७१ ॥ कोटेश्वरें दवडिला रागें ॥ जुवारी लागला से मागें ॥ येवोनि ते
च प्रसंगें ॥ मागें लक्षेश्वरासी ॥ ७२ ॥ तेण्हेंही केली बहुत वाहरी ॥ क्षोभला नाना परी ॥ हें
च देखिलें जन्मवरी ॥ ठेवा सारिला वडिलांचा ॥ ७३ ॥ येवढा थोर जालासी ॥ हारविल्या द्र- ॥३॥

वि०च० व्यरासी ॥ आली मेळवितों द्रव्य कष्टेसी ॥ रुक्यानें रुका पैं ॥ ७४ ॥ तुज नाहीं रे अभिमान गो- अध्याय
त ॥ जालासि अत्यंत निर्लज ॥ द्रव्य मागों आलासि मज ॥ काय ठेविलें होतें त्वां ॥ ७५ ॥ १२
ऐसा कठोर वचनीं ॥ चारु खोंचला शब्दबाणीं ॥ तेणें थोर दुखवला अंतःकर्णी ॥ मग जु
हारियासि काय बोले ॥ ७६ ॥ ह्मणें आजिचा दिवस जावें ॥ उदईक देईन द्रव्य स्वभावें ॥ हें
च वचन सत्य मानावें ॥ थोर उपकार होईल ॥ ७७ ॥ जुवारि आपल्या गृहासि आला ॥
मार्त्तंडाचा अस्त जाला ॥ उपवासी असे भुकेला ॥ मग प्रवेशला राणिवसा ॥ ७८ ॥ नि
घाला निज मंदिरांत ॥ राणी उपवासी वाट पाहत ॥ स्नानासि उदक दिधलें त्वरित ॥ षड
करी सारी आरोगणा ॥ ७९ ॥ तेही जेविली सत्वर ॥ सेज केली मनोहर ॥ विड्या देत से-
सुंदर ॥ अति लावण्य तये चें ॥ ८० ॥ तिची वर्णावी स्वरूपता ॥ रंभा उर्वशीची साम्यता ॥
हे आगळी पवित्रता ॥ सीता सावित्री समान ॥ ८१ ॥ पतिची सेवा करी ॥ पूजिती जाली
कोमळोत्तरीं ॥ काय चिंता वर्तलिसे अंतरीं ॥ ते मज पति सांगिजे ॥ ८२ ॥ ह्मणे वल्लभे ऐके क-
कांते ॥ आजि खेळलों बहुत द्युत ॥ द्रव्य हारविलें बहुत ॥ मागों आलों बंधुसी ॥ ८३ ॥ त्या
हीं धरिली द्रव्य आस ॥ मज केलें उदास ॥ कठिण शब्द बहु वस ॥ निंदोनियां बोलिले ॥
॥ ८४ ॥ मग मी जुवारियासि संबोखिलें ॥ उदईक देईन ह्मणितलें ॥ तेव्हां मासें येणें जा-
लें ॥ मंदिरासि पैं कांते ॥ ८५ ॥ तरी उदईक जुवारियासी ॥ गति करावी पैं कैसी ॥ चारु-

चिंतातुरमानसी॥ देखूनिप्रिया काय बोले॥ ८६॥ ह्मणेअहोजी प्राणपती॥ परि सावी ये
कविनंती॥ मासेअळंकार आहेती॥ तेजुवारियासी देइजे॥ ८७॥ इतुकानेम केला॥ तं
वसूर्यउदयजाला॥ जुवारी बोलावूनिआणिला॥ द्रव्यघेह्मणूनआपुलें॥ ८८॥ हिशोबके
लापंचोतरी॥ सहस्राचालेखाभारी॥ तितुकेंदिधलेंकरीं॥ तेणेंजुवारी संतोषला॥ ८९
मुद्दलद्रव्य घेईमासें अंकित॥ लटकेंनबोलेगायथार्थ॥ चालमाझियासांगातें॥ तुस्रा
खर्चचालवीन॥ ९०॥ थोरदाखविलीआस॥ निरोपपुसेकांतेस॥ मीजातअसेउदिमा
स॥ तूंकांहींचिंतानकरावी॥ ९१॥ येरुकरुणावचनें विनवी॥ मास्रीआठवणअसोद्या-
वी॥ कार्यसिध्धि होईलबरवी॥ ऐसेंमजगमतसे॥ ९२॥ अष्टभोगप्राप्तहोती॥ आरा
णुकनव्हेराजनिती॥ तेणेंमोहेलचित्तवृत्ती॥ तेथेंमास्राआठवकेंविहोईल॥ ९३॥ मी
जीतुमचें अर्धांग॥ कोणांचानकरीपांग॥ मनींध्यातसेश्रीरंग॥ तोजयतुह्मा देईल॥
९४॥ जैसाकृष्ण व्यापकचराचरीं॥ राहाटेसोळासहस्रा घरीं॥ परीरुक्मिणीच्या अ-
भ्यंतरीं॥ सदोदित भरलाअसे॥ ९५॥ तैसेंमजकरावेंसनाथ॥ नविसरावेंअंतर्गत॥
जरींलक्षजोडलाअर्थ॥ परीमास्राविसरनपडावा॥ ९६॥ ऐसी करुनियांविनवणी॥
माथाठेविलापतिच्याचरणीं॥ येरेंहृदईं आलिंगूनी॥ आश्वासनदिधलें॥ ९७॥ बां-
धिलीशकुनगांठी॥ कांताअवलोकिलीकृपादृष्टीं॥ तूंआहेसमास्याकंठीं॥ जाणकों

सुभबाणला॥ ९८॥ केलेंस्त्रियेचेंसमाधान॥ हृदईंस्मरेहरिचरण॥ मगकेलेंप्रयाण॥ उत्त
रदिशेपरियेसा॥ ९९॥ दिवसमार्गचालती॥ रात्रींयेखादेठाईं विश्रांती॥ भेटलियातीर्थां
प्रती॥ करितीस्नानदान॥ १००॥ सवेंअसे तोजुवारी॥ तंवपावले कंचनपुरी॥ स्नानक
रूनि मंदाकिनीतिरीं॥ आरोगणासारिली॥ १॥ परिसलीसहस्रमोटळीचीमात॥ म
गप्रवेशलानगरांत॥ बैसले होतेराखणाईत॥ तयासिपुसताजाला॥ २॥ त्यांहींसांगि-
तलावृत्तांत॥ चारुहर्षलाबहुत॥ ह्मणेंजुवारी याचाफेडावाअर्थ॥ पुढेंराजाकरोभलतें
ची॥ ३॥ ह्मणूनिउठिलासत्वरी॥ राजद्वारीचीत्राठिलीभेरी॥ वळंघलाध्वजस्तंभावरी॥
तोडिलेसहस्रमोटळितें॥ ४॥ श्रोतेह्मणतीयेकायेकी॥ कैसीतोडोदिधलीसेवकीं॥
नविचारितांअविवेकीं॥ हेंकारणसांगावें॥ ५॥ कविह्मणेजीसकळ॥ पूर्वींरायासिपा
ठविलेंहोतेंमूळ॥ तेंहेरभोवोनिआलेंसकळ॥ स्वयंवरानयेतिकोण्ही॥ ६॥ तेरायासि
पडिलीचिंता॥ मगजालाडांगोरापिटिता॥ सहस्रमोटळीतोडोभलता॥ तयासीको
ण्हीनवर्जावें॥ ७॥ जोगीजंगमसंन्यासी॥ मंगलडोरकरजोसी॥ तडीतापडीकुब्ज
कासी॥ पांगुळादिकनवर्जावे॥ ८॥ ब्राह्मणक्षत्रियवैश्यशूद्र॥ तेलीतांबोळीकुंभार
॥ यामध्येंमोटळीफोडीनर॥ ॥ त्यासिकोण्हीनवर्जावें॥ ९॥ इतुकीजालीहोतीनिगु
ती॥ पूर्वींचिसांगीहोतीदूताप्रती॥ यदर्थींराखणाइतीं॥ चारुलागिवर्जिलेंनाहीं १०

श्रोते ह्मणती फिटला संदेह ॥ पुढील कथेचा सांगेन भाव ॥ जया असेल अनुग्रह भाव ॥ त-
यासि कांहीं अशक्य नाहीं ॥ ११ ॥ कवि सांगेल पुढील कथा ॥ चारुउ नरेस्तं भाखालता ॥
जुवारियासि द्रव्य जाला देता ॥ तो आपुल्या नगरा गेला ॥ १२ ॥ रक्षपाळीं काय केलें ॥ चा-
रु सराया जवळि नेलें ॥ चक्रदंतें आपणा जवळ बैसविलें ॥ अतिसन्मानें करुनियां ॥ १३
विडा देऊनि कर्पूरेसी ॥ चारु पाठविला राणिवसी ॥ राजकन्या पाहे तयासी ॥ रूप देखू-
नि संतोषली ॥ १४ ॥ हस्तिनपुरें लक्षितां ॥ सरली अवताराची चिंता ॥ जरमज त्रिकुटीची-
सांगेल कथा ॥ तोच वर मज वरी ॥ १५ ॥ मग उठूनियां आदर करी ॥ बैसों घातला चौक सुंद
री ॥ विडा देवूनि कोमळउत्तरीं ॥ पुसे चित्रकुटिची वार्ता ॥ १६ ॥ येरु ह्मणें पहिला गेलों इंद्र
भुवनीं ॥ कांहीं येक कार्य विचारणा होती मनीं ॥ मार्गी जातां चित्रकूट भुवनीं ॥ दुरूनि दे-
खिलें होतें ॥ १७ ॥ त्या गोष्टीस दिवस जाले बहुत ॥ कार्ययोजनीं होतें चित्त ॥ कांहीं न आठव
त नाठवत ॥ मनामध्यें जाणपां ॥ १८ ॥ जरी हीपूर्वं सूचना असती ॥ तरीं भीतरीं रिघूनि अ
वघी स्थिती ॥ पाहातों भाव भक्ती ॥ नगरजनाची पैं ॥ १९ ॥ आतां जरी तुज असेल इछा ॥ न
रीं मी जाईन मागुता ॥ वरवें लक्षुनि मागुता ॥ तुज प्रति सांगेन ॥ २० ॥ ऐकूनि चारुचें वचन
॥ ह्मणे मज द्यावें जी प्रमाण ॥ तेणें होइल समाधान ॥ मन लीन तुसें गई ॥ २१ ॥ चारु ह्मणे बो
लणें सत्य ॥ लटिकें न बोलावें यथार्थ ॥ ह्मणूनि ठेविला हस्त ॥ मस्तकीं राजकन्येच्या ॥ २२ ॥

तेणें संतोषली राजकुमरी ॥ पित्यासि बोलावी सडकरी ॥ कथिती जाली वागेश्वरी ॥ जी व
दला होता चारु ॥ २३ ॥ तें मानलें रायासी ॥ आशा दिधली चारुसी ॥ पुढें कथा वर्तली जैसी
तें सांगरे हरिदासा ॥ २४ ॥ इतिश्री विक्रमचरित्र कथा ॥ हरिदास होय सांगता ॥ ते ऐका-
वी श्रोतां ॥ स्वस्थचित्तें करोनियां ॥ १२५ ॥ इतिश्री विक्रमचरित्रे द्वादशोध्यायः ॥ आध्या ॥
१२ ॥ संपूर्णमस्तु ॥

श्रीगणेशाय नमः ॥ च्यारूस मुहूर्ती निघाला ॥ राजा बोळवित चालिला ॥ ह्मणे बो
लऽसे बोलिला ॥ तो करा गा यथार्थ ॥ १ ॥ च्यारूनें केलें दंडवत ॥ राव ह्मणे ह्मावे जय
वंत ॥ धरिला असे उत्तम पंथ ॥ मनोवेगें जात असे ॥ २ ॥ करी राम स्मरण चिंताग
ती ॥ पाहात जातसे तीर्थातीर्थी ॥ ऐसा पावला असे बद्रिकानाथीं ॥ केलें दर्शन
नारायणाचें ॥ ३ ॥ तंव एक देखिला ऋषेश्वर ॥ तयासि केला नमस्कार ॥ तेणें दे
खिला मस्तकीं कर ॥ क्षेमकुशळ विचारिलें ॥ ४ ॥ येरें सांगीतलें साकल्यना ॥ जेजे
वितली होती कथा ॥ पुढें आहे चित्रकुटीची वार्ता ॥ ते सिधि पावबी स्वामिया ॥ ५ ॥ कृपा
उपजली मुनीसी ॥ खूण सागतां जाहला च्यारुसी ॥ तुवां जावें हिमाचळासी ॥ तेथी
ल ऐके व्यवस्था ॥ ६ ॥ त्या हिमाचळाचे पाठारीं ॥ द्वादश योजनें वट विस्तारीं ॥ सम
खांघा असती वरी ॥ शाखा पल्लव अनेक पैं ॥ ७ ॥ तया वरी राजहंस असती ॥ निघे पु
च तयाप्रती ॥ त्यांची ऐकावी स्थिती ॥ तिघांसि तिहीं लोकीं गमन ॥ ८ ॥ चारा घेऊं न ये
ती माध्यान्नकाळीं ॥ स्वयंपाक करी पक्षिबाळी ॥ मग पूजोनिया वनमाळी ॥ सम
र्पी नैवेद्य ॥ ९ ॥ करी वैश्वदेव उपासना ॥ भूतबळी घालोनि बळिदान ॥ करूनि शुद्ध आ
चमन ॥ बैसे भोजनासी ॥ १० ॥ अतीत भाग काढोनी ॥ तीन वेळ शब्द करोनी ॥ बैस
ला पंगति घेवोनी ॥ करी आरोगणा पैं ॥ ११ ॥ पाचारोनी तीन वेळीं ॥ अतीत न येत्या

काळीं ॥ मग अन्नदा कोनियां जळीं ॥ करवें कृष्णार्पण करीं ॥ १२ ॥ मग बैसे भोजनीं ॥ ऐ
सें करी प्रतिदिनीं ॥ तुवां तेथें जाऊनी ॥ अतीतरूपें बैसावें ॥ १३ ॥ अतीत आहे ह्मणोनी
पाचारील वचनें दोन्ही ॥ तिसरी परिसोनि ध्वनी ॥ मी असें त्वां ह्मणावें ॥ १४ ॥ तुज नेऊ
नि वृक्षावरी ॥ पूजा करील षोडशोपचारीं ॥ आरोगणाचे अवसरीं ॥ उगलें चि बैसा
वें ॥ १५ ॥ तो ह्मणे घ्या आपोशनासी ॥ त्यां सांगावें मनकामनेसी ॥ नेवोनियां चित्रकु
टभुवनासी ॥ मागुती येथें आणावें ॥ १६ ॥ इतुका उपदेश केला ॥ च्यारु थोर आनंदला ॥
मग गुरूनें प्रसाद दिधला ॥ कंद येक तयासी ॥ १७ ॥ हा जाई तूं भक्षित ॥ याचें नाव अ
मृतकंद ह्मणत ॥ पूर्ण होईल मनोरथ ॥ येरु माथा ठेवि लाचरणीं ॥ १८ ॥ मग तेथून निघा
ला ॥ हिमाचळ पर्वत पावला ॥ वटवृक्ष नयनीं देखिला ॥ पत्रफळीं मंडित ॥ १९ ॥ पुढें जा
गास विस्तर ॥ तेथें गुप्तरूपें केला बैसकार ॥ तंव दिवस जाला दोन प्रहर ॥ पक्षी चारा
घेवोनि आले ॥ २० ॥ केलें संध्यास्नान ॥ सारिले हरिहराचें पूजन ॥ वैश्वदेव काग बळिदान
समर्पिता जाला तेकाळीं ॥ २१ ॥ कोण्ही आहे कीं काय महानुभाव ॥ दोन उत्तरें बोलिला पक्षि
राव ॥ तिसरे वचनीं फेडी संदेह ॥ तंव च्यारु ह्मणे मी आहे ॥ २२ ॥ पक्षिये जवळी पुत्र पाठवि
ला ॥ तेणें वृक्षावरि उचलोनि नेला ॥ षोडशोपचारें पूजिला ॥ आदरें करूनियां ॥ २३ ॥ अ
न्न वाढिलें हंसकांतें ॥ ब्रह्मार्पण हंस सोडित ॥ समर्पूनि चित्रगुप्तातें ॥ आपोशण घेत ॥१॥

लें ॥ २४ ॥ च्यारु न घे आपोशना ॥ पक्षी करिती विज्ञापना ॥ ह्मणे कांहीं कराची आज्ञा ॥ अध्याय १३
ते मी करीन शीघ्रकाळें ॥ २५ ॥ च्यारु ह्मणे चित्रकुटा न्यावें ॥ मागुतें येथें आणावें ॥ इतुकें तु
वां अंगिकारावें ॥ आणीक नाहीं कामना ॥ २६ ॥ हंस ह्मणे कार्य स्वल्प ॥ प्रभातें नेईं संकल्प ॥
आतां भोजन करी सांडी संकल्प ॥ हें वचन सत्य माझें ॥ २७ ॥ मग आपोशन घेता जाल
रु चें तें तृप्त जेविला ॥ आंचवोनि विडा घेतला ॥ मग सांगे वृत्तांत ॥ २८ ॥ ऐसी करमिली ते राती
उदय पावला गभस्ती ॥ हंस ह्मणे पुत्राप्रती ॥ कोण आजि स्वर्गा जातसे ॥ २९ ॥ मग तो ह्मणे ज्ये
ष्ठ पुत्रातें ॥ च्यारुसी न्यावें सांगातें ॥ मागुती आणावें येथें ॥ फिरोन येते समईं ॥ ३० ॥ तेणें बै
सविलें पृष्ठावरी ॥ उड्डाण केलें अंबरीं ॥ चित्रकुटा पावले सत्वरी ॥ तेथें च्यारु उतरला ॥ ३१ ॥
राजहंस चालिला पुढारा ॥ ह्मणे फिरोन येईन दुपारां ॥ तव त्वां अवलोकून नगरा ॥ येथें वाट पाहा
वी ॥ ३२ ॥ तो उडूनि गेला त्वरित ॥ च्यारु निघाला चित्रकुटांत ॥ सभोंवतें असे पाहात ॥ हाटव
टियाचे वोवारें ॥ ३३ ॥ च्यारु जंव लक्षी जनां ॥ तंव त्यासि नाहीं चेतना ॥ टकमक पाहाती येकमे
कांचिया वदना ॥ परी सत्व नाहीं शरीरीं ॥ ३४ ॥ व्यवसाय करीत होते हो आपले ॥ येक उभे ये
क बैसले ॥ देतां घेतां कर उचलले ॥ तैसेचि राहिले असती ॥ ३५ ॥ एक होते भोजन करीत ॥ सु
खीं होते यास घालित ॥ स्त्रिया होत्या वाटित ॥ त्याते शांत दृस्त दिसती ॥ ३६ ॥ येक अंधका
मातुर ॥ आपुला लेगई तत्पर ॥ अष्टांगें येकाकार ॥ तैसेचि उभयतां असती ॥ ३७ ॥ ऐसी अ

॥२॥ ठरापकडयाती॥ आपुलालीकार्यस्थिती॥ जेजयाचीहोरत्ती॥ तैसेंतेंचि मोन्यरूप॥३८
तेनपाहेचालेपुढारा॥ आलाअसेमध्यबाजारा॥ तेथेंदेखिल्याअपूसरा॥ नृत्यतांडवींउ
भ्याअसती॥३९॥ लोकांचेंदेखूनिसखमंद॥ त्यारुनेंआदरिलाविनोद॥ येकाचाकरो
निउच्छेद॥ येकावरीलोटितअसे॥४०॥ वाणियांचीखजूरखोवरी॥ चाटियाचीलुगडीं
हारी॥ चित्रविचित्रनानापरी॥ तेलातुपाचीफोडीपात्रें॥४१॥ पुढेंगेलानाणवटीसी॥ देखि
ल्याद्रव्याचाराशी॥ त्याएकाच्यायेकासी॥ टाकितसेपैं॥४२॥ तंवदेखिलेंबुकेकरिया॥ धा
वोनिउघडिल्यापेटिया॥ अंगींपरिमळचर्चूनियां॥ घालीगळांसुमनमाळा॥४३॥ तेथू
नियानिघाला॥ महाद्वारापावला॥ द्वारपाळहोतावैसला॥ तोदिधलालोटोनिया॥४४
भीतरींजंवरिघाला॥ तंवस्त्रियादेखताजाला॥ कोण्हींनिद्रिस्तकोण्हींवैसल्या॥ अतिला
वण्यसुंदरी॥४५॥ तेथेंक्षणयेककेलीरळी॥ कोण्हांचुंबनकोण्हाचेंयोवनचोळी॥ कोण्हा
सिचंदनपरिमळी॥ लाविताजाला॥४६॥ तेथेंक्रमलायेकक्षण॥ पुढेंदेखिलेंउत्तमभुवन
चित्रविचित्रतगरीपूर्ण॥ हिरेमाणिकेंजोडिलीं॥४७॥ त्यामंदिराभीतरीं॥ मंचकघातला
सेकुसरी॥ रत्नेंजोडलींनानापरी॥ नयावरीरूपयोवनउत्तमा॥४८॥ पासोडीशभ्रतेलिया
चा॥ चांदवाबांधिलाखुमासीचा॥ जडितलखलखीतकोंदणाचा॥ लाविलेघोसमुक्ताफ
ळांचे॥४९॥ चहूंकोनींत्याशीसमया॥ चहूंमानव्याच्यारिपुतल्या॥ दोघीदेतीपैंविडिया ॥२॥

१०च० आपलेसुइच्छेकरुनी॥५०॥ उश्याकडेदोघीअसती॥ त्यामरेंमक्षिकावारिती॥ मध्येंनि अध्याय
द्राभूतस्त्रीसती॥ तेहीनिर्जीवदिसतसे॥५१॥ तीसपांघरविलाक्षीरोदक॥ तोत्यारुनेंउघ १३
डिलातात्काळिक॥ अन्नलोकींघोटेपासूनिमस्तक॥ ह्मणेकोणलावण्यतारूपाची॥५२॥
थोरविधातयासीजालेकष्ट॥ अवघेंसुंदरत्वमिळोनियेकवट॥ हेघडविलीअसेवरवंट॥ एसें
मजगमतसे॥५३॥ जैसेंइद्रचेंस्वरूप॥ तैसेंचचक्रदंतकन्येचेंरूप॥ कांहींघडलाअसेश्रा
प॥ हेंयथार्थजाणवलें॥५४॥ चोळीलुगडींशभ्रचोखट॥ कासघातलीअसेबळकट
लल्हाटींअसेकस्तूरीमळवट॥ वदनींतांबूलसुरंग॥५५॥ ऐसीपाहिलीआवघीखु
ण॥ पुनरपिघातलेंपांघरूण॥ बरवेंझांकिलेंकरचरण॥ मगनिघालामंदिराबाहेरी॥५६
चालिलादुसरियाबाजारीं॥ दोहीभागींमांडियागोपुरी॥ तेथेंबैसलेअसतीव्यवहारी॥
आपलीयापरिवारेसी॥५७॥ कोणीबैसलेअसतीसमवेत॥ तांबूलविडियायेकमेकांदेत॥
येकआंगीचंदनलावित॥ फरतिच्याकुचाग्रींलावोनी॥५८॥ येककरितीचरणक्षाळण॥ ये
कींकलेंअसेंशयन॥ येकउभ्याअसतीताठाधरूनी॥ पुरुषकरींधरूनिवोढिती॥५९॥ ऐसा
विचारविनोद॥ पाहिलासकळनगरीचाभेद॥ खेळीयाकेल्याविनोद॥ मगत्यारुआलानगरा
बाहेरी॥६०॥ श्रोतेह्मणतीयेकअसेपुसणें॥ हाजननिर्जीवअसेकवणेगुणें॥ इतुकेंविभांडिलें
त्यारुनें॥ परित्याचेंकांनचळेची॥६१॥ ऐसेऐकोनिकवीश्वर॥ ह्मणेवरवेंपूसिलेंप्रश्नोत्तर॥

तरि मी सांगेन सविस्तर॥ थोर हृदई आनंदला॥ ६२॥ ह्मणे परिसा येकचित्तें॥ चित्रांगीच्या
जिवीं नगरजित॥ सकळजनांसि तिचें सत्य॥ दुसरा भाव असेना॥ ६३॥ तीस इंद्रदंम पाचा कु
डाडी॥ ह्मणोनि देह सोडीतां तडी॥ जननाहाटत होतें परवडी॥ ते तैसेच निस्तेज जाहाले॥ ६४
जेसा कृष्णद्वापारीं॥ भिल्ले चरणीं विंधिला गंगातिरीं॥ बोलावीं पाठविलें तये अवसरीं॥ पांडुनि
यारकृतासी॥ ६५॥ धर्म हस्तनापुरीं राहिला॥ अर्जुन पाहावया धाडिला॥ जातां मंत्र उपदेशाके
ला॥ जे आधार नद्या या कृष्णासी॥ ६६॥ अर्जुन आला वेगवगूत्र॥ कृष्णें देखिलें तयासि येत॥ दुः
खें रुदन फार करीत॥ आणिल ल्हाट पिटी तसे॥ ६७॥ गडबडां असे लोळत॥ जंव ळीं बोलावी कृ
ष्णनाथ॥ ह्मणे नावेकदेई हात॥ उठौनि मग बैसेन॥ ६८॥ तो शब्द अर्जुन नघे चित्तीं॥ देव येतसे
काकुलती॥ ह्मणे मी रक्षिला असे कोण गती॥ अंतीं आधार होसी ह्मणोनी॥ ६९॥ अगा येपां
डुनायका॥ तूं नको येउं आह्मां जवळिका॥ धनुष्याचा तरी देई टेका॥ अर्थनिमिष्य प्रमाण॥ ७०
किरीटी दे धनुष्य हातीं॥ हरिनें हरिली सर्वशक्ती॥ प्राण दाकिला लरिन गती॥ गेला विष्णुभु
वना॥ ७१॥ पांडव जाला शक्तिक्षीण॥ कृष्ण गेला वैकुंठभुवना॥ मागें अंतःपुरीं भांड
तीं जाणा॥ तें अर्जुन पहातसे॥ ७२॥ भीमार्जुनांचें कांहीं न चले॥ तैसें यांचे सत्व चित्रांगीनें
नेलें॥ च्यारूनें जें विपरीत केलें॥ तें फावलें तयासी॥ ७३॥ श्रोते सम क्षा पुरविली ह्मणती॥ पु
ढें कथेची सांग वित्पत्ती॥ कवि ह्मणे परिसावें सावधचित्तीं॥ मजवरी कृपा करोनी॥ ७४॥ च्या

रु मार्ग धरोनि बैसला॥ तंव पक्षी चारा घेवोनि आला॥ तेणें पृष्ठीवरी बैसविला॥ वेगीं पाव
ला वटवृक्षीं॥ ७५॥ राजहंसे पूजिला च्यारु॥ बहु केला आदरु॥ ते दिवसीं तेथें जाला स्थिरु
प्रभातें केलें प्रयाण॥ ७६॥ आला बद्रिकाश्रमासी॥ नमस्कार केला श्रीगुरुसी॥ ह्मणे तुझि
या कृपेनें स्वर्गासी॥ पाहूनि आलों स्वामिया॥ ७७॥ ते दिवसीं तेथें राहिला॥ प्रभातें गुरू
स नमस्कार केला॥ आज्ञा वंदोनि पावला॥ नागपुरीसी॥ ७८॥ भेटला चक्रदंतासी॥ क्षे
मालिंगन दोघांसी॥ पाठविलें कुमारीपासी॥ जा सांग देखिली वार्त्ता॥ ७९॥ तो आला सेव
रित॥ दोघे बैसलीं येकांत॥ पुसती जाली वृत्तांत॥ चित्रकुटीचा पें॥ ८०॥ मूळ द्वारापासू
न सांगीतलें॥ मंदिरांत निघालों ह्मणितलें॥ रवूण मानतां येरिनें वर्जिलें॥ आतां पुढें न
सांगावें॥ ८१॥ श्रोते ह्मणती सांगतां सांगत॥ वर्जिलें हे काय निमित्य॥ कवी ह्मणे आ
इकादेवोनि चित्त॥ तेंही सांगेन तुह्मांसी॥ ८२॥ संपूर्ण वार्त्ता होतां जाण॥ निश्चें होईल
शापमोचन॥ हि बुद्धि योजिली तिणें॥ यासि सौख्य दिधलें पाहिजे॥ ८३॥ या निमि
त्य पुढिल नपुसे वृत्तांत॥ पुरवा वया कामभोगार्थ॥ इतका विचारोनि परमार्थ॥ का
य करिती जाली॥ ८४॥ मग बोलाविलें पितयासी॥ ह्मणे लग्न लावावें च्यारुसी॥ अळ
सरहित वेगेंसीं॥ उठिला नृपनाथ॥ ८५॥ पहिलीच केली होती सामग्री॥ लग्न पाहिलें
वेगवगत्रीं॥ ऋषी मिळोन पवित्रीं॥ लग्न तिथी निर्धारली॥ ८६॥ आजि मुहूर्त असे राजें

द्रा ॥ संपूर्ण असे प्रतिपदा ॥ उभयतां लावावी हरिद्रा ॥ ऐसे द्विज बोलिले ॥ ८७ ॥ राजा प्र
धाना सांगे परवडी ॥ तुह्मी व्हावें नवरियाचे वन्हाडी ॥ करावें गें जी तांतडी ॥ लग्न कार्त्तिक
शुध पंचमीसीं ॥ ८८ ॥ प्रधानानें नेलें च्यारुसी ॥ हळदी लाविली गजरेसी ॥ राजगृहीं कु
मारीसी ॥ केला हळदी महोत्सावो ॥ ८९ ॥ ऐसे क्रमले तीन दिवस ॥ देवक स्थापन चतु
र्थीस ॥ येरे दिवसीं घटिका येकवीस ॥ लग्न लाविलें रात्रिसमयीं ॥ ९० ॥ थोर जाला आ
नंद ॥ वाजंत्र्याचा येक नाद ॥ ब्राह्मण पढती मंत्रशब्द ॥ जो विधि बोलिला होत्ता ॥ ९१
वरवेक्रमले च्यारी दिवस ॥ साडे जालें यथावकाश ॥ आंदण दीधलें जांवयास ॥ अर्ध
राज्य आणि उपभोग ॥ ९२ ॥ च्यारु आणि राजकुमारी ॥ नांदती बरवियापरी ॥ जरी सां
गों विस्तारीं ॥ वृथा ग्रंथ वाढेल ॥ ९३ असती सकळ संपदा ॥ रुखसंपदेसि नाही मर्या
दा ॥ हरिभक्ति ठाईं सदा ॥ नाहीं निंदा कोणांची ॥ ९४ ॥ ऐसे क्रमिले बहुत दिवस ॥ अति
प्रीति दोघांस ॥ मनीं आठविलें चित्रांगीस ॥ करिती जाली उपदेशातें ॥ ९५ ॥ तंव कोण्हे
दिनांतरीं ॥ दोघें असतां रुखसेजारीं ॥ रात्रीच्या अवसरीं ॥ वार्त्ता पुसे उरली चित्रकु
टीची ॥ ९६ ॥ सांगे कथा पुढील सविस्तर ॥ ह्मणे मी प्रवेशलों मंदिर ॥ तंव मंचकीं पहूडली
सुंदर ॥ मग मी जवळीं गेलों ॥ ९७ ॥ च्यारु असे सांगत ॥ चित्रांगी हुंकार्‍या देत ॥ सं
पूर्ण परिसो नि वृत्तांत ॥ सांडिला प्राण पैं तिणें ॥ ९८ ॥ च्यारु ह्मणे इला लागली निद्रा ॥४॥

चं० चं० ह्मणो निद्रल विली सुंदरा ॥ तंव निर्जीवित्वने अवसरा ॥ खोडवळलें शरीराचें ॥ ९९ ॥ अध्याय
मग उठिला खडबडोनि ॥ तेगें केली दीर्घध्वनी ॥ काय गजर जाला ह्मणोनी ॥ धावत आ १३
ला चक्रदंत ॥ १०० ॥ च्यारु सांगे सविस्तर ॥ दृष्टि पाहे नृपवर ॥ हाहाकार केला थोर ॥ रा.
णी मुख्य करोनियां ॥ १०१ ॥ करिती महाशोक ॥ येकापरीस येक अधिक ॥ मिळाले सोईरे
सेवक ॥ कांहीं चतेथें न दिसे ॥ १०२ ॥ हा अवघा सकळ मृत्युलोक ॥ माया मृगजळवत्
माविक ॥ अल्प आयुष्य मृत्युलोक ॥ याचा भरवंसा कायसा ॥ १०३ ॥ ह्मणोनि निर्ग्रंथा न क
रीं पसर ॥ करिते जाले अग्निसंस्कार ॥ च्यारु करी क्रिया अपार ॥ बारा तेरा दिवस लोटले
१०४ ॥ चित्रांगीचा प्राण निघाला ॥ तो चित्रकूटा पावला ॥ आपुले स्वकुडीं संचरला ॥ जन जा
ले सजीव पें ॥ १०५ ॥ आपल्या व्यवसायातें ॥ स्वधर्म जाले चालवितें ॥ च्यारुनें विभांडि
लें होतें ॥ ते बोळखती येकमेका ॥ १०६ ॥ माझें तुझें ह्मणोनी ॥ खेळती झोट धरणी ॥ सां
गती चित्रांगीला गोनी ॥ ते करी न्याय नीती ॥ १०७ ॥ कथिती मागील विचार ॥ ह्मणे येक
आला होता तस्कर ॥ तेणें अन्याय केला थोर ॥ येकाचें येका लाविलें ॥ १०८ ॥ चित्रांगी स
माधान करी जगांचें ॥ हरिलें वित्त देवघीत याचें ॥ इतुकें कर्त्तव्य चित्रकुटीचें ॥ ऐका कां
चनपुरीचा काय विचार ॥ १०९ ॥ मग ह्मणतां जाला चक्रदंत ॥ च्यारु ह्मणे मी जाईन स्व
गृहातें ॥ राजा विनवी आदरें बहुतें ॥ ह्मणे दुसरी कन्या अंगीकारीं ॥ ११० ॥ देईन अर्ध रा

॥५॥ ज्य ॥ सांभाळावेंजीमज ॥तेणें घडेल तुज॥पुण्यआणिपुरुषार्थ॥१११॥ च्यारू ह्मणे
न घडे सर्वथा॥ मज नाहीं स्त्रीची आस्था ॥आणि न लगे राज्य अर्था॥ चाड नाहीं कास
याची॥११२॥पुन्हां चक्रदंत ह्मणे॥ कन्येचें दुःख येणेगुणें॥ तूं गेलिया शतगुणें॥दुःख
दुणें होईल॥११३॥ तो नाइकेचि गेला॥ राव अति दुःखा तें पावला॥ पुढें काय वृत्तांत वर्त
ला॥ तो सांगरे हरिदासा॥११४॥ ॥इति श्री विक्रमचरित्रे॥ चित्रांगीआख्यान त्रयो
दश प्रसंग॥१३॥ ॥छ॥ ॥छ॥ ॥छ

 श्रीगणेशायनमः॥ च्यारु आला केदारासी॥ भेटता जाला श्रीगुरुसी॥ तेथें क्रमिली तें निशी
॥ तंव उदय केला दिनकरें॥१॥ प्रभातें च्यारु उठिला॥ गुरूंसि नमस्कार केला॥ आज्ञा पुसोनि
निघाला॥ आला राजहंसाजवळी॥२॥ तेणें केलें नमन॥ जालें संध्या स्नान भोजन॥ रात्रीं
पावला विश्रांतिसदन॥ तंव उजळिली पूर्वदिशा॥३॥ हंसें बैसविला पृष्ठावरी॥ उतरविला
चित्रकुटाच्या द्वारीं॥ प्रवेशला नगराभीतरीं॥ तंव तेथें काय वर्तलें॥४॥ पूर्वी केला होता आ
ट॥ नगरजनीं धरिला बळकट॥ ह्मणती घ्यावें उसणवट॥ बरवा आजि सांपडला॥५॥ येक
मारिती पृष्ठावरी॥ येक वोढिती चाचरी॥ येक ह्मणती नेऊं राजद्वारीं॥ करावें ताडण॥६॥
नगरजन मिळाले उदंड॥ येक बोल बोलिले दुर्घट॥ चित्रांगीस ह्मणती करावा दंड॥ यान
स्करासी॥७॥ च्यारु चित्रांगीनें वोळखिला॥ ह्मणे थोर अनर्थ जाला॥ मीं दंडीन या तस्क
राला॥ तुह्मी आतां परतावें॥८॥ जन अवघे गेलियावरी॥ च्यारु नेला मंदिराभीतरीं॥ चरण
झाडी तये अवसरीं॥ विरगुंठि सोडोनियां॥९॥ ह्मणें कष्टले मजकरितां॥ जिचीं कांहीं न करा-
वी व्यथा॥ विचारुनियां परमार्था॥ समाधान मानावें॥१०॥ ऐसी नाना करुणावचनीं॥ विन
विती जाली मृगनयनी॥ ह्मणे क्षमा करा मजलागोनी॥ पुढें उभि राहिली असे॥११॥ आंगीं-
चर्चिलें बावनचंदन॥ विद्याधरी जाणविती विंजणें॥ पुष्पमाळा घालिती जाण॥ विड्या देत
चित्रांगी॥१२॥ तंव मावळला रवि॥ सेज केली पैं बरवी॥ उपभोगें च्यारूस रंजवी॥ दावी

आपली कुशळता ॥ १३ ॥ तें सुखठाउकें अनुभवियासि ॥ किती ह्मणोनि याची साक्षिसी ॥ म-
र्यादा नाहीं त्या सुखासी ॥ तंव प्रातःकाळ जाला ॥ १४ ॥ ऐसी दिवसदिवसा प्रति ॥ अधिका-
अधिक वाढवी प्रीती ॥ नगरजन आश्चर्य करिती ॥ शंकती आपुल्या ठाईं पैं ॥ १५ ॥ तीन मास
क्रमलिया वरी ॥ तंव कोणे येके दिनांतरीं ॥ च्यारु आणि चित्रांगी सुंदरी ॥ करीं कर धरूनि फि-
रत होते ॥ १६ ॥ तंव उपरि देखिली सप्त खणीं ॥ चाल पाहों ह्मणे नयनीं ॥ कैसी आहे ह्मणे ठेवणी
॥ खणोखणीची पैं ॥ १७ ॥ माडीवरी वळंघली त्वरित ॥ खणोखणीं रत्नें शोभत ॥ तगट वर्णल खल-
खित ॥ सोनियांची साजिरी ॥ १८ ॥ सातही खण पाहिले ॥ शिखरावरि चळंघलें ॥ तंव नयनीं देखि-
लें ॥ अति स्थूळ भेरी तें ॥ १९ ॥ भेरी त्राठिन ह्मणे चारु ॥ चित्रांगी ह्मणे ऐक विचारु ॥ वाजवितां-
ऐकेल वज्रधरु ॥ तो बोलाऊं धाडील ॥ २० ॥ सिकविलें नाईके चित्रांगीचें ॥ त्राटण केलें भेरीचें ॥
मन संतोषलें वज्रधराचें ॥ हांकारिले दूतांसी ॥ २१ ॥ ह्मणे जा बोलावा चित्रांगी ॥ दूत आले म-
नोवेगीं ॥ ह्मणती चाल वो नृत्यालागीं ॥ इंद्रायें बोलाविलें ॥ २२ ॥ उपरिवरुन उतरली त्वरित ॥
चारू सजाणवी दूतांची मात ॥ ह्मणे मी जया लागी होतें भीत ॥ तेंचि घडोनी पैं आलें ॥ २३ ॥ ह्मणे
जी तुह्मी राहावें मंदिरीं ॥ मी जाईन दूतां बरोबरी ॥ नमस्कार करोनी शेलारी ॥ सत्वर येथें येई-
न ॥ २४ ॥ तो ह्मणे मी येईन ॥ दृष्टी पाहेन इंद्रभुवन ॥ चित्रांगी ह्मणे होईल येका देविघ्न ॥ मग भय
लन् चले कांहीं ॥ २५ ॥ चित्रांगी करी समाधान ॥ च्यारु नाईके वचन ॥ मक्षिका केली नरदेह पा-

लटोन ॥ बैसविला स्तनावरी ॥ २६ ॥ मग गेली इंद्रभुवना ॥ नमस्कारिला इंद्रराणा ॥ राजा पुसे क्षेम
कल्याण ॥ ह्मणे कृपा तुमची स्वामियां ॥ २७ ॥ उत्तम करिगे नृत्य ॥ टाळ मृदंग वाद्यें मिश्रित ॥ राग
आळवी श्रीमंत ॥ थैं थैं शब्दें करोनियां ॥ २८ ॥ भूमीस केलें दंडवत ॥ मग स्मरिला येकदंत ॥
देवादिक समस्त ॥ उत्तम नृत्य पाहों गेलें ॥ २९ ॥ भवरि देतां उल्हाळ ॥ नाचों लागली सप्त पाताळ
॥ स्तोक देतां चुकली ताल ॥ तें इंद्रें देखिलें ॥ ३० ॥ ह्मणे ताळ चुके घडीघडी ॥ तरीं ईट होसिल
मारवाडीं ॥ साट योजनें परवडी ॥ होवोनि तुवां पडावें ॥ ३१ ॥ इंद्रें दिधला उग्र शाप ॥ चित्रांगी
नें हृदईं धरिला कंप ॥ ह्मणे जी द्यावा उश्शाप ॥ कृपा करोनियां ॥ ३२ ॥ ह्मणे तूं सकळां बंधु ॥ सेव-
कजनीं कृपासिंधु ॥ माझा सकळ ही अपराधु ॥ क्षमा करी स्वामियां ॥ ३३ ॥ ह्मणोनी चरणीं-
ठेविला माथा ॥ वज्रधर जाला उश्शाप देता ॥ फोडोनि पिष्ट करितां ॥ उत्तम गती पावसील ॥ ३४ ॥
ह्मणे जी वज्रपाणि श्रेष्ट ॥ साठ योजने इट ॥ ते कैसी होईल पिष्ट ॥ हें मज अपूर्व वाटतसे ॥ ३५
वज्रधर ह्मणे वो मृगनयनी ॥ असत्य नव्हे माझी वाणी ॥ संशय न धरावा अंतःकरणीं ॥ उत्तम
देह पावसील ॥ ३६ ॥ मग आज्ञा पुसोनि निघाली ॥ चित्रकुटीं प्रवेशली ॥ थोर चिंताग्रस्त जा-
ली ॥ तेव्हां विनवी च्यारुतें ॥ ३७ ॥ ह्मणे जी घडलें अनुचित ॥ शाप जाला कठिण बहुत ॥ न क-
ळेचि पूर्वदत्त ॥ तैसी आठवे वासना ॥ ३८ ॥ च्यारु ह्मणे चिंता किमर्थ ॥ शंकर आहे जी समर्थ ॥
व्यापक सर्वभूतमात्र ॥ तो बरवें चि करील ॥ ३९ ॥ ऐसें केलें समाधान ॥ सत्वर सारिलें भोजन

॥ तंव जाला अस्तमान ॥ निद्रा करिती उभयतां ॥ ४० ॥ माणसोंडी चित्रांगी ॥ त्यारु उठे लैसाच वे-
गीं ॥ जावोनि बैसला मार्गी ॥ वाट पाहे राजहंसाची ॥ ४१ ॥ बरवा माध्यान्हकाळ जाला ॥ पक्षिचा
रा घेवोनि आला ॥ त्यारु पृष्ठावरि बैसला ॥ पावले वटवृक्षा ॥ ४२ ॥ जालें भोजन यथारुची ॥ आ
ज्ञा घेतली राजहंसाची ॥ वाट धरिली बद्रिकाश्रमाची ॥ केलें गुरुनमन ॥ ४३ ॥ सकळ वृत्तांत
सांगीतला ॥ गुरु ह्मणे जाईं मारवाड देशाला ॥ तेथूनि योजन सोळा ॥ नगर येक असे पैं ॥ ४४ ॥ भे-
टावें नृपवरासी ॥ ह्मणावें विघ्नउ देलें तुझिया देशीं ॥ क्षय आला तुझिया राज्यासी ॥ कोणी नाहीं
सांगतां ॥ ४५ ॥ ईट वाढती प्रतिदिनीं ॥ ती फोडोनी टाकावी तत्क्षणीं ॥ ऐसें तयासि सांगोनीं ॥ का
र्य साधावें आपुलें ॥ ४६ ॥ गुरुची आज्ञा घेवोनी ॥ यकोनि गेला पेणो पेणीं ॥ ईट देखोनि नयनीं
॥ महाविशाळ कृष्णवर्ण ॥ ४७ ॥ तेथूनि दक्षिण दिशे चालिला ॥ जावोनि रायासि भेटला ॥ मग
वृत्तांत सांगीतला ॥ अति आदरें करोनियां ॥ ४८ ॥ राजा ह्मणे कोठोनि बिजें केलें ॥ कार्य सांगा
वहिलें ॥ त्यारु ह्मणें येणें जालें ॥ बद्रिकाश्रमा होनि ॥ ४९ ॥ जातहोतों श्वेतद्वीपासी ॥ दुस्तर
उपजलें तुझ्या देशीं ॥ क्षय आला तुझे राज्यासी ॥ तो मज देखवेना ॥ ५० ॥ तुज करावया श्रवण
॥ कोण्हीं नाहीं विवेकी म्हणिजाण ॥ येवढें उद्भवलें विघ्न ॥ ईट महाविशाळ रूप ॥ ५१ ॥ येथूनि यो
जनें सोळा ॥ ईट वाढलिसे भूपाळा ॥ अति प्रचंड विशाळा ॥ काळकर्कट भयानक ॥ ५२ ॥ तों जंव
जंव वृध्दि पावेल ॥ तंव तंव तुझें राज्य क्षय होईल ॥ हें मज श्रुत जालें सकळ ॥ ह्मणोनि सांगावया

आलों ॥ ५३ ॥ राजा जाला भयाभीत थोर ॥ भाकित करुणोत्तर ॥ ह्मणे हें महा दुस्तर ॥ पराभ-
वेल कें सेनी ॥ ५४ ॥ सांगावी तयाची विवंचना ॥ ह्मणवोनि घाली लोटांगणां ॥ उपकार होई
ल जाणा ॥ मज आठवण जन्मोजन्मीं ॥ ५५ ॥ त्यारु ह्मणें ऐकें येक ॥ त्याचा सत्वर प्रयत्न दे
ख ॥ ईट फोडावी तात्काळिक ॥ उपाय नाहीं दुसरा ॥ ५६ ॥ ह्मणे चला आतां पाहूं ॥ निशाणी
पिरि लाघावू ॥ मिळालें सैन्य समुदाउ ॥ आणि जन समस्त ॥ ५७ ॥ घेतली खणती कुदळ ॥
घणपाहरा सबळ ॥ टांक्या हात घटिया सबळ ॥ सर्व सामग्री विस्तारें ॥ ५८ ॥ ईट देखोनि नृप
वर ॥ आश्चर्य करी तेव्हां थोर ॥ बरवा सांगीतला विचार ॥ महा अरिष्ट उपजलें ॥ ५९ ॥ कोप
ला प्रधान जनासी ॥ ह्मणे कैसें चालवितां राज्यासी ॥ येवडें विघ्नउ देलें देशीं ॥ तें तुह्मासी ठा
उकें नाहीं ॥ ६० ॥ फोडो लागले चहूं कडे ॥ पडिती इष्टेचे तुकडे ॥ जाणो लोटले विशाळ कडे ॥
महापर्वताचे ॥ ६१ ॥ त्याचे ही करिती तुकडे कुट ॥ जाणों जात्यानें दळिलें पीठ ॥ सैन्य उतरलें
घनदाट ॥ इटेसि निकट मांडिला ॥ ६२ ॥ जैसी लंका वेढिली वानरीं ॥ तयाची संख्या कोण करी
॥ तेणें रिती वेधोनि इटेवरी ॥ फोडिता ति आनंदें ॥ ६३ ॥ ऐसा येक मास पर्यंत ॥ राजा राहि
ला असे तेथ ॥ वायु सुटला असे अद्भुत ॥ तेणें धुरोळा उडविला ॥ ६४ ॥ ब्राह्मण जपती पर्जन्य
सूक्त ॥ मेघ वर्षला बहुत ॥ तेणें गेला वाहत ॥ सिंधुजळासी पैं ॥ ६५ ॥ इटेचि जाली शांती ॥
चित्रांगी पावली उत्तम गती ॥ आली चित्रकूटा प्रती ॥ आपुल्या देहीं प्रवेशली ॥ ६६ ॥ जाला

इदैचासंव्हारु॥थोरआनंदलाच्यारु॥राजामानिउपकारु॥सणेबरवामंत्र सांगीतलां॥६७
करितसेबहुतस्तुती॥च्यारूसिसणेचालवीराज्यनिती॥चौघेमासे मंत्री असती॥त्यांवरि-
ष्टहोवोनिराहे॥६८॥च्यारुसणेजीनृपनाथा॥मजनाहींयाचीआस्था॥निरोपदेणेंसर्व-
था॥जाणेअसेसेतुसी॥६९॥हेंमहाथोरअरिष्ट॥म्यांदेखिलेंदुर्घट॥तेणेंजालोंउत्कट॥
जेंतुसेंराज्यक्षेमअसावें॥७०॥राजाविनवीबहुतापरी॥तुजसारिखानाहींपरोपकारी॥
धन्यधन्यजन्मलासिउदरीं॥मातेचिया॥७१॥कांहींदेवोंपाहे वस्त्र अलंकार॥रथवारु आणि
कुंजर॥च्यारुनकरीअंगीकार॥मागेंआज्ञाजावयाची॥७२॥जैसापर्जन्यमुसळधारी
॥इंद्रवर्षलागोकुळावरी॥कृष्णेंधरिलागोवर्धनकरीं॥रक्षिलेंगोकुळासी॥७३॥तैसेंरक्षि
लें आह्मासी॥निवारिलेंमहाअरिष्टासी॥दुजानाहींनिर्धारेंसी॥तुजऐसाधर्मात्मा॥७४
च्यारुसणेम्या केलानिधार॥त्याचामानिसी तूंउपकार॥मागं देखिलाविचार॥तोविदित
केलापाहिजे॥७५॥ कविसणें ऐसें करावें कृत्य॥आपलें कार्य दुसरियासि वाटे हित॥करि-
तां आपलास्वार्थ॥परमार्थघडे इतरांसी॥७६॥च्यारुतेथूनि निघाला॥राजाबोळवीतयाला॥
परस्परें थोरजाला॥आश्रह आणि नमस्कार॥७७॥रावफिरून गेलानगरा॥च्यारुपावलाकेदा-
रा॥भेटलावेगेंमुनीश्वरा॥सांगेसकळवृत्तांत॥७८॥गुरुथोरसंतोषला॥सणें तूं आलासि भाग
ला॥आजिस्थिरावोनिप्रभातवेळां॥गमननुवां करावें॥७९॥तेंमानलें च्यारूसी॥सणे तुझी आ-

ज्ञाशिरसि॥मगक्रमिलीतेनिशी॥प्रभातवेळा पैंजाली॥८०॥गुरूसिकेलें दंडवत॥ बिजें केलें
पैंत्वरित॥पावलामहेंद्रपर्वत।विळंघलावटवृक्षावरी॥८१॥तंव आलेतिघेपुत्र॥पाकजालासि
ध्दपवित्र॥भोजनींजालेतृप्त॥क्रमिलीतेनिशी॥८२॥मगउगवलादिनकर॥राजहंसीबैसविला
पृष्ठावर॥उतरिलाचित्रकूटावर॥आपणचालिलापुढारां॥८३॥श्रोतेतेव्हां प्रश्न करिती॥स-
णेआहे विज्ञसी॥पक्षीतरी सूक्ष्म दिसती॥च्यारुसी कैसें वाहिलें॥८४॥कविसणेश्रोतयातें॥
हंसवाहेसारजेतें॥मयूरवाहेस्वामिकार्त्तिकानें॥पक्षीसामान्यकैसेसणावे॥८५॥ऐकासाक्ष
तिसंरी॥चौदाभुवनेंजयाचेउदरीं॥तोकृष्णासवाहेपृष्ठावरी॥गरुडपक्षीकैसासामान्य॥८६॥
आणीकऐकापक्षियाचीकथा॥ज्याहींपक्ष विभांडिलाहोता॥तयाचियापुरुषार्था॥पारना
हींपां॥८७॥ कार्यतरींस्वल्पहोतें॥परीपक्षिकुळें मिळालींत्वरितें॥तें परिसावें निरुतें॥एकचि
त्तें करूनिया॥८८॥टिटिवीपक्षिणीचीं अंडीं॥ठेविलीं होतीं समुद्रदरडीं॥तीं टाकोनियां उघडीं॥
दोघें चारा आणावया गेलीं॥८९॥तंव तेथें बेडकी आली ॥आंडीं घेवूनि गेली तात्काळी॥
ठेविली आपुले गृहमंडळीं॥भक्षावयाकारणें॥९०॥पक्षियें चारा घेवूनि आली॥आपलीं
आंडीं पाहों लागली॥ मगसणती कोण्हीं नेलीं॥पाहाती सिंधुतिरीं॥९१॥पाउलें देखिलीं
बेडकीचीं॥स्तुतिकरिती सिंधुची॥सणति अंडीं देववी आमचीं॥नाहींतरी बरवें नव्हे॥
९२॥तोनाईकेत्रित्यांचें॥तंवसंतापलें मन टिटिवीचें॥सणती शोषण करूं समुद्राचें॥

॥उदकचंचू भरोनि दाकिती॥९३॥ अहंता धरोनि मानसीं॥ ह्मणती कोरडें करूं सिंधुसी॥ तंव-
॥४॥ तेथें आला नारदऋषी॥ तयासि सांगती वृत्तांत॥९४॥ तो ह्मणे बरवी सांपडली संधी॥ जाली
असे कार्यसिध्धी॥ कळी लाऊं पक्षियां जलाब्धी॥ ह्मणोनि निघाला त्वरित॥९५॥ प्रथम गेला
लंकेसी॥ सांगीतलें समस्त पक्षियांसी॥ ह्मणे गांजिलें तुमचिया कुळांसी॥ नदीश्वरें जाण
पां॥९६॥ सांगे अवघा वृत्तांत॥ ह्मणे तुमचा काय पुरुषार्थ॥ जन्म तुमचें जालें व्यर्थ॥ नपुं-
सकाहून हीनपैं॥९७॥ पिडित असे तुमचे कुळासी॥ काय पाहातां निश्चयेसीं॥ धांवा पा
वा ह्मणे पक्षियांसि॥ आपलाल्या प्रतापें॥९८॥ तुमचिया पुढें॥ समुद्र काय सें बापुडें॥ मी
न मगर मत्स्यकुळें॥ भक्षावीं वेगीं॥९९॥ आइकोनि धाविन्नलें सकळ॥ अपार पावलें पक्षि
कुळ॥ वेंढिलें से सिंधुजळ॥ सुटला पळ जळचरांसी॥१००॥ तेथून निघाला नारदऋषि॥ गम
न केलें तिहीं लोकांसी॥ श्रुत केलें पक्षिकुळांसी॥ पक्षि चालिले अपार॥१॥ रांवे साळुंख्या-
घुबड॥ बहिरी ससाणे रगड॥ बक हंस गरुड॥ डोंब गिध असंख्यात॥२॥ लावे चिडिया ति
तुर॥ बळि आणि चकोर॥ वडवागुळें भयंकर॥ कोकिळा सुस्वर पैं गाती॥३॥ बलुच आ-
णि पैं होले॥ सिवणी आणि काउळे॥ कोकिरी कन्ही कुकुरवाळे॥ अति आनंदें करुनियां॥
४॥ हंस बक चास॥ नुन्यापारव बहुवस॥ काकटुवे संतोष॥ भक्षावया धांवती मत्स्यातें॥५॥ ॥४॥
कोंढाल्येंडडतानि आकाशीं॥ बुडी मारुनि गिळिती मछासी॥ बका हर्ष मानसीं॥ सकळ मासे गि

पि०च० ळितानि॥६॥ शाहा मृग शार्दूळ॥ महापक्षि गोळांगुळ॥ सत्वर पावे सिंधुजळ॥ भक्षावया मछा अध्याय
तें॥७॥ युद्ध मांडिलें पक्षियासी॥ आणि तया जळचरांसी॥ अति आनंद नारदासी॥ सेंडी नडा- १४
डी ऋषिची॥८॥ पक्षियांचा सांगे न विस्तार॥ तरीं ग्रंथ वाढेल पसर॥ येकमेकाचें शरीर॥ दशद्वा
दश योजन॥९॥ संग्राम मांडिला थोर॥ सिंधुचें तेव्हां अटलें नीर॥ मीन आणि मगर॥ अतुर्बळि-
ये भिडती॥१०॥ विरुळ आणि किरळ॥ बेडूक आणि कूर्म सबळ॥ नाडेसावज विशाळ॥ भया-
नक गडबडती॥११॥ पक्षि बुडिया मारिती॥ मीन उसाळे हाणिती॥ पक्षी भक्षावया धांवती॥
बळें वोढिती बाहेरी॥१२॥ टिपरिला वितिबळें॥ पक्षी फोडिती डोळे॥ पाई हाणोनि टकोळे॥
करिती वेगळे कर चरण॥१३॥ मग महा विशाळ रूप॥ पक्षि हाणो जाती झडप॥ मगर गिळि
ती साक्षेप॥ मग पक्षि सरसावले॥१४॥ मगर मातले बळवृध्धी॥ तयावरी जटायु उतरले शी
घ्रगती॥ छेदोनि पाडिले चरण क्षितीं॥ केली शांति मगरांची॥१५॥ तंव उगवली नाडेसावज
॥ तयावरी पडिला गरुडराज॥ तेथें जालें थोर झुंज॥ अधिक बळ खगेश्वराचें॥१६॥ अधिक-
बळ पक्षियांचें॥ संव्हारण केलें जळचराचें॥ उदक शोषिलें सिंधुचें॥ पळाले मीन मगर॥१७
बेडुक टरटरा गर्जती॥ तेणें अंबरी नाहो उठती॥ पक्षी चरणीं विदारिती॥ आंडीं गिळिती बे-
डकांची॥१८॥ येक रोळी सोबिन्नले॥ तें सगळें चि गिळिलें॥ ह्मणती बरवें सांपडलें॥ पक्षिप्र
यं समर्थ हो॥१९॥ संग्राम जाला तुंबळ॥ तेणें खळबळिलें सिंधुजळ॥ थोर मांडला हलकालो

ळ॥ अति आनंद पक्षियांसी॥ २०॥ येक गाती येक नांचती॥ येक हर्षें भ्रमण्या घालिती॥ येक था-
॥५॥ कथै थै तोडिती॥ २१॥ दंतशब्दें करुनियां॥ २१॥ ऐसा जाला रणकंदु॥ तेणे भयाभीत जाला सिं
धु॥ ह्मणे काय जाला रणकंदु॥ तो सांगा मुखवचनीं॥ २२॥ पक्षी ह्मणती तूं कोण ब्राह्मण॥ येरु
ह्मणे मी समुद्र जाण॥ न करितां विरुध्ध विंचन॥ कां संव्हारिलें जळचरांसी॥ २३॥ पक्षी ह्म
णती तूं मूर्ख दुर्बुध्धी॥ पूर्वीं केली परशरामासि कुबुध्धि॥ तेण्हें पळविला मसिध्धी॥ केलें चो
दा तळकोंकण॥ २४॥ आतां केलें तैसेंची॥ अंडीं नेलीं टिटिवीची॥ शुध्धि वेगीं करी तयांची॥
नाहीं तरीं जळ सांडोनि पळावें॥ २५॥ अंडीं नेलीं हें मज नाहीं श्रुत॥ शोध करितों मी निश्चि
त॥ तोंवर निश्चळ राहावें येथ॥ पक्षियां वर्जावें॥ २६॥ पक्षी वर्जिती पक्षिकुळ॥ सिंधू प्रवे-
शला जळ॥ जळचरें बोलाविलीं सकळ॥ करिती शोध अंडयाचा॥ २७॥ त्यांहीं केलें शोधन
॥ बेडकुळी आणिली धरुन॥ समुद्र आला अंडीं घेयोन॥ तीं दीधलीं टिटवीसी॥ २८॥ समु
द्र ह्मणें गरुडासी॥ मज न कळतां युद्ध तुह्मा आणि जळचरांसी॥ हा विषाद न धरावा मानसी॥
ह्मणूनि गौरविता जाहाला॥ २९॥ दिधलीं वस्त्रें अळंकार॥ जे मुख्य नायक थोर थोर॥ त्यां-
सि करोनि नमस्कार॥ बोळविता जाला॥ ३०॥ पक्षि गेलिया आपुल्या ठायांसी॥ टिटवी राहि
ली आपुल्या द्रुरडिसी॥ कवि ह्मणे श्रोतयांसी॥ ऐसा प्रताप पक्षियांचा॥ ३१॥ व्यारुतें काय ब ॥५॥
पुढें॥ ज्ह्मणे पर्वतावरि ठेविले खडे॥ मग त्यासि नेतां काय कोडे॥ असे अलक्ष हंसासी॥ ३२

वि०च० व्यारुक्मि कृतांत निघाला॥ तो नगरजनीं देखिला॥ देखोनि अतिसन्मानिला॥ नेला भेटि अध्याय
चित्रांगीच्या॥ ३३॥ चित्रांगी उठली तात्काळ॥ सोडोनि विरगुंटी साडी चरणकमळ॥ प्रक्षाळोनि १४
वरि ठेवी निढळ॥ करी पूजा षोडशोपच्यारीं॥ ३४॥ सारिलिसे आरोगणां॥ रवि गेला अस्तमा
ना॥ रजनी क्रमिली सुखभवना॥ तंव उगवला दिनकर॥ ३५॥ ऐसें दिनदिनाप्रती॥ संतोषरू
पें नांदती॥ पुढें कैसी जाली गती॥ ते सांगे रे हरिदासा॥ ३६॥ इतिश्री विक्रमचरित्र कथा॥ ह-
रिदास होय सांगता॥ ते सावधान ऐकावी श्रोता॥ स्वस्थचित्त करोनियां॥ ३७॥ इतिश्री विक्र
मचरित्रे॥ चतुर्दशोध्यायः॥ श्रीकृष्णार्पणमस्तु॥ १३७॥ अध्याय॥ १४॥ ७॥ ७॥

 श्रीगणेशाय नमः ॥ चित्रकूर पर्वतीं ॥ चारु चित्रांगी नांदती ॥ अष्टभोग भोगिती ॥ येणें रीती
क्रमिले तीन मास ॥ १ ॥ तंव कोण्हे येक दिनांतरीं ॥ चारूस आठवली भेरी ॥ जावूनि उपरी वरी
॥ वाजवीन ह्मणतसे ॥ २ ॥ चित्रांगी सिवरजावया नाहीं सामर्थ्य ॥ उपकारें लिंपिलीं बहुत ॥
ह्मणे जें घडे तुज उचित ॥ तो कार्यवाद कराचा ॥ ३ ॥ उपरि वरी वळं घला ॥ भेरी वाजविता जा
हाला ॥ तो स्वर ईंद्रें ऐकिला ॥ इंद्र भुवनीं ॥ ४ ॥ सांगे दूतासि बोलावूनि ॥ ह्मणे चित्रांगीस या
घेवोनी ॥ ते धाविन्नले तत्क्षणीं ॥ चित्रकूरासी ॥ ५ ॥ दूत ह्मणती चित्रांगीतें ॥ तुज जी बोला
विलें अमरनाथें ॥ विनविती जाहाली चारुतें ॥ ह्मणे तुह्मी घरीं राहिजे ॥ ६ ॥ तो ह्मणे मी न रा-
हे निर्धार ॥ चित्रांगीनें केला शृंगार ॥ चारूसि करूनि भ्रमर ॥ सांगातें घेतला ॥ ७ ॥ आली
इंद्रसभेसी ॥ नमस्कार केला शक्रासी ॥ येरु ह्मणे क्षेम आहेसी ॥ चित्रांगी ह्मणे तुमच्या कृ
पेनें ॥ ८ ॥ गेली होतीस मृत्युलोकासी ॥ बहु कष्टली अससी ॥ वेगीं करीं ननृत्यासी ॥ आ
पुल्या मंदिरासि जावें ॥ ९ ॥ उत्तम नृत्यासि आदरिलें ॥ इंद्र चंद्र देव संतोषले ॥ तंव अपूर्व
वर्त्तलें ॥ पुनरपि चुकली ते ताल ॥ १० ॥ वज्रपाणी अति कोपला ॥ घडी घडी चुकसी ताला-
ला ॥ तरीं जाय पडे होवूनि सिळा ॥ समुद्रामाजि शतयोजन ॥ ११ ॥ ऐकूनि श्राप बोली ॥ अंतरीं
थोर दचकली ॥ ह्मणे हें कर्म गा चंद्रमौळी ॥ आतां कैसें करावें ॥ १२ ॥ अहिल्येसि जी जाहाली
परी ॥ सिळा होवूनि शतसहस्र वरी ॥ पडिली होती भूमिवरी ॥ देखोनी रघुनाथें उद्धरिली ॥

॥१३॥ सिंधुजळीं मी असे गुप्त ॥ कोण विच्यारी माझें स्वहित ॥ जी ही करावी सुस्नात ॥ श्रापा
पासोनियां ॥१४॥ मग विनविती जाहाली वज्रपाणी ॥ ह्मणे मी अपराधी सहस्त्रगुणी ॥ करा
वी उश्रापाची वाणी ॥ कृपा करोनी स्वामियां ॥१५॥ माझा न करावा अव्हेर ॥ तुजवीण नाहीं
कोणाचा आधार ॥ तूं विजन्माचा परिकर ॥ सहस्त्रनयना ॥१६॥ अहो जी राजाधिराजा ॥ कृ
पाळुवा अमरनृपजा ॥ कश्यपात्मजा अदितिज्जा ॥ कृपा मज वरी करावी ॥१७॥ ह्मणे जी गु
रु बृहस्पती ॥ तुवां ह्मणावें इंद्राप्रती ॥ उश्रापाची निगुती ॥ करावी माझी ॥१८॥ गुरु ह्मणे जी
सुरनाथा ॥ या नृत्यांगना तुमच्या अंकिता ॥ यांसि श्राप निर्वाहन करितां ॥ हे लाज कवणा-
सी ॥१९॥ निःकळंक कोण आहे ॥ हें तूं विचारोनि पाहे ॥ जेण्हें हा निर्मिला देह ॥ तो ही परिलि
प्त असे ॥२०॥ ऐकोनि गुरुयांचें वचन ॥ उःश्राप देत सहस्त्रनयन ॥ दृष्टी पडिली सुभान ॥ उ
त्तम देह पावसी ॥२१॥ चित्रांगी ह्मणे दैत्यारी ॥ मी पडेन अक्षोभ जळाभीतरीं ॥ तो लक्ष यो-
जन भ्रमण करी ॥ मज कैसा दृष्टी पडेल ॥२२॥ चित्रांगीस ह्मणे न करी चिंता ॥ जेणें दोन वेळ
हरिली व्यथा ॥ तोचि प्रयत्न करील मागुता ॥ हा संशय त्वां न धरावा ॥२३॥ केलें इंद्रासि दंड
वत ॥ पावली चित्रकूटपर्वत ॥ चारूसि करी विज्ञाप्त ॥ जें जें इंद्र बोलिला होता ॥२४॥ येर ह्म-
णे चिंता न करी कांहीं ॥ होणार न चुके सर्वथा ही ॥ हरिहर चिंती हृदईं ॥ तो हरील क्लेश तुझे
॥२५॥ चारु करी समाधान ॥ दोघींसा रिलें भोजन ॥ केलें मंचकीं शयन ॥ रात्रि मासारी ॥२६॥ ॥१॥

जैं श्री निद्रा होती केली ॥ कुडी मंचकीं राहिली ॥ आत्मा गेला सिंधुजळीं ॥ सिव्हा होवोनि पडिली अ- अध्याय
से ॥२७॥ च्यारु उठोनि प्रातःकाळीं ॥ कांहीं पांचरलें घेतलीं ॥ निघता जाहाला तये वेळीं ॥ मा[illegible]ल १५
ह्मी राजहंसाचा ॥२८॥ तों आला सूर्य माध्यांनीं ॥ च्यारु करीत से चिंतवणी ॥ ह्मणे आजि मृत्यु
भुवनीं ॥ मज नेवोनि सोडावें ॥२९॥ तेण्हें पाहिला से पृष्टीं ॥ आणूनि उतरिला आपुले मठीं ॥
हंसें पूजिला करसंपुष्टीं ॥ सकळांसि जाहालीं भोजनें ॥३०॥ तेथें क्रमिला तो दिवस ॥ प्रभातें
नमूनि राजहंस ॥ चिंतूनियां परमपुरुष ॥ गमन करिता जाहाला ॥३१॥ पावला बद्रिकाश्रमा
जाण ॥ श्रीगुरूसि केलें नमन ॥ कथिलें आपण समूळ कथन ॥ जितुकें होतें वितलें ॥३२
गुरु ह्मणे वचनांतरा ॥ त्वां जावें सेतुबंध रामेश्वरा ॥ मेळवोनि ऋषीश्वरां ॥ करावें अन्नदान
